समाजशास्त्र हे इतर भौतिकशास्त्राप्रमाणेच वस्तूनिष्ठ आहे असे मत दुर्खीमने मांडले आहे. दुर्खीमने आपल्या पद्धतीशास्त्रामध्ये वस्तूनिष्ठतेला विशेष महत्त्व दिले आहे. 'समाजशास्त्रज्ञाने भावना, विचार, मूल्य इत्यादीपासून अलिप्त असले पाहिजे.' समाजशास्त्राच्या अध्ययनामध्ये अशा प्रकारच्या कोणत्याही गोष्टींना महत्त्व देऊ नये.अन्यथा अध्ययनामध्ये वस्तूनिष्ठता राहणार नाही.सामाजिक घटनांचे अध्ययन हे वैज्ञानिक पद्धतीने करायचे आहे. त्यामुळे त्यात वस्तूनिष्ठता ही असलीच पाहिजे.' असे स्पष्ट विचार दुर्खीमने मांडले आहेत. या संदर्भात एलवूड (Elwood) म्हणतो की, "समाजशास्त्राला खऱ्या अर्थाने वस्तूनिष्ठ विज्ञान बनवू पाहणाऱ्या आधुनिक वस्तूनिष्ठ आंदोलनाचे दुर्खीम हे जन्मदाते आहेत. (The modern objectivist movement in sociology, has as its real father, Professor Emile Durkheim - Elwood)

### ३) सामाजिक तथ्ये (Social Facts):

दुर्खीमने सामाजिक तथ्यांना विशेषमहत्त्व दिले आहे. कारण 'सामाजिक तथ्यांचे' अध्ययन समाजशास्त्रात केल्यामुळे या विज्ञानाला एक स्वतंत्र विज्ञान म्हणून दर्जा प्राप्त होतो. इतर कोणत्याही सामाजिक विज्ञानात; सामाजिक तथ्यांचे अध्ययन केले जात नाही.आणि विशेष म्हणजे सामाजिक तथ्यांचा वस्तू म्हणून विचार करणे सहज शक्य आहे. त्यामुळे दुर्खीमच्या पद्धतीशास्त्राचा सामाजिक तथ्ये हा एक महत्त्वपूर्ण आधार आहे.सामाजिक तथ्यांना वस्तू मानूनच त्याचे वस्तूनिष्ठ पद्धतीने अध्ययन करता येईल असा दुर्खीमचा विश्वास होता.

### ४) भौतिकविज्ञान पद्धतीचा उपयोग (Use of Physical Science Methods):

भौतिक विज्ञानात वस्तूचे अध्ययन वैज्ञानिक पद्धतीद्वारे केले जाते. सामाजिक तथ्यांना वस्तू मानल्यामुळे त्याचेही अध्ययन भौतिकविज्ञान पद्धतीने केले पाहिजे असा दुर्खीमचा आग्रह होता.या संदर्भात इ. एस.बोगार्डस (E. S. Bogardus) म्हणतो की, "दुर्खीम हा अंशतः प्रत्यक्षवादी होता आणि सामाजिक क्रियांच्या अध्ययनामध्ये भौतिक विज्ञानाच्या पद्धतीचा अवलंब करण्यावर विश्वास ठेवत होता. (Durkheim was in part a positivist and a believer in applying the methods of physical science to the study of social action - E.S.Bogardus)

यावरून हे स्पष्ट होते की, 'समाजशास्त्रामध्ये भौतिक विज्ञानाच्या पद्धतीनेच अध्ययन केले पाहिजे, तरच समाजशास्त्राला विज्ञानाचा दर्जा प्राप्त होऊ शकतो.' असे दुर्खीमचे स्पष्ट मत होते. त्यामुळेच दुर्खीम हा विज्ञानवादी होता असे म्हटले जाते.

### ५) सामूहिक जाणीवेचे अध्ययन (Study of Collective Consciousness):

दुर्खीमच्या मते, समाजशास्त्रात व्यक्तीगत जाणीवेचे अध्ययन केले जात नाही. किंवा हे विज्ञान मानसशास्त्रावर देखील अवलंबून नाही. जर व्यक्तीला समूहापासून अलिप्त केले तर समूहाच्या क्रिया किंवा विचार आणि व्यक्तीच्या क्रिया किंवा विचार यामध्ये फरक आढळून येतो. म्हणून व्यक्तीच्या अध्ययनावरून समूहाचे अध्ययन करता येत नाही. त्याकरीता समूहाच्या सामान्य लक्षणाचे अध्ययन हे आवश्यक असल्याचे दुखीम प्रतिपादन करतो. 'Rules of Sociological Methods' या ग्रंथात दुर्खीमने स्पष्टपणे लिहीले आहे की, 'जर व्यक्तीच्या अध्ययनाने सुरूवात केली तर समूहामध्ये घडणाऱ्या घटनांच्या संदर्भात काहीच समजता येणार नाही. थोडक्यात मानसशास्त्र आणि समाजशास्त्रात जो फरक आहे तोच फरक जीवशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र या विज्ञानामध्ये देखील आहे. त्यामुळे प्रत्येक सामाजिक घटनेचे मानसिक दृष्टिकोनातून विश्लेषण करणे चूक आहे.'

### ६) सामाजिक तथ्यांचे निर्धारण करणाऱ्या कारणांचा शोध (Search of Determining Causes of Social Facts) :

दुर्खीमने स्पष्टपणे सांगितले की, कोणत्याही सामाजिक घटनांच्या अध्ययनाकरीता व्यक्तीच्या जाणीवेस आधार न मानता समूहाच्या लक्षणाला आधार मानले पाहिजे. तसेच



munotes.in

कोणत्याही सामाजिक तथ्यांचे निर्धारण करणाऱ्या कारणांचा शोध इतर सामाजिक तथ्यांमध्ये घेतला पाहिजे. सामाजिक तथ्यांची व्यक्ती बाह्यता आणि बाध्यता किंवा नियंत्रक शक्ती ही दोन वैशिष्ट्ये दुर्खीमने सांगितली आहेत.

### ७) तुलनात्मक पद्धती (Comparative Method) :

दुर्खीमच्या मते, सामाजिक घटनांचे वैज्ञानिक अध्ययन हे ऐतिहासिक पद्धतीने करता येत नाही.सामाजिक जीवन आणि सामाजिक घटनांचे अध्ययन करण्याकरीता वेगवेगळ्या कारणांचे तुलनात्मक अध्ययन केले पाहिजे. थोडक्यात, सामाजिक घटनांचे तुलनात्मक अध्ययन केल्यास हे अध्ययन वैज्ञानिक राहील. कारण विज्ञानात देखील तुलनात्मक पद्धतीचाच अवलंब केला जातो.

### ८) कार्य-कारण संबंधांचे अध्ययन (Study of Causal Relationship):

सामाजिक तथ्यांचे अध्ययन हे कार्य-कारण संबंधांच्या आधारावर केले पाहिजे असे दुर्खीमचे मत होते. कार्य-कारण संबंधाच्या आधारावर अध्ययन केल्यास, असे अध्यधन हे वैज्ञानिक राहील असे दुर्खीमने प्रतिपादन केले आहे.

### ९) प्रयोगात्मक निरीक्षण (Empierical Observation) :

सामाजिक तथ्यांना वस्तू मानून त्याचे प्रयोगात्मक निरीक्षण केले पाहिजे याला दुर्खीमने आपल्या पद्धतीशास्त्रात विशेष महत्त्व दिले आहे. वैषयिक मूल्यांकन आणि संकल्पनाद्वारे यथार्थ अध्ययन करता येत नाही. एक समाजशास्त्रज्ञ या नात्याने सांख्यिकीय आधारावर समाजाचा आंतरिक फरक स्पष्ट केला पाहिजे. अर्थात सांख्यिकीय आधारावरच सामाजिक जीवनास अधिक स्पष्ट करता येते असे दुर्खीमने प्रतिपादन केले आहे.

अशाप्रकारे दुर्खीमने समाजशास्त्राच्या अध्ययन पद्धतीला भौतिकविज्ञानाच्या पद्धतीजवळ आणण्याचा प्रयत्न केला.या संदर्भात 'सामाजिक क्रियेची संरचना' (The Steructuere of Social Action) या ग्रंथात टॉलकॉट पारसन्स लिहितो की, 'दुर्खीम या अर्थानवैज्ञानिक सिद्धांतवादी होता की, ज्याने कधी आधारहीन सिद्धांताचे स्पष्टीकरण केले नाही किंवा कधी निरर्थक अनुमानामध्ये फसून राहिला नाही; तर प्रयोगात्मक समस्यांचे उपाय शोधण्यामध्ये तो व्यस्त राहीला.'(Durkheim was a scientific theorist in the best sense of one who never theorised in the air, never indulged in idle speculation but was always seeking the solution of curcially important empirical problems - Talcott Parsons.)

### १०) व्यावहारिक समाजशास्त्र (Applied Sociology):

कॉम्टच्या प्रभावामुळे समाजशास्त्रीय ज्ञानाचा उपयोग सामाजिक कार्यासाठी झाला पाहिजे असे विचार दुर्खीमने मांडले.

दुर्खीमच्या पद्धतीशास्त्राची अशा प्रकारची वैशिष्ट्ये आहे. दुर्खीमचे पद्धतीशास्त्र हे वैज्ञानिक आहे. कारण सामाजिक घटनांचे अध्ययन करणाऱ्या समाजशास्त्राला 'विज्ञानाचा' दर्जा प्राप्त करून देण्याचा त्याचा मुख्य उद्देश हाता. त्याकरीता सामाजिक घटनांचे अध्ययन हे वस्तूनिष्ठ अशा वैज्ञानिक पद्धतीने होणे आवश्यक होते. म्हणून दुर्खीमने आपले पद्धतीशास्त्र मांडले आहे.

### ३.४.३ पद्धतीशास्त्रावरील टीकाः

दुर्खीमने मांडलेल्या पद्धतीशास्त्रावर स्वेण्ड रेडल्फ, रोगर लेकाम्बे इत्यादी अनेक समाजशास्त्रज्ञांनी टीका केल्यात.

#### १) अर्थाची क्लिष्टता (Complexity of Meaning):

दुर्खीमच्या पद्धतीशास्त्राच्या मान्यताबाबत अनेक त्रुटी आहेत. दुर्खीमच्या पद्धतीशास्त्राची अत्यंत महत्त्वपूर्ण मान्यता ही आहे की, सामाजिक तथ्यांचा वस्तू म्हणून विचार केला पाहिजे. परंतु दुर्खीमने वस्तू म्हणजे काय याचा स्पष्ट अर्थ सांगितला नाही.म्हणून बार्न्स म्हणतो की, दुर्खीमने 'वस्तू' या शब्दाचा अर्थ स्पष्ट केला नाही. कारण त्याने स्वतःच वस्तू या शब्दाचा चार वेगवेगळ्या अर्थाने उपयोग केला आहे.

#### २) विरोधी कल्पना :

दुर्खीमने समाजशास्त्रात भौतिक वित्राणाच्या पद्धतीचा अवलंब करावा असे प्रतिपादन केले आहे. परंतु सामाजिक तथ्यांच्या संबंधित सूचनांचा संग्रह कसा करावा या बाबत कोणताच उल्लेख दुर्खीमने केला नाही. सामाजिक तथ्यांच्या कार्यकारणभावाचा शोध घेतला पाहिजे असे दुर्खीमने प्रतिपादन केले आहे. परंतु कोणत्या प्रकारे कार्य आणि कारणाचे संबंध लक्षात घेतले पाहिजे; याकरिता दुर्खीम कल्पनेचा आधार घ्यायला लावतो. म्हणून स्वेण्ड रेडल्फ यांनी अशी टीका केली की, 'दुर्खीम एकीकडे आपल्या समाजशास्त्रीय पद्धतीमध्ये कल्पना आणि अनुमानास नाकारतो. तर दुसरीकडे कल्पनांवर अवलंबून राहण्यास सांगतो.'

#### ३) विरोधाभास :

दुर्खीमच्या पद्धतीशास्त्रावर टीका करतांना एलवूड म्हणतो की, 'दुर्खीमला वस्तूनिष्ठवादी म्हटले जाते. परंतु सामूहिक प्रतिनिधित्त्वाच्या सिद्धांतामध्ये तो प्रचलित विश्वास आणि परंपरांना महत्त्व देतो. तर सामाजिक तथ्यांच्या संदर्भात तो विश्वास, प्रथा यांना नाकारतो.' म्हणून दुर्खीमच्या विचारांमध्ये विरोधाभास आढळतो.

#### ४) व्यावहारिकतेचा अभाव :

दुर्खीमच्या पद्धतीशास्त्रामध्ये व्यावहारिकतेचा अभाव आढळतो अशा प्रकारची टीका करण्यात आली आहे. तो पारंपारिक विसंगत मान्यता प्रस्तूत करतो. त्यामुळे तो कोणताही एक

पूर्ण विचार मांडू शकत नाही. पारसन्स म्हणतो की, 'दुर्भाग्याने या सर्व कारणांमुळे आणि अपूर्ण प्रयोगात्मकतेने दुर्खीमला स्पष्ट टीकेच्या तर्कपुर्ण परिस्थितीमध्ये लोटले. ज्यामध्ये त्याचे सामाजिक वास्तविकता आणि प्रयोगात्मक सार्थकतेच्या व्यतिरिक्त एक काल्पनिक अस्तित्त्व होते.'

### ५) अपर्याप्त तथ्यांवर आधारीत :

दुर्खीमने आपले निष्कर्ष हे अपूर्ण, अपर्याप्त अशा तथ्यांच्या प्रमाणावर मांडले आहेत. ही गोष्ट वैज्ञानिक पद्धतीच्या दृष्टीने योग्य नाही अशा प्रकारची टीका रोगर लेकाम्बे यांनी केली आहे.

वरील टीकांप्रमाणेच आणखी काही टीका दुर्खीमच्या पद्धतीशास्त्रावर करण्यात आल्या आहेत. दुर्खीमने आपल्या प्रत्यक्षवादी समाजशास्त्रवादी विचारांमुळे समाजशास्त्रात वैज्ञानिक पद्धतीचा उपयोग करण्याची उगीच चेष्टा केली आहे; अशा प्रकारची टीका मर्टनने केली आहे. अशा प्रकारच्या दुर्खीमच्या पद्धतीशास्त्रावरील टीका लक्षात घेतल्यानंतर हे स्पष्ट होते की, दुर्खीमचे पद्धतीशास्त्र हे व्यावहारिक नव्हते.या पद्धतीशास्त्रात अनेक विसंगत अशा पारस्परिक कल्पना प्रस्तूत केल्या आहेत.

अशा प्रकारच्या टीका दुर्खीमच्या पद्धतीशास्त्रावर करण्यात आल्या असल्या तरी दुर्खीमने समाजशास्त्राला विज्ञानाचादर्जा प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने जे पद्धतीशास्त्र प्रस्तूत केले आणि समाजशास्त्राला वैज्ञानिक आधार देण्याचा जो प्रयत्न केला ते दुर्खीमच्या पद्धतीशास्त्राचे समाजशास्त्रास महत्त्वाचे योगदान आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. दुर्खीमच्या पद्धतीशास्त्रावर चर्चा करा.

## ३.५ श्रम विभाजनाचा सिद्धांत (Theory of Division of Labour)

दुर्खीमचा सामाजिक श्रम विभाजनाचा सिद्धांत हा समाजशास्त्रातील एक महत्त्वपूर्ण सिद्धांत होय. सर्वसाधारणपणे श्रम विभाजन ही एक आर्थिक संकल्पना मानली जाते.परंतु दुर्खीमने स्पष्ट केले की, सामाजिक तथ्य हेच श्रम विभाजनाचे कारण आहे. श्रम विभाजनाचे आर्थिक परिणामापेक्षा सामाजिक परिणाम अधिक महत्त्वपूर्ण आहेत. श्रम विभाजनाचे अध्ययन दुर्खीम पूर्वी ॲडमस्मिथ, हर्बर्ट स्पेन्सर, कार्ल मार्क्स इत्यादींनी केलेले आढळून येते. दुर्खीमचे श्रम विभाजनाचे अध्ययन हे पूर्णपणे समाजशास्त्रीय आहे. त्यामुळेच या सिद्धांताला समाजशास्त्रात एक वेगळेच महत्त्व आहे.

'The Division of labour in Society, (१८९३)'या ग्रंथात दुर्खीमने श्रम विभाजनाचा सिद्धांत मांडला आहे. या ग्रंथात श्रम विभाजनाची कारणे आणि प्रभावाचे सविस्तर विश्लेषण केले आहे. ग्रंथाच्या पहिल्या भागात दुर्खीमने श्रम विभाजनास चल (Variable) मानून त्याचा सहसंबंध अन्य सामाजिक तत्त्वांशी स्थापन करून त्यांना श्रम विभाजनाचा परिणाम मानला. तर ग्रंथाच्या दुसऱ्या भागात सामाजिक तथ्यांना चल मानून श्रम विभाजनाचे स्वरूप आणि कारणांचे विश्लेषण केले. दुर्खीमच्या मते, श्रम विभाजन हे एक सामाजिक तथ्य आहे. तसेच नैतिक व्यवस्था आणि स्वसंचालित अशी एक सार्वभौमिक घटना आहे जी प्रत्येकच समाजात आढळून येते. श्रम विभाजन हे स्वतःच साध्य आहे. याची उत्पत्ती होत नसून विकास होतो.

श्रम विभाजन हे एक प्रकार्य असून ते कार्य नाही. दुर्खीमने या श्रम विभाजनाच्या सिद्धांतात आर्थिक घटकांना बाजूला सारून विशिष्ट सामाजिक घटकांना महत्त्व दिले. ज्यामुळे आर्थिक प्रभाव किंवा परिणामापेक्षा सामाजिक प्रभाव किंवा परिणाम अधिक होतात. म्हणूनच समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून श्रम विभाजनाच्या सिद्धांतास विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

**श्रमविभाजन अर्थ:**

एका विशिष्ट कामाच्या पूर्ततेसाठी करावे लागणारे श्रमाचे विभाजन असा श्रमविभाजनाचा साधारणतः अर्थ होतो.संगणक तयार करण्याचे काम अनेक टप्प्यामधून होत जाते. एक संगणक तयार करण्यासाठी त्याच्या विविध भागांची जुळणी करावी लागते. हे कार्य कोणताही एक व्यक्ती करत नसतो. तर विविध टप्प्यावर विविध कार्य पूर्ण होत असते. अर्थात एक संगणक एक व्यक्ती तयार करत नसतो तर त्या कामासाठी कराव्या लागणाऱ्या एकूण श्रमशक्तीची विभागणी विविध कामगारांना स्वतंत्रपणे कामांचे वाटप करून करण्यात येते. घड्याळ, विमाने, कार, इत्यादी सर्व औद्योगिक उत्पादनाबाबत व विविध सेवाक्षेत्रातही असेच श्रमविभाजन दिसून येते.

**श्रम विभाजन आणि सामाजिक विकास:**

स्पेन्सर आणि अन्य उपयोगितावादी विचारवंतांनी असे प्रतिपादन केले की, 'आदिमसमाजापासून तर सभ्य समाजाच्या परिवर्तनाबरोबरच श्रम विभाजनाच्या विकासामध्ये वृद्धी झाली आहे.' या विचारांशी दुर्खीम सहमत आहे. परंतु केवळ आर्थिक कारक हेच सामाजिक विकासासाठी कारणीभूत आहेत या विचारांशी दुर्खीम सहमत नाही. दुर्खीमच्या मते, केवळश्रम विभाजनाच्या विकासामुळेच आदिम समाज हा सभ्य समाजात परिवर्तीत झाला असे नाही तर त्याकरीता नैतिक एकता आणि सामाजिक एकता देखील कारणीभूत आहे. दुर्खीमने आपल्या सिद्धांतातून असा निष्कर्ष मांडला की, समाज हा व्यक्तीच्या स्वार्थाच्या पूर्तीकरीता नाही किंवा व्यक्तीद्वारे याची निर्मिती झाली नाही. तर ही एक मानवाची मुलभूत आवश्यकता आहे. अशाप्रकारे मानवाच्या मुलभूत आवश्यकतेमधून श्रम विभाजन घडून आले. तसेच श्रम विभाजन हे केवळ आर्थिक घटकामुळेच घडून आले नाही तर त्यामध्ये नैतिक मूल्य आणि सामाजिक एकता देखील महत्त्वाची आहे. श्रम विभाजनाबरोबर सामाजिक विकास देखील घडून आला. आदिमकाळातील समाजव्यवस्था आणि श्रम विभाजन प्राचीन काळातील श्रमविभाजन हे प्रामुख्याने स्त्री-पुरुषांच्या भेदावर अवलंबून होते. म्हणजेच त्याकाळी श्रम विभाजन हे लिंग

भेदावर अवलंबून होते. प्राचीनकाळी शिकार करण्यासाठी जंगलात जात असत. कंदमुळे, फळे गोळा करण्याचे काम करीत असत.तर स्त्रिया या घरीच राहून मुलांचे पालन-पोषण आणि अन्य घरगुती कामे करायच्या. त्या काळात लोकसंख्या ही फारच कमी होती. तसेच व्यक्तींच्या गरजा आणि समस्या देखील मर्यादित होत्या. त्यामुळे श्रम विभाजनाची आवश्यकता कुणाला वाटली नाही. सर्व लोक मिळून-मिसळून काम करायचे. दुर्खीम म्हणतो की, आदिम काळामध्ये कोणत्याही प्रकारच्या कार्याचे विभाजन झालेले नव्हते. फक्त जे विभाजन झाले होते ते केवळ स्त्री-पुरुषांच्या आधारावरील होते. आदिमकाळातील समाजात श्रम विभाजन हे अविकसित होते. सापेक्ष रूपाने व्यक्ती- व्यक्तींमध्ये समानता होती. श्रम विभाजनाचा अभाव असल्यामुळे सर्व लोक सामाजिक इच्छेशी बांधलेले होते.समाजातील लोक लोकमत, परंपरा, धर्म आणि राजाच्या दबावामुळे यंत्रासारखे निमूटपणे कार्य करीत होते. त्यांच्यात आढळणारी एकता ही यांत्रिक स्वरूपाची होती असे दुर्खीमने प्रतिपादन केले.

**सभ्य समाजव्यवस्था आणि श्रम विभाजन:**

मानवी समाजाच्या सांस्कृतिक विकासाबरोबर आर्थिक जीवनाच्या विभिन्न पैलूमध्ये देखील विकास झाला. वस्तूची मागणी वाढली आणि लोकांच्या विविध प्रकारच्या गरजा वाढल्यात. या सर्व कारणांमुळे सामाजिक उत्पादनाच्या कार्यामध्ये श्रम विभाजनाची आवश्यकता भासू लागली. आणि समाजात श्रम विभाजन घडून आले. या श्रम विभाजनामुळे समाजातील यांत्रिक एकतेची जागा जैविक एकतेने घेतली.

दुर्खीम म्हणतो की सभ्य समाजात एकीकडे श्रम विभाजनाचा विकास झालेला दिसतो परंतु दुसरीकडे व्यक्तींच्या व्यक्तीमत्त्वामध्ये असमानता आढळते आणि ते जैविक एकतेद्वारे एकमेकांशी बांधले जातात जे त्यांच्या पारस्पारिक निर्भरतेवर अवलंबून असते. अशा प्रकारच्या विकसित समाजात क्षतीपूर्ती कायदे (Restitutive Law) असतात. या कायद्यानुसार ज्या पक्षाची हानी झालेली असते त्या पक्षाला नुकसान भरपाई दिली जाईल.

अशाप्रकारे समाजामध्ये व्यक्तीवादाच्या नैतिकतेचे प्रभुत्त्व असते.दुर्खीमने 'व्यक्तीवाद' हा शब्द विशेष अर्थाने प्रस्तूत केला आहे. या सभ्य समाजात व्यक्तीवादाचा अर्थहा व्यक्तीच्या अनंत इच्छांच्या पूर्तीकरीता अमर्यादित अधिकारांशी संबंधित आहे. तर सभ्य समाजात व्यक्तीत्त्व एका जागृत नैतिक मनोवृत्तीच्या रूपात समोर येते असे दुर्खीमने प्रतिपादन केले आहे. सभ्य समाजात व्यक्तीत्त्वाचा अर्थ हा अशा कर्तव्याशी लावला जातो, ज्यामुळे व्यक्ती सामाजिक कल्याणाच्या दृष्टीने समाजाकरीता कार्य करते. दुर्खीमच्या मते, आनंदवाद किंवा अहं व्यक्तीवाद सामाजिक एकता निर्माण करतो.

## ३.६ श्रम विभाजनाची कारणे

स्पेन्सर आणि उपयोगितावाद्यांनी असे विचार मांडले होते की, समाजातील प्रत्येक व्यक्तीला अधिकाधिक सुख आणि आनंद प्राप्त करण्याची इच्छा असते. सुख किंवा आनंद हे केवळ चांगली आर्थिक परिस्थिती किंवा उच्च जीवन स्तरावर अवलंबून असते.जितकी जास्त संपत्ती असेल, तितकेच व्यक्तीला अधिक सुख मिळते.अशा प्रकारचे विचार स्पेन्सर आणि



munotes.in

उपयोगितावाद्यांनी मांडले होते. उपयोगितावाद्यांच्या मते, आर्थिककारण हेच श्रम विभाजन आणि मानवाच्या आर्थिक सभ्यतेच्या विकासाचे कारण आहे.श्रम विभाजनामुळेच कार्यकुशलतेमध्ये वृद्धी होते.कुशलतेत वृद्धी झाल्यामुळे उत्पादनात वृद्धी होऊन आर्थिक स्थिती मजबूत होते. आणि सामाजिक आनंदात देखील वृद्धी होऊन जीवन स्तर उंचावतो.

स्पेन्सर आणि उपयोगितावाद्यांच्या वरील विचारांचा दुर्खीमने विरोध केला. श्रमविभाजनाचा आधार आर्थिक प्रगती आहे या मताचे दुर्खीमने खंडन केले. दुर्खीमच्यामते, 'श्रम विभाजनाच्या विकासाचे कारण हे भौतिक नाही. कारण ही तर एक नैतिक प्रक्रिया आहे.' आनंदाचा संबंध हा आर्थिक समृद्धीशी आहे हा उपयोगितावाद्यांचा विचार सुद्धा चूक असल्याचे दुर्खीमने नमूद केले.कारण आर्थिक समृद्धी ही सुखामध्ये वृद्धी करू शकते परंतु आनंदाची समृद्धी करू शकत नाही असे दुर्खीमने स्पष्ट केले.सुखाचा संबंध हा इंद्रियांच्या क्षणिक संतुष्टीशी आहे. त्याचा संबंध हा शरीराशी असतो. परंतु आनंदाचा संबंध हा मनाशी असतो. ती एक आंतरिक वस्तू आहे. ती बाह्यइंद्रियजन्य वस्तू नाही. आनंद हा चांगल्या सामाजिक अवस्थेमध्येच प्राप्त होतो.संपत्ती किंवा विलासिनतेमध्ये आनंद मिळत नाही असे मत दुर्खीमने मांडले आहे.

पुढे दुर्खीम म्हणतो की, जर श्रम विभाजन आनंद निर्माण करीत असेल तर जेव्हा आनंदाची सीमा येते तेव्हा श्रम विभाजन थांबायला पाहिजे होते. परंतु श्रम विभाजन हे न थांबता सतत वाढत आहे. तसेच जर आदिमकाळातील समाजाचे आधुनिक समाजाशी तुलनात्मक अध्ययन केले तर हे स्पष्ट होईल की, आधुनिक समाजापेक्षा आदिमकाळातील समाज सुखी झाला असता.

अशा प्रकारे दुर्खीमने आर्थिक प्रगतीमुळे श्रम विभाजन झाले या उपयोगितावाद्यांच्या विचारांचे खंडन करून श्रम विभाजनाची पुढील दोन कारणे सांगितली आहेत.

**अ) लोकसंख्येचे घनत्व**
**ब) नैतिक घनत्व**

**अ) लोकसंख्येचे घनत्व :**

दुर्खीमने, स्पेन्सर आणि उपयोगितावाद्यांच्या श्रमविभाजनाच्या मानसशास्त्रीय आणि वैयक्तिक संकल्पनेचे खंडन केले. आणि असे प्रतिपादन केले की, लोकसंख्येच्या घनत्वा बरोबरच श्रम विभाजन वाढत असते. आणि जशी लोकसंख्येत वृद्धी होते तशी श्रम विभाजनात वृद्धी होत जाते. लोकसंख्येचे घनत्व हे आपल्या अस्तित्वाकरीता संघर्ष निर्माण करते. व्यक्ती आपले अस्तित्व टिकविण्यासाठी विभिन्न कार्यात सहभागी होतो. आणि स्पर्धेच्या शर्यतीमध्ये कौशल्य प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो.त्यामुळे तो दुसऱ्यापासून स्वतःला वेगळे करतो. प्रत्येक व्यक्ती अशाप्रकारे विभेदीकरण आणि विशेषीकरण हे श्रम विभाजनाच्या विकासाचाच परिणाम होय असे दुर्खीम मानतो. अशाप्रकारे लोकसंख्येचे घनत्त्व सापेक्ष रूपाने श्रम विभाजनाचा विकास दुर्खीम पुढे स्पष्ट करतो की, लोकसंख्येचा आकार आणि घनत्व वाढल्याबरोबर व्यक्तींच्या पारस्पारिक संबंधामध्ये देखील वृद्धी होते. त्यामुळे त्यांच्यामध्ये होणाऱ्या अंतक्रिया या अधिक तीव्र होतात. या अंतक्रिया जितक्या तीव्र असतील, तितक्याच तीव्र गतीने श्रम विभाजनाचा

विकास होत असतो. याउलट असभ्य किंवा सांस्कृतिक दृष्टीने मागासलेल्या समाजात अंतक्रिया शिथील असतात. आणि त्याचे सामाजिक संबंध देखील कमी असतात. म्हणूनच श्रम विभाजन हे सुप्त अवस्थेमध्येच राहते. अशाप्रकारे लोकसंख्येचे घनत्त्व हेच श्रम विभाजनाच्या विकासाचे मुख्य कारण आहे.

**ब) नैतिक घनत्त्व :**

नैतिक घनत्व हे देखील श्रम विभाजनाकरिता आवश्यकअसते असे दुर्शीमचे मत आहे. नैतिक घनत्त्वाचा अभिप्राय हा व्यक्ती मधील पारस्पारिक घनिष्ठ संबंधाशी आहे जो सहयोग, प्रेम, सामंजस्य, सहिष्णुता आणि दृढ सामाजिक भावनातून निर्माण होतो. भौतिक घनत्त्व आणि नैतिक घनत्त्वाचा परस्परांशी फार मोठा संबंध आहे.कोणत्याही समाजात लोकसंख्येचा आकार आणि घनत्त्वात जशी वृद्धी होते त्या प्रमाणात परस्पर सामाजिक संबंध हे देखील मजबूत होत जातात. कारण पारस्पारिक निर्भरतेमुळे श्रम विभाजनाच्या परिणामस्वरूप वृद्धी देखील होत जाते. त्यामुळेच अधिक घनत्त्व असलेल्या समाजात श्रम विभाजन हे एका नैतिक कर्तव्याच्या रूपामध्ये प्रकट होत असते.

अशा प्रकारे दुर्खीमने श्रम विभाजनाची लोकसंख्येचे घनत्त्व आणि नैतिक घनताही दोन कारणे सांगितली आहेत. थोडक्यात, लोकसंख्येचे घनत्त्व आणि नैतिक घनत्त्वामध्ये वृद्धी झाल्यास श्रम विभाजन घडून येऊन, श्रम विभाजनाचा विकास होतो.

## ३.७ श्रम विभाजन आणि सामाजिक समस्यांवरील उपाय

समाजाचा आकार जस-जसा वाढत जातो तस तसा समाज अधिक क्लिष्ट होत जातो. विशिष्ट व्यक्तीच्या सेवांची आवश्यकता वाटू लागते आणि श्रम विभाजनाचा विकास होतो. दुर्खीमच्या मते, श्रम विभाजनाने स्वार्थ-विभाजनास जन्म दिला. आणि समाज विभिन्न समूह आणि वर्गामध्ये विभाजित होतो. औद्योगिक संघर्ष निर्माण होतो. ज्ञान आणि विज्ञानाच्या क्षेत्रामध्ये अति विभेदीकरण घडून येते. समाजात व्यक्तीत्त्वाला श्रेष्ठ स्थान प्राप्त होते आणि संबंधांना कराराचे स्वरूप प्राप्त होते. अशाप्रकारे समाजातील सामूहिक भावना नष्ट होऊ लागते आणि व्यक्तीवादाची भावना विकसित होऊ लागते. याचाच अर्थ यांत्रिक एकता नष्ट होऊन त्याचे स्थान जैविक एकता घेते.

दुर्खीमच्या मते, सामाजिक विघटनाचे कारण हे श्रम विभाजन नसून त्याकरीता सामाजिक परिस्थिती कारणीभूत आहे ज्यास प्रत्येक समाज आपल्या सदस्याच्या आचार व्यवहाराला नियंत्रित करण्याकरीता निर्माण करतो. जोपर्यंत श्रम विभाजन सामान्य असते तो पर्यंत व्यक्ती या सामाजिक परिस्थितीनुसार वर्तन करीत असते.

## ३.८ श्रम विभाजनाचा परिणाम किंवा प्रभाव (Effects of Division of Labour)

दुर्खीमच्या अनुसार श्रम विभाजनाचा आर्थिक परिणाम किंवा प्रभावापेक्षा सामाजिक परिणाम किंवा प्रभाव हा अधिक पडतो. श्रम विभाजनाचा विविध प्रकारचा परिणाम किंवा प्रभाव हा पुढीलप्रकारे आढळून येतो.

### १) जैविक सामाजिक एकता (Organic Social Solidarity):

कामगार विभागणीमुळे सामाजिक एकता यांत्रिक एकतेच्या स्तरावरून जैविक एकतेच्या स्तरावर येते. यांत्रिक एकतेमध्ये श्रम-विभाजन निष्क्रीय असते. परंतु आता मात्र ते आपले वास्तविक स्वरूपात प्रगट होऊ लागते. सामाजिक एकक आपले विशिष्ट कार्य हे शक्तीच्या दबावामुळे करीत नाही तर ते आपल्या इच्छेनुसार करतात. प्रकार्याची निवड ही त्यांच्या स्वतंत्र विवेकानुसार होत असते. समाजात विभिन्नता आढळून येते. प्रत्येक व्यक्ती आपल्या कार्यामध्ये विशिष्टता प्राप्त करण्याचा प्रयत्न करू लागतात.कारण त्यांचे प्रकार्य हे त्याचा स्वभाव, आंतरिक इच्छा आणि आपल्या योग्यतेच्या अनुकूल होत असते. ही विभिन्नता आणि विशेषीकरण एका अशा सामाजिक एकतेला जन्म देतात की जी जैविक प्रकारची असते.

### २) विशेषीकरण (Specialization) :

श्रम विभाजनामुळे कामगार एकाच प्रकारचे काम अनेक वर्षापर्यंत करीत राहतात. त्यामुळे ते या कार्यामध्ये विशिष्टता प्राप्त करतात. श्रम विभाजनाचा असा परिणाम समाजात आढळून येतो.

### ३) परस्परावलंबन :

श्रम विभाजनामुळे प्रत्येक गोष्टीचे विशेषीकरण होत असते.त्यामुळे एकच व्यक्ती सर्व प्रकारचे कार्य स्वतः करू शकत नाही, त्यांना आपल्या आवश्यकताची पूर्ती करण्याकरीता दुसऱ्यावर अवलंबून रहावे लागते. म्हणून श्रम विभाजनातून अंतसंबंध आणि पारस्पारिकता निर्माण होते.

### ४) सहकार्य (Co-operation) :

वाढत असलेले परस्परावलंबन व्यक्तीला सहकार्य करण्यासाठी बाध्य करीत असते. त्यामुळे आधुनिक समाजात श्रमविभाजनाद्वारे संपूर्ण सामाजिक व्यवस्था सहकार्यावर आधारीत राहते.

### ५) नैतिक दबाव (Moral Pressure) :

श्रम विभाजन हे जरी व्यक्तीवादी विचारांना प्रोत्साहन देत असले तरी त्याच बरोबर ते समाजाच्या नैतिक प्रक्रियाद्वारे निरंकुश व्यक्तीवादाचा विकास होवू देत नाही. या नैतिक



munotes.in

दबावामुळे प्रत्येक व्यक्तीला आपल्या विशिष्ट कार्याद्वारा व्यक्तीत्त्वाची निर्मिती करण्याची पूर्ण संधी प्राप्त होते आणि समाजाचे अधिक कल्याण साधले जाते.

### ६) विभेदीकरनामध्ये समन्वय :

श्रम विभाजनाच्या परिणाम स्वरूप समाजात एकीकडे विभेदीकरण वाढते तर दुसरीकडे समाजामध्ये कार्यात्मक संबंधाच्या आधारावर मिळून-मिसळून राहणे आणि कार्य करण्याची प्रवृत्ती निर्माण होते. अशाप्रकारे विभिन्नतून एकता विकसित होतो.

### ७) सभ्यतेचा विकास (Development of Civilization):

श्रमविभाजनामुळेच आधुनिक सभ्य समाजाची निर्मिती झाली आहे. सभ्यतेचा विकास हा बऱ्याच प्रमाणात श्रम विभाजनावरच अवलंबून असतो.

### ८) नवीन वर्गाचा उदय :

श्रम विभाजनामुळे विशेषीकरणास विशेष महत्त्वप्राप्त होते. विशेष ज्ञान प्राप्त असणाऱ्या व्यक्तींमध्ये स्वार्थी भावनांचा विकास होऊ लागतो. त्यामुळे वेगवेगळ्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या विभिन्न वर्गाचा उदय होतो.

### ९) प्रगती आणि स्पर्धा (Progress and Competition):

श्रम विभाजनातून नव-नवीन उद्योग आणि कार्याची निर्मिती होते. त्यामुळे समाजात स्पर्धा होऊ लागते. विशेषीकरण झाल्यामुळे प्रत्येक क्षेत्रात नव-नवीन गोष्टींचा अविष्कार होतो त्यामुळे सामाजिक प्रगती घडून येते.

## ३.९ सामाजिक ऐक्य (Social Solidarity)

'The Division of Labour in Social' या ग्रंथाच्या पहिल्या भागात दुर्खीमने सामाजिक एकतेचे विश्लेषण केले आहे. दुर्शीमच्या मते, श्रम विभाजन हे समाजातील नैतिक नियम, आचार संहिता किंवा नैतिक आदर्शांना जन्म देतात आणि ही नैतिक तथ्ये सामाजिक संबंधांची निर्मिती करतात आणि एक अशी परिस्थिती निर्माण होते की, ज्यास आपण सामाजिक एकता असे म्हणतो.

'सामाजिक एकता ही पूर्णपणे एक सामाजिक घटना आहे.' असे विचार दुर्खीमने मांडले आहे. सामाजिक एकतेचा दिवसेंदिवस विकास होत जातो. एकता वैयक्तिक दृष्टीकोनास विकसित करून पारस्पारिक सद्भावनेस दृढता प्रदान करते आणि संबंधाच्या विभिन्नतेला स्वीकृत करण्याकरीता सहिष्णुता व उदारतेची वृद्धी करते.

**सामाजिक एकतेची वैशिष्ट्ये (Characteristics of Social Solidarity):**

दुर्खीमने सामाजिक एकतेच्या संदर्भात जे विचार मांडलेत त्या विचारांवरून सामाजिक एकतेची पुढील काही वैशिष्ट्ये स्पष्ट होतात.

१) सामाजिक एकता एक नैतिक तथ्य आहे.

२) सामाजिक एकता अमूर्त तथ्य आहे.

३) सामाजिक एकता ही सामूहिक जाणीवेची अभिव्यक्ती आहे.

४) सामाजिक एकता एक गतीमान तथ्य आहे.

५) सामाजिक एकतेचे मूल्यांकन करणे कठीण आहे.

अशा प्रकारची सामाजिक तथ्यांची काही वैशिष्ट्ये आहेत.

**सामाजिक एकतेचे प्रकार (Forms of Social Solidarity):**

दुर्खीमच्या मते, सामाजिक एकतेच्या स्वरूपामध्ये परिवर्तन होत असते. हे परिवर्तन यांत्रिक एकतेच्या दिशेने होत असते. यावरून दुर्खीमने सामाजिक एकतेचे दोन प्रकार सांगितले आहेत.

**१) यांत्रिक एकता**
**२) जैविक एकता**

सामाजिक एकतेच्या या दोन्ही प्रकाराचे सविस्तर विवेचन पुढील प्रमाणे आहे.

### ३.९.१ यांत्रिक एकता :

दुर्खीमच्या अनुसार, आदिम काळातील समाजात यांत्रिक एकता होती. त्यावेळी समाजाचा आकार लहान होता. लोकांच्या आवश्यक गरजा या मर्यादित होत्या. त्यांचे सामाजिक आणि आर्थिक कार्य, जीवनपद्धती, आचार-विचार इत्यादीमध्ये विशेष फरक नव्हता. इतकेच नव्हे तर समाजातील लोकांमध्ये मानसिक आणि नैतिक आधारावर अधिकप्रमाणात साम्य होते.त्यांच्यावर लोकमत, परंपरा, धर्म इत्यादींचा प्रभाव होता.त्यामुळे आदिमकाळात व्यक्तीगत समानतेच्या आधारावर एकता होती. सामाजिक किंवा व्यक्तीगत जीवनाच्या कोणत्याही पैलूमध्ये फरक आढळत नव्हता. अशा प्रकारच्या एकतेला दुर्खीमने यांत्रिक एकता असे संबोधले आहे. कारण आदिम काळातील लोक परंपरा, लोकमत, धर्म आणि राजांच्या दबावामुळे अगदी डोळे मिटून यंत्राप्रमाणे कार्य करीत होते. या लोकमत, परंपरा, धर्माचा इतका प्रभाव होता की, व्यक्तीला कोणत्याही प्रकारचे महत्व नव्हते. व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व सामूहिक व्यक्तिमत्त्वामध्ये इतके एकरूप होऊन जायचे की, व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाला कोणतेच अस्तित्व रहात नव्हते. प्रत्येक व्यक्ती समाजाबरोबर यंत्रासारखा विचार करायचा, काम करायचा आणि सामाजिक नियमांचे निमूटपणे पालन करायचा. थोडक्यात, यांत्रिक एकता ही समाजाच्या एकरूपतेवर आधारीत होती. त्यावेळी श्रम विभाजन हे अविकसित स्वरूपात होते. म्हणजेच श्रमविभाजन

munotes.in

नसलेल्या समाजातच यांत्रिक एकता आढळून येते. अशा समाजात विशेषीकरण किंवा विभेदीकरण आढळून येत नाही.

**दमनात्मक किंवा प्रायश्चित्त प्रधान कायदे (Retributive law) :**

दुर्खीमने स्पष्ट केले की, ज्या समाजात यांत्रिक एकता असते तेथे दमनात्मक किंवा प्रायश्चित्तप्रधान कायदे असतात. यांत्रिक एकतेमध्ये लोक सामुहिक जाणीवेने कार्य करतात आणि सामाजिक एकता कायम ठेवणे हे आपले कर्तव्य समजतात. समाजाची एकता कायम ठेवण्याच्या दृष्टीने दमनात्मक कायदे महत्त्वपूर्ण आहेत.

एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीचे नुकसान करण्यात आले म्हणून शिक्षा दिली जात नाही. तर त्या व्यक्तीद्वारा संपूर्ण समूहाच्या सद्सद्विवेक बुद्धीस धक्का पोहोचल्यामुळे त्याची भरपाई करून घेणे हा दमनात्मक किवा प्रायश्चित्त प्रधान कायद्याचा उद्देश असतो. जर व्यक्तीच्या अपराधास दंड दिला नाही तर त्याचा परिणाम सामाजिक एकता दुर्बल होण्यामध्ये होईल आणि ही गोष्ट समाजाच्या दृष्टीने घातक ठरते. त्यामुळे सामुहिक भावनेचा भंग करणाऱ्या अपराध्यांना दिली जाणारी शिक्षा कडक असते. व्यक्ती ज्या शक्ती विरुद्ध वर्तन करते तीशक्ती इतकी प्रबळ असते की, त्या शक्तीची होणारी प्रतिक्रिया ही भयानक असते.

तात्पर्य यांत्रिक एकतेमध्ये व्यक्तीला महत्त्व नसून सामूहिक जाणीवेला विशेष महत्त्व असते. व्यक्तींनी केलेला गुन्हा हा एका विशिष्ट व्यक्ती विरुद्ध नसून समूहाच्या विरुद्ध असतो म्हणून त्या व्यक्तीने किंवा अन्य व्यक्तीने पुन्हा गुन्हा करू नये या दृष्टीनेत्याला दंड दिला जातो. अशाप्रकारे यांत्रिक एकता ही टिकून राहते.

### ३.९.२ जैविक एकता:

आदिमकाळातील परिस्थितीमध्ये हळूहळू बदल घडून येतो. लोकसंख्या वाढू लागते. त्याचबरोबर लोकांच्या गरजा देखील वाढतात. या सर्व लोकांच्या गरजा सारख्या असू शकत नाही. त्यांच्या गरजामध्ये विभिन्नता असते. या विभिन्न गरजांच्या पूर्तीकरीता मोठ्या प्रमाणावर सामाजिक कार्य आणि उत्पादन कार्य करण्याची अधिकाधिक आवश्यकता भासू लागते. श्रम विभाजनामुळे कार्यांचे विशेषीकरण घडून येते. कारण श्रम विभाजनाच्या अंतर्गत व्यक्ती एकाच प्रकारचे कार्य सतत करीत असते. या विशेषीकरणामुळे व्यक्तीगत भिन्नता वाढत जाऊन, विविध प्रकारच्या स्वार्थाची निर्मिती होते. श्रमविभाजनातून वेगवेगळ्या प्रकारचे काम करणाऱ्या लोकांचे वर्ग किंवा समूह निर्माण होतात. दुर्खीम स्पष्ट करतोकी, श्रम विभाजन आणि विशेषीकरणामुळे व्यक्तीचे महत्त्व वाढत जाते.

अशाप्रकारे सामाजिक आणि व्यक्तीगत जीवनाच्या प्रत्येक पैलूमध्ये विभिन्नता निर्माण होते.म्हणून दुर्खीम म्हणतो की, प्राचीन समाजाप्रमाणे व्यक्तीगत समानतेच्या आधारावर सामाजिक एकते ऐवजी दुसऱ्या प्रकारच्या एकतेची आवश्यकता भासू लागते.आधुनिक समाजात श्रम विभाजन एका नवीन प्रकारच्या एकतेस जन्म देते. कारण श्रमविभाजन झाल्यानंतर देखील एकता, संघटन किंवा सहकार्याची आवश्यकता असते. कोणत्याही प्रकारच्या श्रम विभाजनामध्ये सहकार्य असणे हे एक आवश्यक तत्त्व आहे. श्रम विभाजनाच्या अंतर्गत प्रत्येक व्यक्ती एका



munotes.in

विशिष्ट प्रकारचे कार्य करीत असतो. परंतु त्याला आपल्या इतर आवश्यकता, सेवा आणि वस्तूंकरीता इतरांवर अवलंबून रहावे लागते. ही आवश्यकता प्रत्येक व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीशी एका सुत्रामध्ये बांधत असते. आणि एक दुसऱ्यांना सहकार्य करण्यास बाध्य करते.

उदा. श्रम विभाजन आणि विशेषीकरणामुळे टी.व्ही. तयार करणारा व्यक्ती लाकडी टेबल तयार करू शकत नाही किंवा लाकडी टेबल तयार करणारा व्यक्ती टी.व्ही. तयार करू शकत नाही. परंतु दोघांनाही एकमेकांच्या सेवेची गरज असते. त्यामुळे वेगवेगळे काम करणाऱ्या व्यक्ती या एक दुसऱ्याशी संबंधित आणि परस्परांवर अवलंबून असतात.

याचाच अर्थ श्रम विभाजनाने व्यक्ती आणि समूहांना वेगवेगळ्या कामामध्ये विभाजित केले आहे. परंतु दुसरीकडे त्यांच्या आवश्यकतांच्या आधारावर श्रम विभाजनामुळे ते एक दुसऱ्यांशी संबंधित असून परस्परावलंबी आहेत. त्यामुळे समाजात एकता निर्माणहोते. या एकतेलाच जैविक एकता म्हटले आहे. ज्याप्रमाणे व्यक्तीच्या शरीराचे हात,पाय, डोळे, कान इत्यादी वेगवेगळे अवयव आहेत. या सर्व अवयवांचे स्वतंत्र असे कार्य आहे. म्हणजेच अवयवांच्या कामाचे विभाजन झाले आहे. तरी या सर्व अवयवांचे कार्य हे एक-दुसऱ्यांशी संबंधित आणि परस्परावर अवलंबून आहे. त्याच प्रमाणे आधुनिक समाजात श्रम विभाजनामुळे प्रत्येक व्यक्ती आपल्या इच्छा, आवडीनुसार कार्य करीत असतो. यामध्ये व्यक्तीला विशेष महत्त्व दिले जाते. तरी प्रत्येक व्यक्ती आपल्या आवश्यक गरजा स्वतः पूर्ण करू शकत नाही. त्याकरीता त्याला दुसऱ्या व्यक्तीवर अवलंबून रहावे लागते. त्यामुळे त्यांचा इतरांशी संबंध येतो आणि ते एकमेकांना सहकार्य करतात.म्हणून श्रम विभाजनामुळे निर्माण होणाऱ्या या एकतेला दुर्खीमने जैविक एकता असे संबोधले आहे.

## ३.१० सारांश

दुरखाईमने समाजशास्त्र नावाच्या विशेष कार्यक्षेत्राचा शोध घेतलाय योग्य त्या वैज्ञानिक पद्धतीनुसार त्याची मांडणी केली आणि रचनात्मक कार्यकेंद्रित वादाची उभारणी केली जी आजवर समाजशास्त्रातील प्रबळ उपशाखा आहे. दुरखाईमच्या सर्वांत महत्त्वाच्या सिद्धांतांपैकी एक म्हणजे त्याची सामाजिक सत्यांची संकल्पना. जेव्हा दुरखाईमचे समाजातील श्रमाचे विभाजन होत गेले तेव्हा व्यक्तिगत स्वातंत्र्यावर सामाजिक मर्यादांचे विश्लेषण तुलनेने विकसित होत होते. त्यामुळे त्याची रचना अभ्यास शैक्षणिक जगतामध्ये आणि वैज्ञानिक दर्जा मिळवण्यासाठी समाजशास्त्राच्या उदयासाठी फार महत्त्वपूर्ण आहे.सामाजिक घटना ह्या सामाजिक पातळीवर समजावून देता आल्या पाहिजेत ह्या त्याच्या प्रतिवादामुळे दुरखाईमने प्रगत किंवा सेंद्रिय समाजांच्या उदयाचे समाजाच्या वाढत्या आकाराच्या आधारावर स्पष्टीकरण दिले. प्रदेशानुसार होणारी वाढ आणि लोकसंख्येची होणारी वाढ, ह्यामुळे लोकसंख्येची भौतिक घनता वाढते आणि म्हणून सामाजिक घनता म्हणजेच जास्त संपर्क आणि दळणवळण सुविधा वाढते हे त्याने स्पष्ट केले. संपूर्ण समाजशास्त्रासाठी ही गोष्ट नवीन सुरूवात करणारी होती.

**आपली प्रगती तपासा**

१. श्रम विभाजनाच्या सिद्धांतावर चर्चा करा.

## ३.११ प्रश्न

१) एमिल दुर्खीम यांचे पद्धती शास्त्रीय योगदान स्पष्ट करा.

२) एमिल दुर्खीम यांचे समाजशास्त्रीय योगदानावर चर्चा करा.

३) श्रम विभाजन म्हणजे काय हे सांगून त्यांच्या वैशिष्ट्यांची चर्चा करा.

## ३.१२ संदर्भ


- आगलावे, प्रदीप, अभिजात समाजशास्त्रीय विचार. साईनाथ प्रकाशन,२०१५
- आगलावे, प्रदीप,मूलभूत समाजशास्त्रीय विचार. साईनाथ प्रकाशन,२०१४.


*****

munotes.in

# ४

# आत्महत्येचा सिद्धान्त, धर्म आणि दुर्खीम आजचा वारसा

# (Theory of Suicide, Religion & Legacy of Durkheim Today)

**घटक रचना**


४.० वैशिष्ट्ये

४.१ प्रस्तावना

४.२ आत्महत्येचा सिद्धांत

४.२.१ आत्महत्येसाठी सामाजिक घटक महत्त्वपूर्ण

४.२.२ प्रत्येक मानव समाजात आत्महत्त्या आढळते.

४.३ दुर्खीमच्या आत्महत्येच्या विश्लेषणामधील समाजशास्त्रीय निष्कर्ष

४.४ आत्महत्येचा विचार प्रवाह

४.५ आत्महत्येचे प्रकार

४.५.१ स्वकेंद्रित आत्महत्या

४.५.२ परार्थवादी आत्महत्या

४.५.३ प्रमाणशून्य किंवा असामान्य आत्महत्या

४.६ धर्माचा समाजशास्त्रीय सिद्धांत प्रस्तावना

४.६.१ धर्माचा अर्थ आणि व्याख्या

४.६.२ पवित्र आणि अपवित्रतेची संकल्पना

४.६.३ धर्माच्या उत्पत्तीच्या प्राची सिद्धांतावर टीका

४.६.४ धर्माची उत्पत्ती - सामाजिक व्याख्या

४.६.५ ऑस्ट्रेलियातील अरुण्टा आदिवासींचे अध्ययन

४.७ दुर्खीमचा आजचा वारसा

४.८ सारांश

४.९ प्रश्न

४.१० संदर्भ


## ४.० वैशिष्ट्ये

- एमिल दुर्खिमचा आत्महत्येचा बद्दलचा दृष्टिकोन समजून घेणे.
- एमिल दुर्खिमचा धर्माबद्दलचा दृष्टिकोन समजून घेणे.
- समकाली जगावर आणि समस्यांवर एमिल दुर्खिमचे मत

munotes.in

## ४.१ प्रस्तावना

दुर्खिमने १८९७ मध्ये लिहिलेल्या 'The Suicide' या ग्रंथात आत्महत्येसंबंधी विवेचन केले आहे. एनस्यक्लोपिडीया ऑफ ब्रिटानीका (Encyclopaedia of Britannica) मध्ये आत्महत्या ही आपल्या इच्छेनुसार मुद्दाम केले गेलेले आत्महनन होय अशी व्याख्या करण्यात आलेली आहे. दुर्खिमने आत्महत्या ह्या विषयाचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विश्लेषण केले आहे.

## ४.२ आत्महत्येचा सिद्धांत (Theory of Suicide)

दुर्खीमच्या मते, आत्महत्या हे एक सामाजिक तथ्य आहे आणि इतर सामाजिक तथ्यांप्रमाणे आत्महत्या देखील व्यक्तीबाह्य असून व्यक्तीवर त्याचा दबाव पडत असतो. आत्महत्या ही एक आत्मविनाशाची प्रक्रिया आहे. ही गोष्टी दुर्खीमला मान्य नाही. दुर्खीमच्या दृष्टीकोनातून आत्महत्या हे एक सामाजिक तथ्य आहे. ज्याची सामाजिक कारकाच्या रूपात व्याख्या केली जावू शकते. दुर्खीमने आपल्या या अध्ययनातून असा निष्कर्ष काढला की आत्महत्येकरीता मानसिक, जैवकीय, प्रजातीय भौगोलिक, जलवायू ही कारणे जबाबदार नाहीत. दुर्खीम स्पष्टीपणे म्हणतो की, 'आत्महत्या ही सामाजिक एकीकरणाच्या अभावाचा परिणाम आहे.'

'सामाजिक एकीकरणाच्या अभावामुळेच आत्महत्या घडून येते.' हा दुर्खीमचा निष्कर्ष आहे. समाज हा जितका दुर्बल असेल, तितका व्यक्ती स्वतंत्र होतो. आत्मनिर्भर होण्याचा प्रयत्न करतो आणि आपल्या स्वार्थाची पूर्ती करण्यामध्ये मग्न होतो. परंतु जेव्हा समाज हा संघटीत आणि शक्तीशाली असतो. तेव्हा तो व्यक्तीवर नियंत्रण ठेवतो. त्यांना आपल्या सेवेमध्ये ठेवतो. तसेच त्यांना केवळ आपल्याच इच्छा आकांक्षामध्ये विशेष अभिरूची घेण्यापासून परावृत करतो. अशाप्रकारे त्यांना त्याच्या कर्तव्याचे उल्लंघन करण्यापासून रोखतो. दुर्खीम म्हणतो की 'व्यक्ती आपल्या समाजाप्रती असलेल्या कर्तव्याचे उल्लंघन आत्महत्येद्वारा करतो' या दृष्टीने आत्महत्या हे एक सामाजिक तथ्य आहे. ते मानसिक तथ्य नाही. विशेष म्हणजे आत्महत्या हा सामाजिक एकीकरणाच्या अभावाचा परिणाम आहे.

'सामाजिक एकीकरणाच्या अभावामुळेच आत्महत्या घडून येते.' हा दुर्खीमचा निष्कर्ष आहे. समाज हा जितका दुर्बल असेल, तितका व्यक्ती स्वातंत्र होतो. आत्मनिर्भर होण्याचा प्रयत्न करतो आणि आपल्या स्वार्थाची पूर्ती करण्यामध्ये मग्न होतो. परंतु जेव्हा समाज हा संघटीत आणि शक्तीशाली असतो, तेव्हा तो व्यक्तीवर नियंत्रण ठेवतो. त्यांना आपल्या सेवेमध्ये ठेवतो. तसेच त्यांना केवळ आपल्याच इच्छा, आकांक्षामध्ये विशेष अभिरूची घेण्यापासून परावृत्त करतो. अशा प्रकारे त्यांना त्याच्या कर्तव्याचे उल्लंघन करण्यापासून रोखतो. दुर्खीम म्हणतो कील व्यक्ती आपल्या समाजाप्रती असलेल्या कर्तव्याचे उल्लंघन आत्महत्येद्वारा करतो. या दृष्टीने आत्महत्या हे एक सामाजिक तथ्य आहे, ते मानसिक तथ्य नाही. विशेष म्हणजे आत्महत्या हा सामाजिक एकीकरणाच्या अभावाचा परिणाम आहे.

'आत्महत्या हा सामाजिक एकीकरणाच्या अभावाचा परिणाम आहे.' हे सिद्ध करण्याच्या दृष्टीने दुर्खीमने धार्मिक समूह आणि कुटूंब समूहाची उदाहरणे दिली आहेत. जेथे सामाजिक

munotes.in

एकीकरण असेल, तेथे आत्महत्येची प्रवृती आढळणार नाही. दुर्खीमच्या मते, साधारणतः धर्म हा आत्महत्या घडणार नाही, अशा प्रकारचा प्रभाव ठेवत असतो. कारण धर्म समाज आहे. अर्थात धार्मिक जीवन हे सामूहिक जीवनाचा प्रतिनिधी आहे.

जे कुटूंब संघटीत आणि सुखी आहे, ज्यामधील सर्व सदस्य हे घनिष्ट संबंधाने एकदुसऱ्यांशी बाधलेले आहेत. त्यांच्यात प्रेम आणि सहानुभूतीची भावना असते अशा कुटुंबातील व्यक्ती आत्महत्या करीत नाही. कारण हे कुटूंब एक संघटीत आणि जवळच्या संबंधित व्यक्तीचा एक समूह असतो जो व्यक्तीला आत्महत्ये पासून रोखतो आणि जीवनातील एकाकीपण तसेच वाईट गोष्टींना दूर ठेवतो. याच कारणामुळे विवाहितापेक्षा अविवाहित व्यक्ती जास्त प्रमाणात आत्महत्या करतात.

### ४.२.१ आत्महत्येसाठी सामाजिक घटक महत्त्वपूर्णः

आत्महत्येसाठी सामाजिक घटक किंवा कारक हे अत्याधिक महत्त्वपूर्ण आहे असे दुर्खीमचे मत आहे. दुर्खीमच्या मते, सामाजिक पर्यावरणाच्या काही अवस्थांचा आत्महत्येशी अधिक संबंध असून तो प्रत्यक्ष आणि स्थिर आहे. तर जैवकीय किंवा भौतिक पर्यावरणाच्या तथ्याचा आत्महत्येशी अनिश्चित आणि अस्पष्ट संबंध आहे. आतापर्यंत ज्या समाजशास्त्रज्ञांनी आत्महत्येच्या संदर्भात अध्ययन केले त्यानी आत्महत्येवर भौतिक कारकांचाच प्रभाव महत्त्वपूर्ण मानला. जर स्त्रिया पुरुषांपेक्षा कमी आत्महत्या करतात तर याचे प्रमुख कारण म्हणजे स्त्रिया या पुरुषांपेक्षा सामूहिक अस्तित्वामध्ये फारच कमी सहभाग घेतात. त्यामुळे त्या सामाजिक अस्तित्वाचा चांगला किंवा वाईट प्रभाव कमी प्रमाणात अनुभव करतात. हीच गोष्ट अधिक वय असलेले लोक आणि मुलांच्या संदर्भात लागू पडते. जानेवारी मध्ये आत्महत्या जास्त प्रमाणात घडतात तर त्यानंतर आत्महत्येचे प्रमाण कमी होते. या सर्व तथ्यांच्या आधारांवर असा निष्कर्ष निघतो की, 'सामाजिक आत्महत्येच्या दराची व्याख्या केवळ समाजशास्त्रीय आधारावरच केली जाऊ शकते.' कोणत्याही निश्चित वेळी समाजाचे नैतिक विज्ञान ऐच्छिक मृत्यूकरीता अनुकूल परिस्थिती निर्माण करते. म्हणून प्रत्येक व्यक्ती आपल्यावर विशेष प्रकारच्या शक्तीच्या दबावाचा अनुभव करते, जी त्याला आत्महत्या करण्यास प्रेरीत करते. आत्महत्या करणाऱ्याचे कार्य हे प्राथमिक रूपात त्यांच्या वैयक्तिक स्वभावाला व्यक्त करतांना आढळतात. परंतु वास्तविकतः सामाजिक परिस्थितीच्या पूरक आणि विस्ताराने कार्य होत असते ज्याची बाह्य व्यक्ती ही आत्महत्येच्या रूपाने होत असते.

### ४.२.२ प्रत्येक मानव समाजात आत्महत्या आढळतेः

दुर्खीमच्या मते, प्रत्येक मानव समाजात अधिक किंवा कमी रूपात आत्महत्येची प्रवृत्ती आढळून येते. संपूर्ण सामाजिक समूहाची प्रवृत्ती ही व्यक्तीना प्रभावित करून त्यांना आत्महत्येकरीता प्रेरीत करते. ज्या व्यक्तीगत अनुभवांना साधारणतः आत्महत्येचे प्रमुख कारण मानले जाते तो केवळ असा प्रभाव मात्र आहे की ज्याचा आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीच्या नैतिक प्रवृत्ती मधून घेतला जातो. आणि ही नैतिक प्रवृत्ती स्वतः समाजाच्या नैतिक अवस्थाची प्रतिध्वनी आहे. व्यक्ती आपल्या बाह्य परिस्थितीमुळेच दुःखी किंवा निराश होतो आणि बाह्य परिस्थिती त्याच्या जीवनाची ही किंवा ती घटना नसून तसेच समूह असतो की, ज्याचा तो सदस्य आहे. अशा प्रकारे कोणतीही गोष्ट परिस्थिती किंवा समाज नाही की, जे व्यक्तीला आत्महत्या

munotes.in

करण्यास प्रेरीत करू शकेल. हे तर संपूर्णपणे त्या कारणावर निर्भर असते की, जे आत्महत्येकरिता जबाबदार असून ते इतक्या तीव्रतेने व्यक्तीला प्रभावि करतात.

**आपली प्रगती तपासा**

१) दुर्खीमच्या आत्महत्येच्या सिद्धांताची चर्चा करा.

## ४.३ दुर्खीमच्या आत्महत्येच्या विश्लेषणामधील समाजशास्त्रीय निष्कर्ष (Sociological Conclusions of Durkheim Regarding Suicide)

आत्महत्येच्या संदर्भात दुर्खीमने सामाजिक दृष्टिकोनातून विचार केला. त्यांनी आपल्या सांख्यिकीय सामग्रीच्या आधारावर आत्महत्येसंबंधी काही सामाजिक महत्त्वाचे परिणाम आणि निष्कर्ष मांडले आहेत.

१) लोकसंख्येच्या दृष्टीने प्रत्येक वर्षी आत्महत्येचे प्रमाण बहुतेक एकसारखे आहे.

२) स्त्रियांपेक्षा पुरूष आत्महत्या अधिक प्रमाणात करतात.

३) युवकांपेक्षा वृद्धांमध्ये आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे.

४) ग्रामीण समुदायाच्या तुलनेत नागरी समुदायात आत्महत्येचे प्रमाण अधिक आढळते.

५) विवाहितांपेक्षा अविवाहित, विधूर, विधवा आणि परित्यक्तांमध्ये आत्महत्येचे प्रमाण अधिक आहे.

६) विवाहितांमध्ये अपत्य असलेल्या लोकांपेक्षा अपत्य नसलेल्या लोकांमध्ये आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे.

७) कॅथलिक पंथीय लोकांपेक्षा प्रोटेस्टंटपंथीय लोकांमध्ये आत्महत्येचे प्रमाण अधिक आहे.

८) सैनिक, सामान्य जनतेपेक्षा जास्त आत्महत्या करतात.

९) हिवाळ्यापेक्षा उन्हाळ्यात आत्महत्येचे प्रमाण अधिक आढळते.

## ४.४ आत्महत्येचा विचार प्रवाह (Suicidal Currents)

दुर्खीमने आपल्या अध्ययनातून असा निष्कर्ष मांडला की, 'आत्महत्येचा विचार प्रवाह' (Suicidal Currents) सामजिक संघटनेच्या विविध अवस्थेमधून उत्पन्न होतो आणि त्याच व्यक्तीवर यंत्रासारखा प्रभाव टाकून त्यापैकी काहींना आत्महत्या करण्यास बाध्य करतो. हा आत्महत्येचा विचार प्रवाह व्यक्तीकरीता तितकाच वास्तविक आणि त्यापासून तितकाच वेगळा आहे. ज्या प्रमाणे रोगाद्वारा मृत्यूला आणणारी भौतिक आणि प्राणीशास्त्रीय शक्ती असते.

munotes.in

आत्महत्येच्या विचार प्रवाहामुळे पिडीताची संख्या ही पूर्वनिर्धारित असते. जे सर्वात कमी प्रतिरोध करतात. तेच आत्महत्येला बळी पडतात. रोगाप्रमाणे आत्महत्येमध्ये देखील एक व्यक्तिगत कारक आहे परंतु हे मृत्यूची संख्या निर्धारीत करीत नसून कोण मरेल यांचे निर्धारण करतो. व्यक्तीच्या स्वतः किंवा इतर लोकांना असे वाटत असते की तो व्यक्तीगत प्रेरणामुळे आत्महत्या करीत आहे. परंतु वास्तविकता ही आहे की, तो अनभिज्ञ अशा अवैयक्तिक शक्तीद्वारे आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतो.

## ४.५ आत्महत्येचे प्रकार (Types of Suicide)

दुर्खीमच्या मते, समाजात आत्मकेंद्रीत विचार प्रवाह, पदार्थवादी विचारप्रवाह आणि प्रमाणशुन्य विचार प्रवाह अशा तीन प्रकारचे विचार प्रवाह समाजात आढळतात. या तीन विचार प्रवाहामुळेच व्यक्ती आत्महत्या करतात. या तीन विचार प्रवाहाच्या आधारावरच आत्महत्येचे तीन प्रकार आहेत.

१) स्वकेंद्रित आत्महत्या (Egoistic Suicide)

२) परर्थवादी आत्महत्या (Altuisic Suicide)

३) प्रमाणकशुन्य आत्महत्या (Anomique Suicide)

अशा प्रकारे आत्महत्या ही कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या सामूहिक विघटनाच्या कारहणामुळे होते. विशेष म्हणजे आत्महत्या हे सामाजिक एकमतेच्या अभावाचे प्रतिक आहे. आत्महत्या ही एकांत उपेक्षांची भावना किंवा अत्याधिक व्यक्तिवादाच्या भावनेमुळे घडून येते.

### ४.५.१ स्वकेंद्रित आत्महत्या (Egoistic Suicide):

अशा प्रकारची आत्महत्या म्हणजे आधुनिक मानवाच्या स्वभावविशेषांचा उद्रेक होत. आधुनिक काळत व्यक्ती हा जास्तीत जास्त व्यवहारी, स्वार्थी आणि स्वकेंद्रीत होत आहे. व्यक्ती आपल्या सामाजिक जीवनात घडणाऱ्या गोष्टींचा विचार 'मी' च्या संदर्भात करू लागला आहे. अलीकडे व्यक्तीमध्ये 'मी' किंवा 'अहं' ही भावना विशेष जोडलेली असल्याचे आढळते. दुर्खीमच्या मते, अशा प्रकारची भावना व्यक्तीस समाजापासून वेगळे करते. व्यक्ती सुद्धा स्वतःहा समाजापासून वेगळे समजतो. तो केवळ स्वतःच्या संदर्भातच विचार करून आत्मकेंद्रीत होतो आणि शेवटी हीच भावना किंवा परिस्थिती व्यक्तीस आत्महत्या करण्यास प्रवृत्त करते.

जेव्हा समाजातील इतर लोक हे आप-आपल्या कामात व्यस्त होतात तेव्हा काही लोक असा विचार करतात की, आपली उपेक्षा होत आहे आणि ते स्वतःला अपेक्षित, हीन समजू लागतात. अशावेळी व्यक्ती अंतर्मुख होते. आणि जेव्हा त्यांच्या स्वकेंद्रीत वृत्तीचे प्रमाण अधिक वाढते. तेव्हा ते स्वतःला समाजापासून वेगळे करतात. दुर्खीम म्हणतो की, स्वकेंद्रीत आत्महत्या ही याच परिस्थितीची चरण सीमा होय. अविवाहीत किंवा परित्यक्त लोक अधिक आत्महत्या करतात. कारण कौटूंबिक जीवनापासून त्यांचा संपर्क कमी होतो. प्रोटेस्टंट पंथाचे लोक जास्त प्रमाणात आत्महत्या करतात. कारण त्यांच्यात सामाजिक संपर्क कमी आढळतो. याउलट कॅथालिक पंथाच्या लोकांमध्ये सामूहिक भावना अधिक असते. त्यांच्यात आत्महत्येचे प्रमाण कमी असते. हिवाळ्यापेक्षा उन्हाळ्यामध्ये सामाजिक संपर्क कमी होतो. त्यामुळे उन्हाळ्यात

अधिक प्रमाणात आत्महत्या होत असतात. सामाजिक आंदोलने किंवा युध्दाच्या काळात आत्महत्येचे प्रमाण कमी होते. कारण या वेळी त्यांच्यात सामूहिक भावना जास्त असते. वैयक्तिक गोष्टींना बाजूला सारून सामाजिक आणि इतर कार्यामध्ये लोक अधिक भाग घेतात. सामाजिक एकीकरण वाढते. ह्यामुळे सामाजिक आंदोलने किंवा युद्धाच्या वेळी लोकांमध्ये आत्मकेंद्रीत भावना विशेष आढळत नाही. म्हणून त्यांच्यात आत्महत्येचे प्रमाण अत्यल्प आढळते.

थोडक्यात, ज्यावेळी व्यक्ती केवळ स्वतःच्या संदर्भात विचार करते. त्यांच्यात स्वकेंद्रीत प्रवृत्ती वाढते त्यावेळी ते स्वतःहा समाज किंवा समूहापासून अलिप्त करतात. या परिस्थितीमुळे जी आत्महत्या घडून येते त्यास स्वकेंद्रीत आत्महत्या असे म्हणतात.

### ४.५.२ परार्थवादी आत्महत्या (Altuisic Suicide):

व्यक्ती समाज किंवा समूहामध्ये इतका मिसळून जातो की, त्याचे संपूर्ण व्यक्तीत्व समाज किंवा समूहामध्ये एकरूप होते. त्यांचे स्वतःचे काही मूल्य रहात नाही. तो केवळ समूहाचा एक सदस्य मात्र रहातो. जो पूर्णपणे समूहाद्वारा नियंत्रित होतो. अशा परिस्थितीमध्ये व्यक्तीत्वाचे अस्तित्व संपुष्टात येते. तो समाज किंवा समूहाच्या दृष्टीने विचार करतो. बघतो किंवा काही कार्य करीत असतो. याच गोष्टीकडे मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून बघितले तर असे म्हणता येईल की, व्यक्तीमध्ये समूहाच्या प्रती एका अशा उत्तरदायित्वाच्या भावनांचा विकास होतो की, व्यक्ती समूहाकरीता कोणत्याही वेळी आवश्यकता पडल्यास प्राण देण्यास तयार होती. भारतातील 'सती प्रथा' आणि जपानमधील 'हरा-किरी' ची प्रथा या परार्थवादी आत्महत्येचे उदाहरण होय.

देश किंवा राष्ट्राकरीता बलिदान करणारे सैनिक, जहाजाबरोबर जलसमाधी घेणारे कप्तान ही सर्व परार्थवादी आत्महत्येचे उदाहरणे होत सिलोनमधील 'लिट्टे' नावाची एक संघटना आहे. या संघटनेमध्ये काही कार्यकर्त्यांचा एक गट आहे की ते आपल्या संघटनेसाठी मरायला तयार असतात. यावरून हे स्पष्ट होते की, गट सामाजाशी व्यक्ती एकरूप होते आणि ती स्वतःचा विचार न करता केवळ गट किंवा समाजाचाच विचार करते तेव्हा व्यक्तीमध्ये परार्थवादी भावना निर्माण होते. या परार्थवादी भावनेमुळे लोक आत्महत्या करतात.

परार्थवादी आत्महत्येच्या संदर्भात पारसन्स (Parsons) म्हणतो की, 'परार्थवादी आत्महत्या' ही सामूहिक आत्महत्येचे प्रदर्शन आहे की, ज्यामध्ये व्यक्ती वैयक्तिक हितांना सामूहिक हिताखाली दाबून ठेवण्यामध्ये समर्थ होतो जो सामूहिक जीवनापेक्षा वैयक्तिक जीवनाकरीता खालच्या पातळीवरचे मूल्यांकन करतो.'

### ४.६.३ प्रमाणशून्य किंवा असामान्य आत्महत्या (Anomic Suicide):

दुर्खीमच्या मते, जेव्हा समाजाची संरचना, सामाजिक संतुलन किंवा समाजाच्या नैतिक संघटनामध्ये अचानक किंवा अस्वाभाविक परिवर्तन घडून येते. आणि समाजाचे सदस्य या नवीन परिवर्तनाशी समायोजन करण्यामध्ये अयशस्वी होतात तेव्हा आर्थिक मानसिक अशांतता आणि तणावाचा अनुभव व्यक्ती करू लागतो आणि यामधून मुक्ती मिळविण्यासाठी व्यक्ती आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात.



munotes.in

अशा प्रकारची आत्महत्या ही प्रामुख्याने कौटूंबिक कार्यामध्ये असलेल्या व्यक्तीच अधिक प्रमाणात करतात. दुर्खीमच्या मते, निराशा, व्यापारात अपयश, अर्थिक संकट इत्यादीमुळे आत्महत्येच्या प्रमाणात वृद्धी होते. अचानक एखाद्या व्यक्तीला संपती मिळणे किंवा अचानक श्रीमंत व्यक्तीवर आर्थिक संकट कोसळणे या दोन्ही गोष्टी आत्महत्येसाठी कारणीभूत आहेत. या दोन्ही अवस्थांमध्ये बहुतांश लोक अचानकपणे आपल्या सामाजिक पर्यावरणाच्या काही मुख्य वैशिष्टयापासून अव्यवस्थित होतात. व्यापारात नुकसान झाल्यामुळे त्या व्यक्तीचा जीवन स्तर हा कनिष्ठ प्रतीचा होतो. आकस्मिक संपन्नता आल्यामुळे जी गोष्ट शक्य नव्हती ती शक्य होते. परंतु या दोन्ही अवस्थांमध्ये साधने, प्रयत्न आणि यशामधील संबंध विस्कळीत होतात. त्यामुळे लोक विवेकशून्य होतात.

दुर्खीमच्या मते, अर्थिक संकटामध्ये व्यक्ती असंतुलीत होणे किवा भ्रमिष्ट होणे स्वाभाविकच आहे. परंतु अस्वाभाविक संपन्नतेमुळे असे का होते? या संदर्भात उत्तर देतांना दुर्खीम म्हणतो की, सुरक्षिततेची भावना आणि उद्दिष्टाच्या दृष्टीने प्रगती केवळ साधनावर पुरेसे नियंत्रण ठेवण्यावरच अवलंबून नाही तर उद्दिष्ट किंवा साधनांच्या स्पष्टतेवर देखील निर्भर असते. जेव्हा आकस्मिकपणे व्यक्तीला धनाची प्राप्ती होते तेव्हा त्याच्याकरीता जगातील प्रत्येक वस्तू किंवा गोष्टी ही शक्य वाटू लागते आणि त्याच्या इच्छा या अनंत होतात. जर व्यक्तीला आनंद प्राप्त करायचा असेल तर त्याने आपल्या इच्छा मर्यादित ठेवल्या पाहिजे आणि त्याने स्वतः नियमाने राहिले पाहिजे. दुर्खीमच्या मते, या नियमाचा भंग झाल्यामुळे आत्महत्या घडून येते.

**आपली प्रगती तपासा**

१) दुर्खीमच्या सिद्धांतातील आत्महत्येच्या प्रकारांची चर्चा करा.

## ४.८ धर्माचा समाजशास्त्रीय सिद्धांत (Theory of Sociological Religion)

दुर्खीमने धर्मसंबंधाचे विचार 'The Elementary Forms of Religious life' या ग्रंखात मांडले आहे. ऑस्ट्रेलिया मधील 'अरुण्टा' या आदिम जमातीच्या धार्मिक संस्थेच्या अध्ययनावर दुर्खीमचा धर्माचा सिद्धांत आधारीत आहे. दुर्खीमच्या मते, 'धर्म संपूर्णता एक सामाजिक वस्तू आहे. धर्मिक विचार आणि क्रिया या सामाजिक समूहाच्या मानयताची अभिव्यक्ती आहे. धर्म हा नैतिक रूपात समाजाच्या सामूहिक जाणीवेचे प्रतिक आहे.

### ४.६.१ धर्माचा अर्थ आणि व्याख्या (Meaning and Definition of Religion):

दुर्खीमने आपल्या ग्रंथात धर्माच्या उत्पत्तीचे स्त्रोत, स्वरूप आणि त्यामधील परिवर्तनाची सामाजिक व्याख्या प्रस्तूत केली आहे. दुर्खीमने त्यावेळी प्रचलीत धर्माच्या संकल्पनेची टीका केली आणि या संकल्पना अपूर्ण असल्याचे प्रतिपादन केले होते. त्यावेळी ईश्वर किंवा अलौकिक शक्तीवरील विश्वास म्हणजेच धर्म होय असे मानले जात होते. दुर्खीमने धर्माची

पुढील प्रमाणे व्याख्या केली आहे. दुर्खीमच्या मते, ''पवित्र असणाऱ्या म्हणजेच सोवळ्या वा निषिद्ध मानल्या जाणाऱ्या वस्तूप्रती असलेला विश्वास व कृतीमधील परस्परावलंबित्वातून उत्पन्न होणारी व्यवस्था म्हणजे धर्म होय. अशा विश्वासांना अनुसरणाऱ्या व प्रथा पाळणाऱ्या व्यक्तींना धर्म चर्च सारख्या नैतिक लोकसमूहात संघटीत करीत असतो." (A religion is a unified system of boliefs and practices relative to sacred things that is to say, things set apart and forbidden beliefs and prtictices which unite into on single moral community called a church, all those who adhere to them emile durkheim)

धर्माचा वरील व्याख्येवरून हे स्पष्ट होते की, धर्म हे एक सामाजिक तथ्य आहे आणि ती एक समाजाची फार मोठी संस्था आहे. दुर्खीमने धर्माला एक सामाजिक तथ्य मानले आहे. आणि म्हणूनच त्यानी, धर्म ही प्रामुख्याने सामाजिक वस्तू झाली पाहिजे असे म्हटले आहे.

### ४.६.२ पवित्र आणि अपवित्रतेची संकल्पना (Concept of sacred and profane):

दुर्खीमने समाजातील संपूर्ण वस्तू आणि घटनांना दोन भागात विभाजित केले आहे.

**१) पवित्र (acred):**

**२) अपवित्र (Profane)**

दुर्खीमच्या मते, धर्म अशा वस्तू घटना आणि व्यवहारांशी संबंधित आहे की ज्याना पवित्र मानले जाते. पवित्र वस्तू वा समाज किंवा सामुहिक प्रतिनिधित्वाचे प्रतिक असते. त्यामुळे व्यक्ती नेहमीच पवित्र वस्तूपेक्षा स्वतःला कनिष्ठ मानतो आणि त्यावर अवलंबून असतो.

'पवित्र वस्तू अशा आहेत की, ज्याचे निषेध संरक्षण करतो तर अपवित्र वस्तू म्हणजे, ज्यांना निषेध लागू होतो. त्यामुळे पहिल्या वस्तूपासून ह्या वस्तूला वेगळे ठेवले जाते. (The Sacred things, are those which the interdictions protect and isolate, profane things, those to which these interdictions are applied and which must remain at a distance from the first. Emile Durkheim) अशी दुर्खीमने पवित्र आणि अपवित्रेची व्याख्या केली आहे.

पवित्र आणि अपवित्र या दोन्ही वस्तू एक दुसऱ्याच्या विरोधी आहे. सामाजिक घटनेच्या या दोन्ही भागांना कधीही एकत्र मिसळू दिल्या जात नाही. या दोन्ही गोष्टींना एकत्र करणे म्हणजे धर्मिक भ्रष्टाचार मानला जातो. पवित्र वस्तू किंवा विचारांचे रक्षण ज्या सामाजिक विश्वास, विधी-विधान, कर्मकांड, संस्काराद्वारे होते. त्यास धर्म म्हटले आहे. म्हणून दुर्खीम स्पष्ट करतो की, अशाप्रकारे धर्माची उत्पत्ती ही अशा सामाजिक विचार आणि विश्वातून होते की, ज्यांना समाज पवित्र मानतो.

### ४.६.३ धर्माच्या उत्पत्तीच्या प्राची सिद्धांतावर टीका (Criticism on old Theories of Origion of Religion)

दुर्खीमने धर्माच्या उत्पत्तीच्या संदर्भातील विचार मांडण्यापूर्वी धर्माच्या उत्पात्तीच्या प्राचीन सिद्धातांवर टीका केली. धर्माच्या वैयक्तिक आणि मानसशास्त्रीय सिद्धांताचे दुर्खीमने खंडन

केले. टायलरचा आत्मवाद आणि मैक्समूलरचा प्रकृतीवाद या प्रमुख दोन सिद्धांताचे त्यानी पुढील प्रमाणे खंडन केले आहे.

**१) टायलरचा आत्मवाद :** टायलरच्या मते आदिम मानवापासून तर सभ्य मानवापर्यंतच्या धर्माच्या विचारांचा आधार हा आत्मा आहे. हा आत्मवाद किंवा जीववाद (Animism) दोन प्रमुख विश्वासामध्ये विभाजित झाला आहे.

अ) मानवाच्या आत्म्याचे अस्तित्व हे मृत्यू किंवा शरीर नष्ट झाल्यानंतर देखील कायम राहते.

ब) मानवाच्या आत्म्याव्यतिरिक्त शक्तीशाली देवतांचे इतर आत्मे असतात. टायलर म्हणतो की, प्रत्येक दिवशी जीवनाशी संबंधित दोन प्रकारच्या अनुभवामुळे आत्म्याची कल्पना निर्माण झाली. मृत्यू आणि स्वप्न हे दोन प्रकारचे अनुभव होत. पहिल्या अनुभवाच्या आधारावर शरीर आत्मा (Body Soul) आणि दुसऱ्या प्रकारच्या आधारावर स्वतंत्र आत्मा (Free Soul) ची कल्पना निर्माण झाली.आत्मा अमर आणि मानवाच्या नियंत्रणाच्या बाहेर आहे. म्हणूनच पूर्वजांची प्रथा सुरू झाली. तेथूनच धर्माची निर्मिती झाली.

दुर्खीम निसर्गवादी, निसर्गपूजक अशा धर्माला योग्य मानत नाही. त्याच्या मते धर्माचे रूप हे निसर्गपूजा नाही. धर्म हा मानव जीवनास प्रभावित करणारी एक अद्‌वितीय शक्ती आहे.

दुर्खीमने धर्माच्या प्राचीन सिद्धांताच्या संदर्भात पुढील प्रकारच्या तीन टीका केल्या आहेत.

१) हे सिद्धांत धर्मिक घटनाच्या संपूर्ण भागापैकी केवळ एकाच भागाचा विचार करतात.

२) पवित्र आणि अपवित्रतेच्या संदर्भात हे सिद्धांत कोणताच प्रकाश टाकीत नाही. कारण पवित्रता हे धर्माचे प्रमुख वैशिष्टय आहे.

३) हे सिद्धांत धर्माची व्याख्या मायाजालाच्या (Illusion) रूपात करतात. खरे तर त्याचा वास्तविक जगाशी कोणताच संबंध नसतो.

### ४.६.४ धर्माची उत्पत्ती - सामाजिक व्याख्या (Origin of Religion Social Definition):

प्राचीन सिद्धांताचे खंडन करून दुर्खीमने धर्माची सामाजिक व्याख्या प्रस्तूत केली. दुर्खीमच्या मते ''धर्माचा स्त्रोत हा स्वतः समाज आहे. धर्मिक धारणा या समाजाच्या वैशिष्ट्याच्या प्रतिकाव्यतिरिक्त कीहीच नाही. पवित्र किंवा ईश्वर केवळ मूर्तरूप समाज आहे आणि धर्माचे सामाजिक कार्य हे सामाजिक एकतेची उत्पत्ती, संरक्षण आणि स्थिरता आहे. 'जर सामाजिक एकता असेल तर धर्म राहील. जरी त्याचे मूर्त स्वरूप बदलले तरी त्याचा सार प्राचीन काळापासूनच अस्तित्वात आहे.

समाज आणि ईश्वर या दोहोच्या प्रती मानवाची मनोवृत्ती सारखी असते असे दुर्खीमने प्रतिपादन केले आहे. समाज आपल्या सदस्यांच्या मनामध्ये देवत्वाची जाणीव जागृत करण्यामध्ये अति सुक्ष्म आहे. कारण त्याचा त्यांच्यावर अधिकार असतो. ईश्वराप्रमाणेच समाजाजवळ नैतिक



munotes.in

सत्ता असते. ज्यामुळे समाज लोकांमध्ये निस्वार्थ भक्ती आणि आत्मत्यागास जागृत करतो. यामध्ये व्यक्तीला असाधारण शक्ती प्रदान करण्याचे सामर्थ्य असते. आणि हाच या सर्वांचा मूळ स्त्रोत आहे. जो मानवाच्या व्यक्तित्वाकरीता सर्वोत्तम आणि श्रेष्ठ आहे. स्वर्गाची सृष्टी विभूतीमान समाज आहे. म्हणूनच जो धार्मिक मनुष्य कोणत्या बाह्य नैतिक शक्तीवर विश्वास करतो तो कोणत्याही प्रकारच्या भ्रमामध्ये नाही कारण अशा प्रकारची शक्ती किंवा सत्तेचे अस्तित्व आहे. आणि ती शक्ती म्हणजे समाज होय.

**आपली प्रगती तपासा.**

१) धर्माच्या सिद्धांताची अर्थ व व्याख्या सांगा.

---

---

---

---

---

### ४.६.५ ऑस्ट्रेलियातील अरुण्टा आदिवासींचे अध्ययन (Study of Arunta Tribe of Austrlia):

दुर्खीमच्या मते, 'धर्म सामूहिक आणि समूह उत्तेजनामुळे निर्माण झाला आहे. हे सिद्ध करण्यासाठी दुर्खीमने ऑस्ट्रेलियामधील 'अरुण्टा' आदिवासीचे सविस्तर अध्ययन केले आहे. अरुण्टा आदिवासीमधील प्रचलीत असलेल्या टोटम प्रथेच्या आधारावर दुर्खीमने धर्माच्या उत्पतीचा शोध घेतला आहे. दुर्खीम स्पष्ट करतो की, अरुण्टा आदिवासी ही सर्वात अधिक प्राचीन जमात आहे. त्यामुळे त्यांच्या धार्मिक प्रथा या धर्माच्या आदिम स्वरूपाला साध्या रूपात व्यक्त करतात. म्हणून अरूण्टा आदिवासीमध्ये आढळणारा धर्म इतर सर्व धर्माची व्याख्या करण्यास समर्थ आहे.

टोटम - दुर्खीमच्या अनुसार टोटम अशा सामाजिक संघटन, जादू आणि धर्माच्या प्रणालीचे नाव आहे की, ज्याद्वारा कोणतीही जमात (आदिवासी) आपले गोत्र किंवा वंशाचा संबंध कोणत्यातरी जिवंत किंवा निर्जिव वस्तूंशी जोडत असतो. याचाच अर्थ टोटन अशा विश्वास किंवा कल्पनेस व्हणतात की ज्याच्या अनुसार मानव समुदायाचा कोणत्याही वनस्पती, पशू किंवा कधी कधी कोणत्या अद्भूत भौतिक पदार्थासोबत दैवी संबंध जोडले जातात. यावरून हे स्पष्ट होते की, टोटमच्या मागे कोणत्या तरी पवित्र किंवा अपवित्र शक्तीवरील विश्वास असतो. ज्यामुळे ती वस्तू जीवित मानली जाते. आणि जी टोटमच्या निषेधाचा भाग केल्यावर भौतिक नियमाना तसेच नैतिक उत्तरदायित्वाला जन्म देते. टोटम विषयी व्यक्तीला जो आदर, भय, श्रद्धा, भीती इत्यादीची भावना निर्माण होते त्याचे कारण टोटमचे भौतिक वैशिष्टय नसते. टोटम हे पशू किंवा वृक्ष असतात हे हानीकारक नाहीत. म्हणून टोटम एक प्रतिक मानले जाते.

१) पहिली गोष्ट म्हणजे हे पवित्र टोटम टोटमवादी सिद्धात किंवा ईश्वराचे प्रतिकीकरण करतात.

२) दुसरी गोष्टी म्हणजे हे स्वतःचे देखील प्रतिकीकरण करतात. ज्यामुळे गोत्र ओळखले जाते.

यावरून दुर्खीमने असा निष्कर्ष काढला की, टोटमचे देवत्व (Divinity) आणि गोत्र (Clan) हे वस्तूतः एकच वस्तू आहे. आणि सर्वसामान्यपणे असे म्हणता येईल की, ईश्वर हा केवळ समाजाची प्रतिकात्मक अभिव्यक्ती आहे.

दुर्खीमने अरुण्टा आदिवासीच्या सामाजिक जीवनाच्या दोन वेगवेगळ्या बाजूंचा किंवा पक्षाचा उल्लेख केला आहे.

**अ) धर्मनिरपेक्ष बाजू (Secular Aspect)**: दुर्खीमच्या मते पहिली बाजू ही धर्मनिरपेक्ष आहे. यामध्ये गोत्र लहान-लहान समुहामध्ये विभाजित झालेले असते. या समुहाचे सदस्य आपल्या खाजगी अर्थिक उद्दिष्टांच्या प्राप्तीकरीता कार्य करतात त्याचे जीवन हे सारखे, व्यवस्थित आणि निरुत्साही असते.

**ब) आर्थिक बाजू (Religious Aspect) :** संपूर्ण गोत्राचे सर्व सदस्य एका ठिकाणी काही विशिष्ट प्रसंगी एकत्रित येतात. त्यावेळी संपूर्ण लोकांमध्ये इतर दिवसापेक्षा अधिक उत्साह, प्रेरणा आणि सक्रीयता आढळून येते. अशा सामुहिक कार्यक्रमात लोकांमध्ये अशी विद्युत शक्ती संचालित होते की, लोक असाधारण पद्धतीने उत्तेजित होतात. आणि असामान्य आचरण करू लागतात. अशा सामूहिक कार्यक्रमामध्ये व्यक्तीने निषेधाची उपेक्षा केली तरी, त्या परिस्थितीमध्ये तो अपराध मानला जात नाही. तर समुहाचे कार्य मानले जाते. या निरीक्षणातून दुर्खीमने असा निष्कर्ष काढला की, अशा प्रकारची उत्तेजित भावना आणि सामाजिक वातावरणामध्ये धर्मिक विचार निर्माण होतात.

दुर्खीमच्या मते ही गोष्ट सहजपणे समजून घेता येते की, जेव्हा व्यक्ती आपल्या उत्तेजनाच्या अवस्थेत उच्च शिखरावर जातो. जेव्हा तो हे विसरून जातो की त्याचे देखील स्वतःचे काही अस्तित्व आहे. म्हणून तो आपल्यावर कोणत्या तरी बाह्य शक्तीचे प्रभुत्व असल्याचे मानतो आणि त्या शक्तीमुळेच त्याच्या प्रत्येक क्रिया संचालीत होतात ही शक्तीच त्याला वेगवेगळ्या प्रकारे विचार करण्यास आणि कार्य करण्यास प्रेरीत करते. तो सर्वसामान्य परिस्थितीत जे करू शकला नसता, ते तो या परिस्थितीत करतो. त्यामुळे तो अशी कल्पना करतो की आता आपले वेगळे अस्तित्व नाही. त्याना असे वाटू लागते की, तो आता एक नवीन प्राणी झाला आहे. त्याचे इतर सोबती सुद्धा आपल्याला अशाच प्रकारे अभिव्यक्त करतात. संपूर्ण परिस्थिती ही अशा प्रकारची होते की प्रत्येक व्यक्तीला असा अनुभव होऊ लागतो की तो एका नवीन जगामध्ये आला आहे. हे जग तो राहत असलेल्या जगापेक्षा बिलकुल अलग आहे. जेव्हा अशा प्रकारचे अनुभव प्रत्येक दिवशी आणि प्रत्येक आठवड्यात येऊ लागतात. तेव्हा त्याला असा विश्वास वाटतो की दोन वेगवेगळ्या जगाचे वेगवेगळे अस्तित्व आहे. हे जग असे आहे की, जोपर्यंत त्याचा अद्‌भूत शक्तीशी संबंध प्रस्थापित होत नाही तोपर्यंत तो त्यामध्ये प्रवेश करू शकत नाही. पहिले जग हे अपवित्र तर दुसरे जग हे पवित्र असते.

अशा प्रकारचे दुर्खीमने धर्मासंबधीचे विचार मांडले आहेत. यावरून हे स्पष्ट होते की, सर्व धर्माचा आधार हा आदिमकालीन टोटम प्रथा आहे. म्हणजेच टोटमपासूनच धर्माची उत्पत्ती झाली.

**धर्माचे कार्य (Functions of Religions):**

दुर्खीमने धर्माचे पुढील कार्य सांगितले आहे.

१) धर्म मानवी जीवनाला पवित्र आणि अपवित्र अशा दोन पक्षांमध्ये विभाजित करतो.

२) धर्म आपल्या सदस्यांना पवित्र जीवन दूर होणे म्हणजेच धार्मिक भ्रष्टाचार होय.

३) सामान्य अपवित्र कार्य करणारे स्थान हे धर्माच्या स्थानापासून वेगळे असले पाहिजे आणि दैनंदिन उपयोगाकरीता धार्मिक स्थानाचा वापर करता कामा नये. अशा प्रकारचे शिक्षण धर्म लोकांना देतो.

४) धर्म अपवित्र कार्य केल्यास धार्मिक शुद्धी करण्या आदेश देतो.

५) धर्म समाजाला संघटीत आणि नियंत्रित करीत असतो.

## ४.७ दुर्खीमचा आजचा वारसा

अचानक औद्योगिकीकरण आणि शहरी भागात कुटूंबियांच्या मोठ्या प्रमाणात हालचाली होत असताना दुर्खीमने सामाजिक नियमांच्या अभावाचे वर्णन केले आहे. याचा परिणाम असा झाला की व्यक्ती आणि समुदाय यांच्यातील संबंध खंडित झाले. अशा प्रकारे सामाजिक अस्मितेचे तुकडे होऊन एकाकीपणाची भावना निर्माण झाली. (Boundless 2014)

अलिकडील कोविड १९ रोग सर्व जगभर पसरलेला असताना या काळात हे नियम कसे मोडले गेले आणि समाजात सर्वत्र संकट कसे निर्माण झाले हे संपूर्ण जगाने पाहिले. आदर आणि सोबत या भावनेने न पाहता प्रत्येक जण एकमेकांकडे संशयाच्या भावनेन पाहत होते. महामारीचे हे संकट असतांना सरकारची भूमिका कळाली. अल्पसंख्याक लोक चालत त्यांच्या गावी परत जात होते. त्यांना सर्वात जात त्रास सहन करावा लागला. याला दुर्खीमने नैतिकतेचा अभाव किंवा सामान्य राज्य म्हटले आहे. त्याचा सिद्धांत विकसित करण्यासाठी दुर्खीमची पार्श्वभूमी अशी होती की तो औद्योगिकीकरणाच्या काळातला होता. पण त्या संबंध आजच्या काळातही लागू होत आहे. आत्महत्येबाबत दुर्खीमचे दृष्टिकोन फारच प्रासंगिक आहे. आजही संकटाच्या परिस्थितीतून लोकांनी आत्महत्या केल्या आहेत. दुर्खीमचे निराकरण म्हणजे व्यावसायिक समुदाय आणि एकतावादी ओळख तयार करून सर्वसाधारण प्रणालीचे निराकरण करणे (Szelenyi 2009). सामुहिक चेतना, एकता याविषयी दुर्खीमची संकल्पना आजही संबंधित आहे. लोकांनी एकमेकांशी कार्य करत राहिल्यामुळे सामान्य उद्दीष्टे साकार होत आहेत. ही सामाजिक ध्येय म्हणजे आनंद, भरभराट, जीवन जगण्याचा उत्तम दर्जा २१ व्या शतकात दुर्खीमचे कामगारांच्या विभाजनाची संकल्पना प्रासंगिक आहे. धर्माविषयाची दुर्खीमचे दृष्य जिथे लोक कुलदैवताची पूजा करतात आणि त्यास अर्थ जोडतात ते अजूनही संबंधित आहेत, भारत आणि जगाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये कुलदैवताची चिन्हे, मूर्ती, विधी अजूनही चालू आहेत.

munotes.in

## ४.८ सारांश

एमिल डरखाईमला समाजशास्त्राच्या अभ्यासाच्या एका विशेष कार्यक्षेत्राचा ध्यास होता. त्याने एक व्यवस्थित वैज्ञानिक कार्यपद्धती प्रस्थापित केली आणि संरचनात्मक कार्यकेंद्रितता (स्ट्रक्चरल फंक्शनलीझम) चा पाया घातला जी आज समाजशास्त्रातील प्रबल उपशाखा आहे. डरखाईमने अन्य श्रेष्ठ समाजशास्त्रीय सैद्धातिकांपेक्षा जास्त सुसंबद्ध सिद्धांत मांडला. त्याने एक आटोपशीर आणि स्पष्ट सैद्धांतिक मांडणी केली आणि तिचा वापर विशिष्ट कार्यामध्ये केला. समाजशास्त्रामध्ये डरखाईमचा आत्महत्येचा अभ्यास विशेष महत्त्वपूर्ण आहे. डरखाईमच्या मते, आत्महत्या ही व्यक्तीगत कृती आणि त्याचबरोबर सामाजिक घटनासुद्धा आहे. आत्महत्येच्या दरांमधील विभिन्न कल दर्शवण्यासाठी डरखाईमने संख्याशास्त्र वापरले. हे काल दर्शवतात की, आत्महत्येचा दर सामाजिक एकात्मतेच्या पातळीशी संबंधित आहे आणि जेव्हा व्यक्तीला फार कमी किंवा फार जास्त एकात्मता जाणवतेय त्यावेळी आत्महत्या होतात. समाजातील श्रम विभाजन आणि नियमानुसार एकीकरणाच्या ह्या पातळ्या निश्चित केल्या जातात.

**आपली प्रगती तपासा**

१) दुर्खीमने केलेल्या ऑस्ट्रेलियातील अरुण्टा आदिवासींचे अध्ययन थोडक्यात लिहा.

## ४.९ प्रश्न

१) आत्महत्या यावरील दुर्खीमच्या कार्याचे परीक्षण करा.

२) धर्माच्या उत्पत्ती संबंधात दुर्खीमचे विचार तुमच्या शब्दात लिहा.

३) दुर्खीमचे विचार आजच्या काळातील प्रासंगिकतेवर प्रकाश टाकणारे आहेत ह्यावर चर्चा करा.

## ४.१० संदर्भ


- आगलावे, प्रदीप, अभिजात समाजशास्त्रीय विचार, साईनाथ प्रकाशन, २०१५.
- आगलावे, प्रदीप, समाजशास्त्र / एम. पी. एस.सी./ नेट-सेट, साईनाथ प्रकाशन, २०१५
- आगलावे, प्रदीप, मूलभूत समाजशास्त्रीय विचार, साईनाथ प्रकाशन, २०१४.


*****

# ५

# पद्धतीशास्त्रीय योगदान आणि सामाजिक क्रियांचा सिद्धांत

# (Methodological Contributions & Theory of Social Actions)

**प्रकरण रचना**


५.० उद्दिष्टे

५. १ परिचय

५.२ मॅक्स वेबरचे संक्षप्ति चित्रण

५.३ कार्यप्रणाली

५.३.१ वर्स्टीन / आकलन / अंतर्बोध

५.३.२ आदर्श प्रकार

५.४ युक्तिवाद / तर्कसंगतता

५.५ नोकरशाही

५.६ निराशा

५.७ लोखंडी पिंजरा

५. ८ सामाजिक कृती

५. ९ सारांश

५.१० प्रश्न

५.११ संदर्भ साहित्य


munotes.in

## ५.० उद्दिष्टे

- वेबर यांनी वापरलेली पद्धतीशास्त्र समजून घेणे.
- व्हर्स्टीन/ अंतर्बोध व आदर्शप्रकारांचा अर्थ समजून घेणे.
- तर्कसंगतता आणि नोकरशाही समजून घेण्यासाठी वेबरच्या योगदानाचे मूल्यांकन करणे.
- विच्छेदन आणि लोखंडी पिंजरा संकल्पना समजून घेणे
- वेबर यांनी स्पष्ट केलेल्या सामाजिक क्रियेचे प्रकार समजून घेणे

## ५.१ परिचय (Introduction )

मॅक्स वेबर (१८६४ – १९२० ) केवळ समाजशास्त्रज्ञ नव्हते तर त्यांची आवड अर्थशास्त्र, संगीत, कायदा, तत्वज्ञान आणि इतिहासातही अभिरुची होती. आपल्या काळातील समाजशास्त्रज्ञांसारखे वेबर यांना सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप आणि कारणे समजून घेण्यात रस होता. त्यांचे बरेच काम आधुनिक भांडवलशाहीच्या विकासाशी आणि आधुनिक समाज सामाजिक संघटनेच्या पूर्वीच्या रूपांपेक्षा भिन्न होते. अनुभवजन्य अभ्यासाच्या मालिकेद्वारे वेबर यांनी आधुनिक औद्योगिक संस्थांची काही मूलभूत वैशिष्ट्ये मांडली आणि आज समाजशास्त्रज्ञांसाठी महत्त्वपूर्ण ठरलेल्या महत्त्वाच्या समाजशास्त्रीय वादविवादास ओळखले होते. वेबर यांच्या दृष्टीने, आर्थिक घटक महत्त्वपूर्ण आहेत, परंतु कल्पना आणि मूल्यांचा सामाजिक परिवर्तनावर तितकाच प्रभाव आहे.

## ५.२ मॅक्स वेबरचे संक्षप्ति चित्रण (Brief Sketch of Max Weber)

मॅक्स वेबर यांचा जन्म जर्मनीच्या एरफर्ट येथे १८६४ मध्ये मध्यमवर्गीय कुटुंबात झाला होता. त्याच्या पालकांबद्दलच्या जगाच्या संदर्भातील दृष्टीतील गंभीर मतभेदांचा त्यांच्या बौद्धिक आणि मानसिक प्रगतीवर खोलवर परिणाम झाला. त्यांचे वडील एक महत्त्वाचे राजकीय पद असलेले नोकरशहा होते. ते त्यांच्या पत्नीपेक्षा अगदी भिन्न विचारसरणीचे होते. ती पतीकडून मिळणाऱ्या ऐहिक आनंदांपासून मुक्त असे तपस्वी जीवन जगणारी धर्मनिष्ठ कॅल्व्हनिस्ट होती.

वयाच्या १८ व्या वर्षी मॅक्स वेबर हेडेलबर्ग विद्यापीठात प्रवेश घेण्यासाठी अल्पकाळ घर सोडून राहिले. सैन्यात वर्ष घालवण्यापूर्वी वेबर यांनी हेडलबर्ग विद्यापीठात तीन सत्रांकारिता कायदा, इतिहास, तत्वज्ञान आणि अर्थशास्त्र यांचा अभ्यास केला. १८८४ मध्ये जेव्हा त्यांनी पुन्हा अभ्यास सुरू केला, तेव्हा ते बर्लिन विद्यापीठात गेले आणि गौटीन्जेन येथे एक सत्र घालवले. त्यांनी १८८९ मध्ये पीएच.डी. प्राप्त केली. ते वकील झाले आणि बर्लिन विद्यापीठात शिकवू लागले.

वेबर यांच्या जीवनात एक तणाव निर्माण झाला त्याचे कारण वडिलांचे नोकरशाही मानसिकतेचे कार्य आणि त्यांच्या आईच्या धार्मिकतेत होते. हा निराकरण न झालेला तणाव त्याच्या वैयक्तिक आयुष्यात जसा झळकतो तसा वेबर यांच्या कार्यात झळकत होता.

## ५.३ वेबर यांचे पद्धतीशास्त्र (Methodology)

वेबर यांच्या सामाजशास्त्रीय योगदानापूर्वी कान्ट, हेगेल, कॉम्प्ट, सेंट सायमन, दुरखीम, मार्क्स यांच्यापद्धती शास्त्रीय परंपरा होत्या. कान्ट आणि हेगेल यांनी विकसित केलेल्या आदर्शवादी आणि तर्कसंगत पद्धतीने मूल्य विधानातील फरक वाढविला. जे स्पष्ट करते तथ्य काय आहे आणि जे काय असावे याची वस्तुस्थिती दर्शविते. मानवी मनाचा उपयोग या दोहोंमधील द्वैद्वक्रिया दर्शवितो. कॉम्प्ट यांनी वापरलेल्या सकारात्मकतेच्या पद्धतीद्वारा असे सूचित केले जाते की वास्तविकते विषयी ज्ञान अनुभवजन्य किंवा सकारात्मकतावादी पद्धतीद्वारे समजू



munotes.in

शकते. सकारात्मकतावाद  असा विश्वास ठेवते की विज्ञानाचा संबंध केवळ अनुभवासाठी ज्ञात असलेल्या संस्थांशीच संबंध असावा. काळजीपूर्वक निरीक्षणाच्या आधारावर, एखादी व्यक्ती कायद्यांचे अनुमान काढू शकते जी अनुभवलेल्या घटनेमधील संबंध स्पष्ट करते. सकारात्मकतेने समाजशास्त्र क्षेत्रात नैसर्गिक विज्ञानाची कार्यपद्धती वाढविली आहे.वेबरला सत्याचा अभ्यास करण्यासाठी तर्कसंगत किंवा अनुभवात्मक दृष्टिकोनाची खात्रीनव्हती परंतु असा विश्वास होता की प्रत्येक वास्तवाच्या मागे मूल्ये, कार्यांचे प्रकार आणि प्रेरणा स्त्रोत यांचे अस्तित्व असते.

वेबर यांनी असे नमूद केले आहे, "केवळ अडचणी उजेडात आणून आणि समस्या सोडवून विज्ञान स्थापित केले जाऊ शकते.त्यांच्या पद्धती विकसित होऊ शकतात. दुसरीकडे निव्वळ ज्ञानशास्त्र आणि पद्धती शास्त्र याचे प्रतिबिंब या सारख्या घडामोडींमध्ये कधीही महत्वपूर्ण भूमिका बजावलेले नाहीत.

वेबर यांच्या समाजशास्त्र विषयावरील विचारसरणीला जर्मनीतील सकारात्मक विचारवंतांच्या काळात आकार मिळाला. ज्यांचा असा विचार होता  की इतिहास हा सामान्य कायद्यांचा आणि अशा उपविषयांचा  बनलेला होता, ज्यांनी इतिहासाला चमत्कारिक  क्रियांवर कमी केले होते. इतिहासवादी विज्ञानाचा असा विचार होता की इतिहास एखाद्या नैसर्गिक विज्ञानासारखा असू शकतो; स्वनुभाववाद दोन पूर्णपणे भिन्न पातळ्यांवर पाहता येतो.

वेबरने इतिहास आणि समाजशास्त्र यांच्यातील संबंध स्थापित केला. समाजशास्त्रशास्त्र अशा प्रकारच्या संकल्पना आणि अनुभवजन्य प्रक्रियेच्या सामान्यीकृत समानता तयार करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे सांगत दोनमधील फरक स्पष्ट केला, तर सांस्कृतिक महत्त्व असलेल्या व्यक्तींच्या कृती, रचना आणि व्यक्तिमत्त्व यांच्या कारणास्तव इतिहासाकडे लक्ष दिले जाते. वेबरच्या मते, इतिहास अद्वितीय अनुभवजन्य घटनांचा बनलेला आहे; अनुभवजन्य स्तरावर सामान्यीकरण होऊ शकत नाही.समाजशास्त्रज्ञांनी म्हणूनच त्यांनी तयार केलेल्या वैचारिक विश्वापासून अनुभवजन्य जगाचे वेगळे केले पाहिजे. संकल्पना कधीही अनुभवजन्य जगास पूर्णपणे व्यापत नाहीत, परंतु वास्तविकतेचे अधिक चांगले आकलन मिळविण्यासाठी ते आनुवंशिक साधने म्हणून वापरले जाऊ शकतात. या संकल्पनांसह, समाजशास्त्रज्ञ सामान्यीकरण विकसित करू शकतात, परंतु या सामान्यीकरण इतिहास नाहीत आणि अनुभवांच्या बाबतीत गोंधळात टाकू नका.

वेबरने आपल्या अभ्यासामध्ये त्या दोघांना एकत्र केले. त्यांचे समाजशास्त्र स्पष्ट संकल्पनांच्या विकासाकडे केंद्रित होते जेणेकरुन ते ऐतिहासिक घटनेचे कार्यकारण विश्लेषण करु शकले.वेबरचा असा विश्वास होता की इतिहास विशिष्ट घटनांच्या अमर्याद संग्रहातून बनलेला आहे.या घटनेचा अभ्यास करण्यासाठी, वास्तविक जगावरील संशोधनासाठी उपयुक्त ठरेल अशा विविध संकल्पना विकसित करणे आवश्यक होते.एक सामान्य नियम म्हणून, जरी वेबरने काटेकोरपणे त्याचे पालन केले नाही आणि बहुतेक समाजशास्त्रज्ञ आणि इतिहासकार देखील करत नाहीत, समाजशास्त्रचे कार्य या संकल्पना विकसित करणे होते, ज्या विशिष्ट इतिहासाच्या विशिष्ट कारणांच्या विश्लेषणामध्ये इतिहास वापरला जायचा. अशाप्रकारे, वेबरने सामाजिक जीवनातील जटिल स्वरूपाला न्याय देणारे विज्ञान विकसित करण्याच्या प्रयत्नात विशिष्ट आणि सर्वसाधारण लोकांना एकत्र करण्याचा प्रयत्न केला.

विल्हेल्म दिल्थे (१८३३-१९११ ) आणि हेनरिक रिकर्ट (१८६३-१९३६) या तत्वज्ञांद्वारे वेबरचा असा विश्वास होता की वर्तनाचा अचूक अंदाज लावण्यासाठी नैसर्गिक विज्ञान पद्धती लागू करणे अवघड आहे. मानवी वर्तनावर संस्कृतीचा प्रभाव महत्त्वाचा होता कारण मानवी वर्तनास त्यांच्या वागण्याचे गुणधर्म असलेल्या व्यक्तीचे अर्थ समजल्याशिवाय समजू शकत नाही.

समाजशास्त्र एक वर्णनात्मक आणि अर्थ लावणारी विद्याशाखा म्हणून संकल्पित करणारे पहिले समाजशास्त्रज्ञ वेबर होते. वेबर यांनी समाजशास्त्राची व्याख्या "स्वत: विषयी विज्ञान आणि त्याद्वारे त्याचे मार्ग आणि परिणाम यांचे कार्यक्षम स्पष्टीकरण देऊन केले आहे."अशा प्रकारे, वेबरचे समाजशास्त्र एक विज्ञान असले पाहिजे, समाजशास्त्र कार्यकारणतेशी संबंधित असावे-ज्यायोगे समाजशास्त्र आणि इतिहास- आणि समाजशास्त्रात अन्वेषणात्मक समजून घेणे किंवा ज्याला अंतर्बोध म्हणतात.

### **५.३.१ अंतर्बोध ( Verstehen):**

वेबर आणि दिल्थे यांनी दुसऱ्याच्या कृतीचा हेतू आणि तर्क समजून घेण्यासाठी सहानुभूती वापरणे किंवा दुसऱ्याच्या जागी स्वत: ला ठेवणे या संदर्भात व्हर्स्टीन ही संकल्पना आणली. वेबरच्या मते वर्सेटीन म्हणजे अर्थाच्या पातळीवर आकलन करणे किंवा समजणे. सामाजिक इंद्रियगोचर समजण्याची ही क्षमता म्हणजे नैसर्गिक विज्ञानांखेरीज सामाजिक विज्ञान वेगळे आहे जे केवळ एकसारखेपणाचे निरीक्षण करतात आणि अणू किंवा रासायनिक संयुगे यांच्यातील संबंधाबद्दल सामान्यीकरण कमी करतात. अंतर्बोध पद्धतीने दोन मार्गांनी सामाजिक वर्तनाचा वैज्ञानिक अभ्यास करणे शक्य करते - यामुळे मानवी क्रियांच्या व्यक्तिनिष्ठ अर्थाबद्दल थेट निरीक्षणात्मक आकलन सुलभ करते आणि त्यामागील हेतू समजून घेण्यास सुलभ करते.

समाजशास्त्रात त्या विशिष्ट हेतूची किंवा कारणांची भावना समजून घेण्याची आवश्यकता असते ज्यामध्ये कर्त्याची क्रिया समाविष्ट असते म्हणजेच, जे लोक एखाद्या अर्थाने क्रिया करतात ते कारण, कारणासाठी जे कारणीभूत घटक असतात त्यांचे अध्ययन केले जाते.

अंतर्बोध विषयी वेबरचा विचार निर्वचनवादमधून घेण्यात आला - लेखकांची विचारसरणी तसेच मजकूराची मूलभूत रचना समजून घेण्यासाठी प्रकाशित लेखनाचे आकलन आणि स्पष्टीकरण करण्याचा एक विशेष दृष्टीकोन म्हणून याकडे पहिले गेले. वेबरने कर्ता, आंतर्क्रिया आणि मानवी इतिहास समजून घेण्यासाठी निर्वचनाची (हर्मेन्यूटिक्सची) साधने वापरण्याचा प्रयत्न केला. सूक्ष्म पातळीवरील विश्लेषणाचे एक साधन- नुसते अंतर्ज्ञान, सहानुभूतीशील सहभाग किंवा सहानुभूती याऐवजी अंतर्बोध ही अभ्यासाची तर्कसंगत प्रक्रिया होती.

वेबर यांनी अंतर्बोधाचे दोन प्रकारात भेद केले : थेट निरिक्षणात्मक आकलन आणि स्पष्टीकरणात्मक आकलन थेट निरिक्षणात्मक आकलन म्हणजे व्यक्तीच्या वागणुकी स्पष्ट व्यक्तिनिष्ठ अर्थ आणि सामाजिक शास्त्रज्ञ त्यांच्या निरीक्षणास आलेला अर्थ सांगतात. ते (अंतर्बोध) आम्हाला क्रिया काय आहेत ते पाहण्याची अनुमती देते. हे काय चालले आहे हे

समजण्यासाठी बाह्य वर्तन आणि चेहऱ्यावरील अभिव्यक्तीचा वापर करते. स्पष्टीकरणात्मक आकलन म्हणजे जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या कृतीमागील हेतू आपल्याला माहित असेल. येथे क्रिया प्रेरणा आणि ती क्रिया का होत आहे या क्रमावर आधारित आहे.हे साध्य करण्यासाठी क्रियाकलाप करणाऱ्या लोकांच्या तळापर्यंत जाण्याची गरज आहे.

**उदाहरण-** लाकूड तोडले जात आहे हे प्रत्यक्ष निरीक्षणात्मक आकलन आहे, पण पैसे मिळवण्यासाठी किंवा सरपणसाठी लाकूड तोडले जात आहे हे स्पष्टीकरणात्मक आकलन आहे.

समाजशास्त्रज्ञ एखाद्या व्यक्तीच्या वर्तनाचा व्यक्तिगत अर्थ समजू शकत नाही. परंतु एखाद्या विशिष्ट परिस्थितीत एकापेक्षा जास्त व्यक्तींचे जर वर्तन वैशिष्ट्यपूर्ण असेल तर समाजशास्त्रज्ञ सामान्यीकरण करू शकतात, जे कार्यकारण संबंधांना आधार देतात. समाजशास्त्रज्ञ सामाजिक किंवा ऐतिहासिक घटनांवर परिणाम घडविणाऱ्या कारणांच्या बहुलपणाचा सामना करीत आहेत, काही विशिष्ट कारण काढून टाकले गेले असल्यास घटना वेगळ्या असती किंवा असल्यास होय त्यामागील निर्णायक प्रभाव पडण्याची शक्यता आहे. वेबरची कार्यक्षमता ही घटना होण्याची शक्यता किंवा दुसऱ्या घटनेसह असण्याची शक्यता असते.कार्यकारणतेबद्दल वेबरचा विचार हा असा आहे की आपल्याला सामाजिक जीवनाबद्दल (वर्स्टेन) विशेष ज्ञान असू शकते म्हणूनच सामाजिक विज्ञानांचे कार्यकारण ज्ञान नैसर्गिक विज्ञानांच्या कार्यकारण ज्ञानापेक्षा वेगळे आहे.

रॉसाइड्स (१९७८) स्पष्ट करतात की वेबर अंतर्बोध समाजशास्त्र हे अस्तित्वातील मूलभूत तत्त्वाचा शोध न घेता मानवांना भेडसावत असलेल्या अनोख्या आणि बदलत्या समस्यांवरील अंतर्दृष्टी आणि उपाययोजना शोधते.

### ५.३.२. आदर्श प्रकार (Ideal types):

वेबरयांच्या अंतर्बोध आणि कार्यकारण स्पष्टीकरणांमधून आदर्श प्रकार बाहेर आले.

जेव्हा वेबर यांनी आपली आकलनाची कल्पना आदर्श प्रकारांसह एकत्र केली, तेव्हा समाजशास्त्राने वैज्ञानिक परिष्कार आणि सामाजिक-राजकीय उपयोगिताकडे एक पाऊल टाकले. कोलिन्स आणि मॅकोव्स्की यांनी स्पष्ट केले आहे की, वेबरच्या विश्लेषणेतील सामाजिक वास्तविकता पुरुष आणि स्त्रियांच्या स्वतः च्या जगाची कृती करताना स्वतःच्या अनुभवाची कल्पना करून आकलन करणे आवश्यक आहे, या अनंत गुंतागुंतीच्या आणि स्थलांतरित जगाविषयीचे आमच्या आकलनापेक्षा वैज्ञानिक सामान्यीकरणे बनविण्याचे आदर्श प्रकार हे एक साधन आहे.

समाजशास्त्रासाठी सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या कार्यक्षम स्पष्टीकरणात महत्त्वपूर्ण योगदान देण्यासाठी वेबर कृत आदर्श प्रकार आवश्यक आहेत. अतिशयोक्तीपूर्ण असले तरीही कोणत्याही सामाजिक घटनेची वैशिष्ट्ये असतात त्यांच्या अध्ययनासाठी आदर्श प्रकार अत्यावश्यकतेचे एक अमूर्त विधान आहे. हे 'आदर्श प्रकार' वास्तविकतेत सापडलेल्या वास्तविक, अनुभवात्मक प्रकारांशी तुलना करता येतात.

रॉसाइड्स (१९७८) च्या मते "आदर्श प्रकार म्हणजे विश्लेषणात्मक रचना जो तपासकार्यास समानता तसेच ठोस प्रकरणांमध्ये विचलन शोधण्यासाठी मोजमाप करणारी मापदंड म्हणून काम करते.'' ही एक मानसिक रचना आहे. आदर्श प्रकार म्हणजे सामाजिक वैज्ञानिकांनी त्याच्या आवडी आधारे आणि काही सामाजिक घटनेच्या आवश्यक घटकांना पकडण्यासाठी सैद्धांतिक अभिमुखतेच्या आधारे तयार केलेली त्याच्या मूलभूत स्तरावरील संकल्पना. ते आनुवंशिक साधन आहेत आणि अनुभवजन्य संशोधन करण्यात आणि सामाजिक जगाच्या विशिष्ट बाबी समजून घेण्यात उपयुक्त आहेत. वेबरच्या शब्दांत, आदर्श प्रकारांचे कार्य म्हणजे - ''त्याचे कार्य, भिन्नता किंवा समानता प्रस्थापित करण्यासाठी, अत्यंत स्पष्टपणे सुगम्य संकल्पनांसह त्यांचे वर्णन करण्यासाठी आणि त्यांना कार्यक्षमतेने समजावून सांगण्यासाठी व अनुभवजन्य वास्तविकतेशी तुलना करणे हे आहे. ''

वेबरने त्यांच्या अमूर्ततेच्या पातळीवर आधारित तीन प्रकारचे आदर्श प्रकार विकसित केले.

अ) ऐतिहासिक वैशिष्ट्यांचा आदर्श प्रकार - जे पाश्चात्य शहर, प्रोटेस्टंट नीतिशास्त्र किंवा आधुनिक भांडवलशाही सारख्या विशिष्ट ऐतिहासिक वास्तवांचा संदर्भ घेतात.

ब) नोकरशाही किंवा सरंजामशाहीसारख्या विविध ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संदर्भांमध्ये निरीक्षण करण्यायोग्य ऐतिहासिक वास्तवातील अमूर्त घटकांचा संदर्भ देणारे आदर्शप्रकार.

क) आर्थिक प्रकारचे सिद्धांत जसे की विशिष्ट प्रकारच्या वर्तनाचे तर्कसंगत पुनर्रचना तयार करणारे आदर्श प्रकार.

वेबरच्या दृष्टीने आदर्श प्रकार सामाजिक इतिहासाच्या वास्तविक जगापासून प्रेरकपणे काढला जावा. आदर्श प्रकारच्या संशोधनांची निर्मिती करण्यासाठी प्रथम स्वतःला ऐतिहासिक वास्तवात बुडवून घ्यावे लागेल आणि नंतर त्या वास्तविकतेमधून आदर्श प्रकारचे शोध घ्यावे लागतील. जरी वास्तविक प्रकार वास्तविक जगापासून प्राप्त केले गेले असले तरी ते जगाच्या प्रतिमेचे प्रतिबिंब नाहीत, वास्तविक जगात काय घडत आहेत याविषयी ती एकतर्फी अतिशयोक्ती असेल. अर्थाच्या स्तरावर त्याच्या विशिष्टतेबद्दल आणि पर्याप्ततेनुसार आदर्श प्रकाराचा न्याय केला पाहिजे. वेबरच्या मते, ऐतिहासिक संशोधनासाठी जितका अतिशयोक्तीपूर्ण आदर्श प्रकार तेवढा तो उपयुक्त आहे.

परिपूर्णतेच्या मानक किंवा अंतिम ध्येयांच्या अर्थाने एक आदर्श प्रकार आदर्श नाही. आदर्श प्रकारचे सार किंवा सत्य मूर्त स्वरुप देत नाहीत परंतु आदर्श प्रकार समाजशास्त्रज्ञांनी निर्माण केले आहेत आणि म्हणूनच विशिष्ट दृष्टिकोनातून ते तयार केले जातात.

प्रामुख्याने विविध प्रकारच्या तर्कसंगत वर्तनास लागू होते, आदर्श प्रकार म्हणजे मूलभूतपणे "कर्ता त्याच्या वागणुकीच्या दृष्टीने तर्कशुद्धतेच्या निकषांनुसार पूर्णपणे तर्कशुद्धपणे वागले तर काय करेल त्याचे एक मॉडेल / प्रतिमान आहे." "आदर्श चे ठरावीक नियम" (अब्राहम आणि मॉर्गन १९८९) भिन्न असलेल्या वर्तणुकीच्या घटनांसाठी सैद्धांतिक स्पष्टीकरणांच्या स्वरुपात मदत करताना विशिष्ट प्रकार, विशिष्ट वर्तनाचे विश्लेषण करण्याची भाषा आणि प्रक्रिया प्रदान करतात.

**आपली प्रगती तपासा:**

१. वेबरने समाजशास्त्र व्याख्या कशी केली ?

२. व्हर्स्टीन/ अंतर्बोध चा अर्थ काय आहे ?

३. आदर्श प्रकार म्हणजे काय ?

## ५.४ तर्कसंगतता ( Rationalization)

तर्कसंगतता ही आधुनिक समाजातील कार्यक्षमता, पूर्वानुमाननीयता, गणितायोग्यता आणि अमानवीकरणाद्वारे दर्शविलेली प्रक्रिया आहे. तर्कसंगततेने केवळ आधुनिक समाजच बदलले नाही तर भांडवलशाहीच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. एक तर्कसंगत समाज म्हणजे धर्म, नैतिकता किंवा परंपरा यावर मात करून संस्था, तंत्रज्ञान आणि कार्यक्षमतेच्या तर्कसंगत प्रकारांभोवती बनलेला समाज आहे.

'प्रोटेस्टंट एथिक अँड स्पिरिट ऑफ कॅपिटलिझम' या पुस्तकात त्यांनी तर्कसंगत भांडवल ही आपल्या आधुनिक जीवनातील सर्वात 'प्रभावी शक्ती' म्हणून वैशिष्ट्यीकृत केली.

तर्कसंगततेची एक व्याख्या दर्शविणे कठिण आहे कारण वेबर या शब्दाच्या अनेक व्याख्यांसह संचालित होता आणि विशिष्ट चर्चेत तो वापरत असलेली व्याख्या निर्दिष्ट करण्यास वारंवार अयशस्वी ठरला. वेबरने एका सामाजिक रचनेत किंवा संस्थेत वर्णन केलेली तर्कसंगतता प्रक्रिया सहसा दुसऱ्या रचनेची किंवा संस्थेच्या तर्कसंगततेपेक्षा अगदी वेगळी होती. वेबर यांनी म्हटल्याप्रमाणे तर्कवितरण प्रक्रियेने "विलक्षण रूपे बदलली आहेत" आणि "तर्कवादाचा इतिहास असा विकास दर्शवितो जो कोणत्याही अर्थाने जीवनाच्या विविध विभागांमधील समांतर रेषा पाळत नाही".

कलबर्ग (१९८०) वेबरच्या कार्यातील चार मूलभूत प्रकारची तर्कसंगतता ओळख करून देतात.

**१.व्यावहारिक तर्कसंगतता:** याची व्याख्या कालबर्गने केली आहे. प्रत्येक व्यक्तीच्या निव्वळ व्यावहारिक आणि अहंकारिक स्वारस्यांसंबंधी सांसारिक क्रियाकलाप पाहणारे आणि त्यावर निर्णय घेणारे जीवनशैली जे लोक व्यावहारिक तर्कसंगतता अभ्यास करतात ते दिलेली वास्तविकता स्वीकारतात आणि केवळ त्यांच्याद्वारे येणाऱ्या अडचणींबद्दल वागण्याचे सर्वात फायदेशीर मार्ग मोजतात. या प्रकारची विवेकबुद्धी दैनंदिन नित्य कर्मांपलीकडे जाण्याचा धोका असलेल्या कोणत्याही गोष्टीला विरोध करते. ते सर्व अव्यवहार्य धार्मिक किंवा धर्मनिरपेक्ष यूटोपियन मूल्यांवर अविश्वास ठेवतात.

**२.सैद्धांतिक तर्कसंगतता:** सैद्धांतिक किंवा बौद्धिक तर्कसंगतते मध्ये तार्किक वजावट, प्रेरण, कार्यकारणतेचे श्रेय आणि यासारख्या अमूर्त संज्ञानात्मक प्रक्रियेचा समावेश आहे. व्यावहारिक तर्कसंगततेच्या विपरीत, सैद्धांतिक तर्कसंगतते मुळे कर्ता जगाला अर्थपूर्ण विश्व म्हणून समजण्याच्या प्रयत्नातून दैनंदिन वास्तविकता ओलांडू शकतो.

**३. मूलभूत तर्कसंगतता** (व्यावहारिक तर्कसंगतते सारखी परंतु सैद्धांतिक तर्कसंगतता नसून) मूल्यांच्या समूहांच्या माध्यमातून नमुन्यांची कार्यवाही थेट करते. मूलभूत व्यवस्थेच्या संदर्भात संपुष्टात येण्यासारख्या अर्थपूर्ण निवडीचा अर्थ असा होतो. एक मूल्य प्रणाली दुसऱ्यापेक्षा अधिक (मूलभूतपणे) तर्कसंगत नाही. वेबरच्या दृष्टीने, "जीवनशैली जगण्याच्या पद्धतींचा उल्लेख करण्याची क्षमता" (कालबर्ग, १९८०) हा एकमेव प्रकार आहे. अशा प्रकारे,पाश्चिमात्य देशात जीवनशैली-केल्व्हनिझमने व्यावहारिक तर्कसंगतते ला वश केले आणि औपचारिक तर्कसंगतते च्या विकासास कारणीभूत ठरली.

**४. औपचारिक तर्कसंगतता:** याचा अर्थ असा आहे की शेवटची गणना. औपचारिक तर्कसंगतता फक्त पश्चिमेकडील औद्योगिकीकरणाबरोबरच उद्भवली. पश्चिमेतील औपचारिक तर्कशुद्धतेचे वैशिष्ट्य दर्शविणारे सार्वत्रिकरित्या लागू केलेले नियम, कायदे आणि कायदे विशेषतः आर्थिक, कायदेशीर आणि वैज्ञानिक संस्था तसेच वर्चस्ववादाच्या नोकरशाही प्रकारात आढळतात.

रिट्झर यांनी औपचारिक तर्कशुद्धतेची सहा मूलभूत वैशिष्ट्ये अधोरेखित केली:

(१) **गणनायोग्यता:** ज्या गोष्टी मोजल्या जाऊ शकतात किंवा प्रमाणित केल्या जाऊ शकतात.

(२) **कार्यक्षमता:** दिलेल्या समाप्तीसाठी सर्वोत्तम मार्ग शोधणे.

(३) **अनुमान:** गोष्टी एकाच वेळी किंवा ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी एकाच मार्गाने चालतात.

(४) **मानवी तंत्रज्ञानाची जागा अमानवी तंत्रज्ञानाने बदलणे:** मानवीय तंत्रज्ञानापेक्षा अधिक मानवीय तंत्रज्ञान (जसे की संगणकीकृत प्रणाली) अधिक गणना करण्यायोग्य, अधिक कार्यक्षम आणि अंदाजाप्रमाणे पाहिले जाते.

(५) **अनिश्चिततेच्या नियंत्रणावर नियंत्रण मिळवा:** विशेषतः मनुष्याने काम केलेल्या किंवा त्यांच्याकडून सेवा दिल्या जाणाऱ्या अनिश्चिततेवर नियंत्रण मिळवा.

(६) **तर्कहीन परिणाम:** तर्कसंगत प्रणालींमध्ये त्यांच्यात सामील असलेल्या लोकांसाठी आणि स्वतः च्या यंत्रणेसाठी तसेच मोठ्या समाजासाठी अनेक तर्कहीन परिणाम घडतात.

(कलबर्ग १९८०) यांच्या मते, "मुलभूत तर्कसंगतता आणि औपचारिक तर्कसंगततेमधील संघर्ष पश्चिमेकडील तर्कसंगातता प्रक्रियेच्या प्रगतीत विशेषतः दुर्दैवी भूमिका बजावली आहे.

औपचारिकपणे तर्कसंगत रचनेची "लोखंडी पिंजरा" म्हणून वेबर यांनी आधुनिक पाश्चात्य जगाविषयीच्या त्याच्या आकलनामध्ये मध्ये सर्वात शक्तिशाली आणि अर्थपूर्ण वापर केला. वेबर यांनी भांडवलशाही आणि नोकरशाही यांचे वर्णन "दोन उत्तम तर्क शक्ती" म्हणून केले. वस्तुतः वेबरने भांडवलशाही आणि नोकरशाही त्यांच मूलभूत स्त्रोतांमधून (विशेषतः आंतरिक तपस्वी) पासून उत्पन्न झाल्यासारखे त्याकडे पाहिले आणि त्याच पद्धतीने तर्कसंगत आणि पद्धतशीर कृती केली आणि एकमेकांना बळकटी दिली आणि या प्रक्रियेत घटनेचे तर्कसंगतीकरण पुढे केले. वेबर यांच्या मते, तांत्रिक कौशल्य आणि वस्तुस्थितीचे ज्ञान असलेल्या नोकरशाहीचा एकमेव खरा प्रतिस्पर्धी भांडवलदार होता.

मॅक्स वेबरच्याकार्याने आधुनिक जीवनातील पैलूंचे तर्कसंगतीकरण आणि पाश्चिमात्य सभ्यतेच्या समस्यांवर लक्ष केंद्रित केले.

सामाजिक जीवनात मूलगामी परिवर्तनांसह जगाची वाढती नाउमेद झाली. तर्कसंगतीकरणद्वारे वेबर मानतात कि आयुष्यात वैयक्तीकता आणि उत्स्फूर्तता काढून टाकून जीवन अधिक कार्यक्षम आणि अनुमान पूर्ण बनविण्याची प्रक्रिया. वेबरच्या वाढत्या तर्क संगततेसाठी, त्याने "लोखंडी पिंजरा" म्हणून संबोधले, ज्यामध्ये व्यक्ती कार्यक्षमतेच्या व्यवस्थेत अडकली आहे जी माणुसकीचे कल्याण वाढविण्यासाठी तयार केली गेली होती.

**आपली प्रगती तपासा:**

१. वेबरच्या कार्यामधील चार प्रकारची तर्कसंगतता ओळखा.

## ५.५ नोकरशाही (Buereaucracy)

वेबर यांनी तर्कसंगततेवर लक्ष केंद्रित केल्यामुळे आधुनिक सामाजिक संरचानांतील सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील मोठ्या प्रमाणात संघटनांच्या क्रियापद्धती आणि विस्ताराचा अभ्यास झाला. नोकरशाही हा तर्कसंगततेचे एक विशिष्ट प्रकरण मानले जाऊ शकते,किंवा मानवी संस्थांवर तर्कसंगतता लागू केले जाऊ शकते. वेबरच्या मते, मानवी कृतीचा नोकरशाही समन्वय हे आधुनिक सामाजिक संरचनांचे विशिष्ट प्रतिक आहे.

अधिकाराच्या संरचनेत वेबर यांची समाजशास्त्रीय अभिरुची त्यांच्या राजकीय स्वारस्यांमुळे प्रेरितझाली. त्यांचे प्राधिकरण संरचनांचे विश्लेषण कृतीच्या स्वरूपाबद्दलच्या त्यांच्या अनुमानांशी सुसंगत होते.वेबरला प्रामुख्याने वर्चस्व असलेल्या कायदेशीर प्रकारांमध्ये रस होता ज्यास त्याने अधिकार म्हटले. अनुयायांना अधिकाराखाली ठेवण्यास वैध ठरविलेल्या तीन पातळ्यांवर तर्कसंगत, पारंपारिक आणि करिश्माई आहेत. वेबरला नोकरशाहीची आवड होती जीला वेबर यांनी तर्कसंगत कायदेशीर अधिकाराचे सर्वात शुद्ध रूप मानले.

**खालील वैशिष्ट्यांद्वारे नोकरशाही त्याच्या आदर्श प्रकारात परिभाषित केली केली गेली:**

१. अधिकृत व्यवसाय कायम तत्वावर केला जातो.

२. व्यवसाय नियमांनुसार केले जातात.

३. प्रत्येक अधिकाऱ्याची जबाबदारी आणि अधिकार हे प्राधिकरणाच्या श्रेणीरचनेचा भाग असतात.

४. अधिकारी त्यांच्या नियुक्त केलेल्या कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक संसाधनांच्या मालकीचे नसतात, परंतु त्या संसाधनांच्या वापरासाठी जबाबदार असतात.

५. कार्यालये त्यांच्या सदस्यांद्वारे विनंत्या करता येणार नाहीत; तो नेहमीच व्यवस्थापनेचा भाग राहतो.

६. अधिकृत व्यवसाय लेखी कागदपत्रांच्या आधारे केला जातो.

वेबर यांच्या विश्लेषणामधील नोकरशाही तर्कसंगत भांडवलाच्या तर्कसंगत भांडवलशाहीचा आत्मा आहे. भांडवलशाही बाजारातील अर्थव्यवस्थेने अशी मागणी केली की प्रशासनाचा अधिकृत व्यवसाय अस्पष्टतेशिवाय तंतोतंत सोडण्यात यावा आणि जास्तीत जास्त वेगाने सतत आणि निर्वहन केले जावे.

त्यांनी निदर्शनास आणून दिले की नोकरशाही तर्कसंगततेच्या जीवनशैलीला प्रोत्साहन देते. त्यांनी नोकरशाहींचे वर्णन "सुटलेला पुरावा" म्हणून केले आणि एकदा स्थापित झाल्यावर ते नष्ट करणे सर्वात कठीण आहे. आदर्श ठराविक नोकरशाही नोकरशाहीच्या तर्कशुद्ध वैशिष्ट्यांचा अतिशयोक्ती आहे. त्यांनी आदर्श नोकरशाहीला आदर्श ठराविक नोकरशाहीपेक्षा वेगळे केले आहे. त्या रचनांमध्ये नोकरशहांची पदे आहेत.

**आधुनिक नोकरशाहीच्या विकासास हातभार लावणारे सर्वात महत्त्वाचे घटक म्हणजे:**

१. अर्थव्यवस्थेचा विकास ज्यामुळे कर स्थिर करण्याच्या प्रणालीद्वारे नोकरशाही राखण्यासाठी स्थिर उत्पन्नाची हमी दिली जाते.

२. प्रशासकीय कामांचा परिमाणात्मक विकास.

३. प्रशासकीय कार्यात गुणात्मक बदल.

४. व्यवस्थापनाच्या इतर कोणत्याही प्रकारांपेक्षा नोकरशाहीचे श्रेष्ठत्व.

५. आधुनिक संस्कृतीचे गुंतागुंतीचे आणि विशेष स्वरूप जे वैयक्तिकरित्या अलिप्त आणि काटेकोरपणे उद्दीष्ट तज्ञाची मागणी करते

६. कायद्याचे तर्कसंगत स्पष्टीकरण.

७. राज्य किंवा सैन्य म्हणून उद्योजक आणि सार्वजनिक संघटनांच्या हातात व्यवस्थापनाच्या भौतिक साधनांची एकाग्रता.

८. आर्थिक आणि सामाजिक फरकांचे स्तर आणि आधुनिक लोक प्रतिनिधी लोकशाहीचा उदय.

आधुनिक पाश्चात्त्य अर्थव्यवस्थांची वाढती नोकरशाही आणि तर्कसंगतता अपरिहार्य होते. नोकरशाहीकरण झाल्यास सरकार आणि उद्योगात मानवी संबंधांचे वैयक्तिकरण रद्द होते.

## ५.६ विरक्ती/ निराशा (Disenchantment )

वेबरसाठी वाढती तर्कसंगततेने नेहमीच 'जगाबरोबर विरक्ती' निर्माण केली.

कार्लमार्क्स प्रमाणे वेबरने औद्योगिक भांडवलशाहीची कार्यक्षमता ओळखली. मार्क्स प्रमाणेच त्यांचा असा विश्वास होता की आधुनिक समाज वेगळे होण्यास कारणीभूत ठरतो- वेबरसाठी वाढती नोकरशाही वाढविण्यामुळे येणारे नियमन आणि अमानुषकरण यामुळे परत्मिकरण वाढते,'जगाशी विरक्ती' होते, कारण मार्क्स यांच्या मते ती आर्थिक असमानता होती ज्याने परत्मिकरण होते. वेबर यांनी चेतावणी दिली की, नोकरशहा हे लोकांना अद्वितीय व्यक्तींपेक्षा, एक घटक समजतात आणि विशेषीकरण आणि कंटाळवाणी दिनचर्या व्यक्तींना नियमित करतात. वेबरने आधुनिक समाजात सर्व गोष्टींचे नियमन करण्याचा आणि मानवी आत्म्याला चिरडून टाकण्याची धमकी देणारी एक विशाल आणि वाढणारी नियमांची व्यवस्था केली.मार्क्स प्रमाणे मानवतेची सेवा करण्यापेक्षा आधुनिक समाज त्यांना गुलाम करते. वेबरने आधुनिक व्यक्तीला 'अखंडपणे चालू असलेल्या यंत्रणेत केवळ एक छोटासा कस्पटासमान घटक आहे जो त्याच्याकडे मोर्चाची अखंडपणे ठरलेली दिनचर्या' म्हणून दाखविला आहे.त्याला भीती होती की समाजातील तर्कसंगततेमुळे लोक कमी होतील व यंत्र मानव राहतील.

वेबरने जर्मन शब्द Entzauberung वापर केला, ज्याचा इंग्रजीत भाषांतर 'disenchantment' झाला. याचा शाब्दिक अर्थ 'de-magic-ation' आहे. वेबरसाठी, वैज्ञानिक पद्धती आणि तर्कसंगततेचा अर्थ असा होता की जग निराधार झाले आहे - धर्म, जादू, रहस्य, अंधश्रद्धा आणि विश्वास यांची भूमिका कमी कमी झाली आणि त्याऐवजी क्रिया करण्याच्या अधिक तर्कसंगत हेतूंनी बदलले. परंपरेचे आणि जादुई विचारांचे प्रकार गणनासह बदलले आहेत, प्रत्येक गोष्ट वैज्ञानिक आणि तर्कसंगत दृष्टीने स्पष्ट केली आहे.

परंतु, वेबरसाठी, त्या क्षमतेचा परिणाम असा झाला की जग विरक्त झाले आणि निराश झाले, अनुमानिक झाले आणि बौद्धिक झाले. जगाचा नाश हा वैज्ञानिक प्रगतीचा परात्मिक व अवांछित नकारात्मक परिणाम आहे. लोकांनी त्यांचे कार्य कसे करावे, त्यांनी काय करावे आणि त्यांचे ध्येय साध्य करण्याचा सर्वोत्तम मार्ग याबद्दल अधिक विचार करण्यास सुरवात केली.

## ५.७ लोखंडी पिंजरा (Iron cage)

वेबरने सुचवलेल्या लोखंडी पिंजराची संकल्पना असे सूचित करते की भांडवलशाही उत्पादनामुळे संघटित व वाढणारी तांत्रिक व आर्थिक संबंध ही स्वतः समाजातील मूलभूत शक्ती बनली. कार्यक्षमता, तर्कसंगतता आणि नियंत्रण या तत्त्वांच्या आधारे व्यक्ती संस्थांमध्ये अडकल्या आहेत. आधुनिक संस्था नियम व नियमांद्वारे वैशिष्ट्यीकृत आहेत ज्यात कार्य करणाऱ्या लोकांच्या वागण्यावर नियंत्रण ठेवते जेथे काम करण्याची प्रक्रिया इतकी तर्कसंगत होते की त्यामुळे आनंद होत नाही आणि परिपूर्ती होऊ शकत नाही.

लोखंडी पिंजऱ्याचे स्पष्टीकरण देताना वेबर म्हणाले की "आधुनिकीकरणामुळे अंतःकरणा शिवाय हेडोनिस्ट्स (ज्याला असा विश्वास आहे की जीवनातील सुख मिळवणे ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे; एक सुख-शोधक.) आणि चैतन्याशिवाय तज्ञ तयार होतात".

## ५.८ सामाजिक क्रिया (Social action)

वेबरचे समाजशास्त्र सामाजिक क्रियेच्या कल्पनांवर आधारित होते.सामाजिक क्रियेबद्दल वेबरची चर्चा हे एक आदर्श प्रकार वापरण्याचे उदाहरण आहे. कृती आणि अर्थ यांचे एकित्रत गुण समाजाच्या वैज्ञानिक विश्लेषणासाठी महत्वाचे होते. वेबर क्रिया आणि प्रतिक्रियाशील वर्तन दरम्यान भिन्न आहे. उत्तेजनाची घटना आणि अंतिम प्रतिसाद यांच्यात विचारांच्या प्रक्रियेत हस्तक्षेप करण्याच्या कृतीशी संबंधित होते. जेव्हा व्यक्तींनी त्यांच्या कृतींसाठी व्यक्तिनिष्ठ अर्थ जोडला तेव्हा क्रिया आली. वेबर स्पष्ट करतात की कृती आतापर्यंत सामाजिक आहे, क्रिया करणाऱ्या व्यक्तीद्वारे व्यक्तिनिष्ठ अर्थाने ती इतरांच्या वागणुकीचा हिशेब घेते आणि त्यायोगे त्याच्याकडे लक्ष देणारी असते.

त्याच्या कृती सिद्धांतात सामूहिकतेवर नव्हे तर व्यक्तीवर लक्ष केंद्रित केले गेले. कर्त्याने स्वतःच दिलेली ओळखण्यायोग्य वर्तनाची त्याला दिलेली कारणे त्याला आवडली. वैयक्तिकरित्या निर्दिष्ट अर्थ नसल्यास कृती निरर्थक असतात.

तो त्याच्या आदर्श प्रकारच्या पद्धतीचा उपयोग चार मूलभूत प्रकारच्याकृती ओळखून क्रियेचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी वापरतो.

**१. ध्येयाच्या संदर्भात तर्कसंगत कृती:** येथे अभिनेता ध्येय निश्चित करतो आणि ध्येय साध्य करण्यासाठी कार्यक्षमतेच्या दृष्टीने त्याचे साधन निवडतो. उदा. चांगली नोकरी मिळवण्यासाठी चांगल्या विद्यापीठात उच्च शिक्षण मिळविणे.

**२. मूल्यांच्या संदर्भात तर्कसंगत कृती:** येथे अर्थ त्यांच्या कार्यक्षमतेसाठी निवडले जातात परंतु समाप्ती मूल्यांद्वारे निर्धारित केली जातात. उदा.जहाजाचा कॅप्टन त्यासह खाली जात आहे.

**३. परिणामकारक किंवा भावनिक कृती:** येथे भावना क्रियेचे टोक आणि साधने निर्धारित करतात. क्रिया कर्त्याच्या भावनिक अवस्थेतून निर्धारित केली जाते. उदा. आईने बाळाला चापट मारली.

**४. पारंपारिक क्रिया:** येथे समाप्त आणि साधने रीतिरिवाज आणि विधी द्वारे निश्चित केल्या जातात. उदा. एखाद्या विशिष्ट प्रथेचे अनुसरण करणे कारण हा विधी आहे.

वेबरने चार आदर्श प्रकारच्या कृती निर्देशित केल्यातरीही, त्याला चांगल्या प्रकारे माहिती होते की कोणत्याही व्यवहारात चारही प्रकारच्या कृतींचे मिश्रण केले जाते. वेबर यांनी असा तर्क केला की समाजशास्त्रज्ञांकडे परिणाम किंवा परंपरेद्वारे वर्चस्व असलेल्या कृतीपेक्षा अधिक तर्कसंगत प्रकारांची कृती समजून घेण्याची अधिक चांगली संधी आहे.

वेबरने दिलेली टायपॉलॉजी म्हणजे आधुनिक पाश्चात्य समाज भूतकाळापेक्षा किती वेगळा आहे हे समजून घेणे. आधुनिक पाश्चिमात्य समाज राजकारण, अर्थशास्त्र, कायदा, आधुनिक सामाजिक जीवनाच्या प्रत्येक बाजुला स्पर्श करणाऱ्या ध्येय-केंद्रित तर्कसंगततेने अधिराज्य आहे आणि परस्पर संबंध आणि मानवी वर्तनातील उपयोगितांच्या निरंतर वापरामुळे होते.

**आपली प्रगती तपासा:**

१. वेबर यांच्या मते जगातील विरक्ती आणि लोखंडी पिंजरा म्हणजे काय ते स्पष्ट करा.

२. वेबर यांनी स्पष्टीकरण केल्याप्रमाणे चार मूलभूत सामाजिक क्रिया स्पष्ट करा.

## ५.९ सारांश ( Let us sum up )

वेबर यांचे कार्ययोगदान संगीत, धर्म, प्रेम, कायदा, अर्थव्यवस्था, राजकारणः अशा बर्याच क्षेत्रां संबंधी आहे. त्याने विविध संस्कृतींकडे लक्ष दिले. ते राजकारणामध्ये देखील

क्रियाशील होते (आणि त्यांची पत्नी मॅरियाना तिच्या काळातील एक आघाडीची स्त्रीवादी होती). आपली वैयक्तिक राजकीय बांधिलकी आणि समाजशास्त्र या दृष्टिकोनातून ते शास्त्रीयदृष्ट्या तटस्थ - किंवा मूल्यमुक्त असल्याचा दृष्टिकोन यांच्यात संतुलित होते. कायदा, अर्थशास्त्र, धर्म आणि इतिहासाचे विस्तृत ज्ञान घेऊन, मॅक्स वेबर यांना (१८६४-१९२०) समाजशास्त्रात सर्वात मोठे वैयक्तिक योगदान मानले. त्यांनी खूप विस्तृत असलेल्या संकल्पना तयार केल्या. त्यांचे बरेच कार्य आधुनिक भांडवलशाहीच्या विकासाशी आणि आधुनिक समाज सामाजिक संस्थांच्या पूर्वीच्या स्वरूपांपेक्षा भिन्न होते. अनुभवजन्य अभ्यासाच्या मालिकेद्वारे वेबर यांनी आधुनिक औद्योगिक संस्थांची काही मूलभूत वैशिष्ट्ये मांडली आणि आज समाजशास्त्रज्ञांसाठी महत्त्वपूर्ण राहिलेल्या महत्त्वाच्या समाजशास्त्रीय वादविवादास नामनिर्देशित केले.

वेबरसाठी सामाजिक क्रिया हि मूलभूत रचना आहे आणि कृत्रिमरित्या क्रियांचा अभ्यास करण्याऐवजी क्रियांशी निगडीत अर्थ आणि नैसर्गिक विज्ञानाच्या पद्धतींचा वापर करून त्याचे परिणाम समजून घेणे ही समाजशास्त्रज्ञांची भूमिका आहे. त्याने अंतर्बोध (verstehen) ही संकल्पना मांडली. आदर्श प्रकारांची संकल्पना समाजशास्त्रज्ञांना अध्ययन घटकांची तुलना करण्यास मदत करू शकते ज्या आधारावर सामान्यीकरण केले जाऊ शकते.

## ५.१० प्रश्न (Questions)

१. सामाजिक क्रियेत वेबरच्या योगदानाचे विश्लेषण करा.

२. एक आदर्श प्रकार म्हणजे काय? वेबरच्या नोकरशाही सिद्धांतामधील आदर्श प्रकाराची कल्पना स्पष्ट करा.

३. वेबर यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे आधुनिक नोकरशाहीच्या वैशिष्ट्यांविषयी चर्चा करा.

४. आधुनिक जगाचे लोखंडी पिंजरा म्हणून वर्णन करून वेबर यांना कोणता अर्थ अभिप्रेत होता? यातून बाहेर पडण्याचा काही मार्ग आहे का?

५. तर्कसंगततेबद्दल वेबर यांचे मत स्पष्ट करा.

६. डिसेंचेन्टमेंट / विरक्ती संकल्पना समजावून सांगा.

७. वेबर यांच्या पद्धती शास्त्रावर चर्चा करा.

## ५.११ संदर्भ


- Abraham, F and Morgan, J. 1989. Sociological Thought: From Comte to Sorokin. USA:Wyndham Press.
- Adams, Bert N. and R. A. Sydie. 2002. Sociological Theory. Vistaar Publication.
- Ashley, D., Orenstein, D. 2005. Sociological Theory-Classical statements, 6th Edition.Pearson Education.

- Cole, Nicki Lisa, Ph.D. "Max Weber's Key Contributions to Sociology."ThoughtCo, Aug. 28, 2020, thoughtco.com/max-weber-relevance-to-sociology-3026500.
- Giddens, A. 2009.Sociology 6th Edition.Polity Press.
- Haralambos and Holborn (2013) Sociology Themes and Perspectives.HarperCollins Publishers.
- Kalberg S. 1980. Max Weber's Types of Rationality: Cornerstones for the Analysis of Rationalization Processes in History: The American Journal of Sociology, Vol. 85, No. 5 (Mar., 1980), pp. 1145-1179 Published by: The University of Chicago Press
- Macionis, J and Plummer, K. 2008. Sociology – A Global Introduction 4th Edition.Pearson Education.
- Ritzer, G. 2011.Sociological Theory Eighth Edition. USA: McGraw Hill.
- Scott, J. (2006) Social Theory: Central Issues in Sociology. New Delhi: Sage Publications.
- Turner, J.H. (2013) Contemporary Sociological Theory. New Delhi: Sage Publications.


*****

munotes.in

# ६

# मार्क्सशी संवाद आणि वेबर यांचा वारसा

# (Dialogue with Mars & The legacy of Weber Today)

**प्रकरण रचना**


६.० उद्दिष्टे

६.१ परिचय प्रस्तावना

६.२ धर्म आणि भांडवलशाहीचा उदय

६.३ प्रोटेस्टंट नितीतत्त्व आणि भांडवलशाही आत्मा

६.३.१ चीनमधील धर्म आणि भांडवलशाही

६.३.२ भारतातील धर्म आणि भांडवलशाही

६.४ वेबर यांचा वारसा

६.५ सारांश

६.६ प्रश्न

६.७ संदर्भ साहित्य


## ६.० उद्दिष्टे

- वेबर यांचा धर्माबद्दलचा दृष्टिकोन समजून घेणे.
- एसिटिक प्रोटेस्टंटिझमच्या नितितत्त्वाचा आणि भांडवलशाहीच्या उद्योन्मुखते मधील संबंधाचे वेबरचे विश्लेषण समजून घेणे.
- जागतिक धर्माविषयी वेबरचे मत समजून घेणे
- आजच्या संदर्भात वेबरचा वारसा आणि त्याची सुसंगतता समजून घेणे.

## ६.१ प्रस्तावना

मॅक्स वेबर (१८६४-१९२०) मॅक्स वेबर सीनियर आणि हेलेन वेबर यांच्या मुलांमध्ये थोरले होते. वेबरच्या बहुआयामी व्यक्तिमत्व आणि जागतिक दृष्टिकोनाचे प्रतिनिधित्व केले. वेबरची आई खूप धर्मिक होती. तर त्यांचे पिता हुकूमशहा धार्मिक दृष्टिकोनाशिवाय होते आणि बुर्जुआ जीवनशैलीची अपेक्षा करीत होते. वैचारिक आणि मानसिक तणाव अनुभवणाऱ्या मॅक्स वेबरवर पालकांमधील धार्मिक आणि भावनिक मतभेदांचा खोलवर परिणाम झाला. त्यावेळी जर्मनीतील राजकीय गोंधळामुळे वेबरही त्रस्त झाले होते. वेबरच्या आयुष्याच्या सुरूवातीस

धार्मिक विश्वास आणि त्यांच्या कुटुंबातील राजकीय आणि आर्थिक स्वारस्याच्या प्रतिच्छेदनचा परिणाम स्पष्ट झाला. वेबर यांनी त्यांचे वैयक्तिक तणाव, त्यांची चिकित्सक कौशल्ये त्यांच्या मूलभूत नातेसंबंधांच्या शोधाशी निगडीतपणा आणि सर्जनशील अलौकिक बुद्धिमत्तेकडे वळविली. ज्यामुळे त्यांनी प्रोटेस्टंट नीतिशास्त्र आणि भांडवलवादाचा शास्त्रीय अभ्यास केला.

## ६.२ धर्म आणि भांडवलशाहीचा उदय

मार्क्स आणि वेबर दोघेही भांडवलशाहीच्या विश्लेषणासाठी आणि त्यांच्या धर्माशी संबंधित असलेल्या कामाने ओळखले जातात. मार्क्स हा एक आर्थिक विश्लेषक होता. त्याच्या मते समजातील सर्व सामाजिक, सांस्कृतिक, राजकिय आणि तांत्रिक बाबी आर्थिक शक्तींना निर्धारीत केल्या जातात. प्रोटेस्टंट एथिक आणि स्पिरिट ऑफ कॅपिटलिझम या शास्त्रीय अभ्यासामध्ये वेबर यांनी हे सिद्ध केले की प्रगती आणि परिवर्तन घडवून आणण्यासाठी आर्थिक घटकच, केवळ घटक नाहीत तर समाजाच्या वैयक्तिक कृती आणि विकासाला आकार देण्यासाठी धार्मिक संस्था सारख्या इतर शक्तीही तितकेच महत्त्वाच्या आहेत. वेबरचा असा विश्वास होता की मार्क्स यांनी मांडलेल्या धर्म व संकल्पनेपेक्षा हा धर्म वेगळा काहीतरी समजला जाऊ शकतो. जो धर्म आणि कामगार अविभाज्य असा विचार करणारा मार्क्स होता. मार्क्स यांच्या मते धर्म हा माणसाची खोटी चेतना आहे. - ''जनतेचा अफीम'' - म्हणून ते धर्माचा उल्लेख करतात. भांडवलशाहीमुळे होणारे शोषण आणि त्रासांचा तात्पुरते सामना करण्यासाठी सर्वहारा वर्गीयांना धर्म मदत करतात. वेबर यांच्या मते धर्म हा अर्थिक हितांनी निर्माण केलेली विचारधारा नव्हती तर आधुनिक भांडवलशाही जगाला वास्तव बनविणारी होती. हे मानणे चुकीचे ठरेल की वेबरने मार्क्सच्या एकतर्फी अर्थिक दृढनिष्ठेला वैचारिक निर्धारकरणाची जागा दिली. त्यांनी सामाजिक, अर्थिक आणि राजकीय घटकांचा देखील विचार केला परंतु धर्मिक मुल्यांच्या संगमाने मुख्य भूमिका बजावली.

मार्क्स आणि वेबर दोघेही सहमत आहेत की तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे संपत्ती आणि तर्कसंगतता जमा करण्याच्या इच्छेमुळे भांडवलशाहीचा उदय झाला. तथापि, भांडवलशाही वाढीस इतिहासाच्या पूर्वानुमानानुसार मार्क्सने पाहिले आहे, परंतु वेबरचा यांना असा विश्वास आहे की हे प्रोटेस्टंट आचार व नितितत्त्व यातून कठोर परिश्रम आणि संपत्ती जमा करण्यावर कसा भर दिला जातो आणि भाडवलशाहीचा विकास होतो.

मार्क्स हे भांडवलशाहीकडे व्यक्तीवर प्रभाव टाकणारी संकल्पना म्हणून पाहतात ते वेबर एक तर्कसंगतता म्हणून पाहतात. आपल्या युक्तिवादात ते भांडवलशाहीला जग विभागणारे एक उत्पादन मानतात. धर्म आणि भांडवलशाहीवरील त्यांच्या कार्यामध्ये तर्कसंगततेविषयी वेबर याचा विचार स्पष्ट झाला. प्रोटेस्टंट एथिक अँड स्पिरिट ऑफ कॅपिटलिझममध्ये वेबर यांनी स्पष्ट केले की यांत्रिकी उत्पादनांच्या आर्थिक आणि तांत्रिक परिस्थितीशी जोडलेली पाश्चात्य संस्कृतीतील बुद्धिमत्ता मुळतः धर्मिक मूल्यांकडून प्रेरित कशी होते. काळाच्या ओघात धार्मिक मुल्ये त्यांचे महत्त्व गमावल्यामुळे आणि तांत्रिक आणि आर्थिक बाबी प्रत्येकाचे जीवन निश्चित करणारी आणि त्यांना लोखंडी पिंजऱ्यात जखडून टाकणारी एक अतुलनीय शक्ती बनली.

वेबरला धर्म आणि पश्चिमेत सापडलेल्या भांडवलशाहीच्या विकासाच्या संबंधात रस होता. त्याला मूलभूतपणे जगाच्या धर्माच्या विचारांच्या व्यवस्थेमध्धे भांडवलशाहीच्या भावनेत

आणि युक्तिवादामध्ये आधुनिक मानदंज व मूल्यांची प्रणाली म्हणून रस होता. धर्म आणि भांडवलशाहीवरील त्यांच्या कार्यामध्ये क्रॉस-कल्चरल ऐतिहासिक संशोधनाचा एक महत्वाचा भाग होता. एका स्तरावर हा धार्मिक विचार आणि भांडवलशाहीच्या भावना यांच्यातील संबंधांचा अभ्यास होता आणि दुसऱ्या स्तरावर कॅल्व्हिवादाची तर्कसंगती धर्मिक व्यवस्था कशी विकसित झाली ज्यामुळे भांडवलशाहीचा विकास झाला याचा अभ्यास होता.

## ६.३ प्रोटेस्टंट नितीतत्त्व आणि भांडवलशाही आत्मा

प्रोटेस्टंट नितीतत्त्व आणि स्पिरिट ऑफ कॅपिटलिझम (Protestant Ethic and the Spirit of Capitalism) वेबर यांनी आपल्या कार्यामध्ये हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला की भांडवलशाही साठी केवळ अर्थिक घटकांमुळे प्रभाव पडत नाही, त्यांना विश्वास होता की मार्क्सची मोठी कमजोरी आणि अपयश आहे. मार्क्स यांनी भांडवलशाही विकासासाठी आर्थीक घटकांना जबाबदार ठरविले हि बाब चुकीची आहे.

प्रोटेस्टंट एथिक ऑड स्पिरिट ऑफ कॅपिटलिझममध्ये वेबर यांनी प्रोटेस्टंटिझमचा मुख्यत्व कॅल्व्हनिझमचा भांडवलशाहीच्या भावविश्वावर होणारा परिणाम शोधून काढला.

धार्मिक मूल्ये आणि अर्थिक हितसंबंध बऱ्याच घटकांमुळे चालना दिले गेले. वेबर यांच्या लक्षात आले की प्रोटेस्टंट लोक हे अनेक उद्योगांचे प्रमुख आहेत आणि कॅथलिक लोकांपेक्षा इतर धर्मिक गटांपेक्षा अधिक संपत्ती आणि आर्थिक साधन त्यांच्याकडे होती. म्हणूनच प्रोटेस्टंट नीतिनियम आणि भांडवलशाहीच्या भावनांमध्ये आवश्यक सामजस्य आहे की नाही हे शोधण्याची त्यांची इच्छा होती. भारत, चीन आणि मध्य पूर्वमधील धार्मिक मूल्ये भांडवलशाहीच्या विकासासाठी कोणत्या प्रमाणात सुलभ किंवा अडथळा आणत आहेत हे शोधण्याचा त्यांनी प्रयत्न केला. प्रोटेस्टंट  नीतीतत्त्व आणि भांडवलशाही परिभाषित करण्यासाठी वेबरने आदर्श प्रकारच्या संकल्पनेचा उपयोग केला. प्रोटेस्टंट नितीतत्वानी धार्मिक आदर्श बनविणाऱ्या मूल्ये हे विश्वासांच्या संचाचा उल्लेख केला. भांडवलशाही त्यांच्या आदर्श प्रकारातील तर्कसंगत संस्था आणि उत्पादन व्यवस्थापनाच्या काळजीपूर्वक कार्यप्रणालीद्वारा जास्तीत जास्त नफा मिळविण्यासाठी रेखित केलेली जटिल क्रियाप्रक्रिया आहे.

वेबर यांनी सोळाव्या आणि सतराव्या शतकात पश्चिमस भांडवलशाहीचा उदय त्यावेळच्या भौतिक परिस्थितीमुळे आणि भांडवलशाहीचा विकास अधिग्रहणात्मक वृत्तीमुळे झाला हे मानसिक स्पष्टीकरण नाकारले. त्याचे मत होते की सोळाव्या शतकात धार्मिक क्रांतीद्वारे तयार केलेल्या धर्मिक कल्पना मुख्य स्पष्टीकरण अभ्यास घटक होते. वेबर यांनी प्रोटेस्टेटिझममधील अनेक मूल्ये ओळखली, विशेषतः कॅल्व्हिनवाद, ज्यामुळे भांडवलशाहीची वाढ झाली. (अब्राहम आणि मॉर्गन १९८९)

**१. विधीवादी आणि इतर ऐहिक प्रवृत्तीपासून भूपृष्टीय व्यावहारिकतेकडे बदल:** मानवी समाजाचे गूढवादात गुंतण्याऐवजी व्यवस्था / वास्तववाद समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे ही मूलतः एक संस्कारविरोधी वृत्ती होती जी विज्ञान आणि तर्कशुद्ध तपासणीच्या विकासास अनुकूल आहे.

**२. कामाबद्दल बदललेला दृष्टिकोन :** काम म्हणजे उपासना. प्रोटेस्टंट नीतीतत्त्व श्रमाला देवाच्या कार्यासाठी योगदान देणारे पुण्य कर्म म्हणून पाहतो. त्यामुळे आर्थिक स्वार्थाचा पाठपुरावा करणे केवळ स्वार्थ नव्हे तर नैतिक कर्तव्य होते.

**३. आवाहन करण्याची संकल्पना :** कॅल्व्हनिझमध्ये पूर्वनिर्धारण अनुमान करण्याची कल्पना आली. लोक एक तर जतन केलेल्या किंवा बहिष्कृत झालेल्यापैकी असावेत असा अंदाज होता. आणि कोणतीही गोष्ट त्यांचे अंतिम नशीब बदलू शकत नाही. त्यांचा असा विश्वास होता की अशी चिन्हे आहेत ज्याद्वारे देव प्रत्येक व्यक्तिला सूचित करतो की ते तारलेल्यांमध्ये आहेत की नाही. लोकांना कठोर परिश्रम करण्याचे, आवाहन केले गेले. जेणेकरून त्यांना तारण मिळाल्याची चिन्हे उघडकीस आणता येतील जे अर्थिक यशामध्ये सापडतील कॅल्व्हनिस्ट धर्म मानणार्यांना फायदेशीर उद्यमांचा शोध घेण्याची, संपत्ती साठवण्याची आणि व्यावसायिक व्यक्ति बनण्याचे आणि त्यांचे नशिब सिद्ध करण्याचे आवाहन केले गेले.

**४. कर्जावरील व्याज वसुलीसाठी नवीन दृष्टीकोन :** कॅल्व्हनिझमने कर्जावरील व्याजांचे संग्रहण करण्यास सूचविले ज्याला कॅथलिक धर्मात मनाई होती. यामुळे आर्थिक क्रियाकलाप वाढले. कर्ज देणारी ठिकाणे स्थळे स्थापन झाली, नवीन गुंतवणूक झाली आणि नवीन प्रवाही भांडवल वाढले.

**५. मद्यपानास बंदी, सुट्टीस नकार :** यामुळे भांडवलाचा जास्तीत जास्त वापर आणि इतर गुंतवणूकीसाठी अधिकाधिक उत्पादन मिळविण्यासाठी साक्षरतेचे आणि शिक्षणाचे प्रोत्साहन यासाठी वर्षभर काम करण्यास प्रोत्साहित केले आहे.

**६. प्रोटेस्टंट नीतीतत्त्व :** प्रोटेस्टंट नितीतत्व, या विचारात हे समाविष्ट आहे की एखाद्याने ऐहिक सुखापासून दूर राहावे एकीकडे लोकांना संपत्ती जमा करण्याचा आग्रह आहे आणि दुसरीकडे आनंद घेण्यासाठी संपत्तीचा वापर करण्यास मनाई आहे. अशा प्रकारे आनंद घेण्यासाठी नव्हे तर अधिकाधिक उत्पादन केल्याच्या समाधानासाठी नफ्याचा सतत शोध घेता येतो.

सामाजिक आणि अर्थिक परिस्थितीचा धर्मावर परस्पर परिणाम होतो हे वेबरला चांगले ठाऊक होते. अशा प्रकारच्या परस्पर सबंधांचा त्यांनी स्वीकार केला नसला तरी त्यांनी हे स्पष्ट केले की मार्क्सवाद्यांना दिलेल्या एकतर्फी भौतिकवादी स्पष्टीकरणासाठी एकांगी अध्यात्मवादी आणि वैचारिक अर्थ लावणे हे त्यांचे ध्येय नाही. इतर समाजात भांडवलशाही का उद्भवली नाही हे स्पष्ट करण्यासाठी वेबरने भांडवलशाहीच्या उदयासाठीच्या आध्यात्मिक आणि भौतिक अडथळ्यांचे स्पष्टीकरण केले. चीन आणि भारतातील भांडवलशाहीच्या विकासासाठी वेबर यांना विविध प्रकारच्या गैर-धार्मिक सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती अनुकूल आढळल्या परंतु कन्फ्यूशियनिझमची नैतिक प्रणाली आणि हिदू धर्मातील कर्माची कल्पना भांडवलशाहीच्या विकसासाठी अनुकूल नव्हती.

### ६.३.१ चीनमधील धर्म आणि भांडवलशाही:

भांडवलशाहीच्या विकासासाठी चीनकडे भौतिक पूर्वस्थिती होती. चीनमधे अधिग्रहण आणि बेईमान स्पर्धेची परंपरा होती, उद्योग होता, कामाची प्रचंड क्षमता, सामर्थ्यशाली संस्था, लोकसंख्या वाढत होती. या सर्व भौतिक परिस्थितीत देखील, चीनमध्ये भांडवलशाही निर्माण झाली नाही जशी ती पश्चिमेकडे झाली. असे नाही की चीनमध्ये भांडवलशाही नव्हती, एक सावकार सापडला ज्यांना जास्त नफा मिळाला- परंतु बाजारपेठे तसेच तर्कसंगत भांडवलशाही व्यवस्थेचे इतर घटक अनुपस्थित होते. वेबरच्या दृष्टीने चीनमधील सामाजिक, संरचनात्मक आणि धर्मिक अडथळ्यांमुळे भांडवलशाहीचा विकास रोखला गेला. संरचनात्मक घटकांपैकी हे घटक होते.

**१. चिन समुदायाची विशिष्ट रचना :** चिन समुदायात भावंडांच्या रूपाने कठोर नातेसंबंधाने एकत्र ठेवले गेले. इतर भावंडांवर राज्य केले जात असे व त्याची स्वतः ची स्वतंत्र संस्था होती. यामुळे बाजारपेठेच्या अर्थव्यवस्थेऐवजी छोट्या, जमीन धारण आणि घरगुती आधारित अर्थ व्यवस्थेस प्रोत्साहित केले. जमीन विभाजित केल्याने तांत्रिक घडामोडी रोखल्या गेल्या, शेती उत्पादन हे शेतकरी आणि औद्योगिक उत्पादनात लहान कारागिरांबरोबरच राहिले. भावंडांवरील निष्ठा असल्यामुळे, आधुनिक शहरे जी पश्चिम राजधानीची केंद्रे होती. विकसित करणे कठीण होते. या घटकांवर मुख्य प्रशासनास प्रभावीपण शासन करता आले नाही.

**२. चिनी राज्याची रचना :** परंपरेने चालवलेलं राज्य भांडवलशाहीच्या विकासासाठी संरचनात्मक अडथळा होता. प्रशासन आणि कायदा अंमलबजावणीची एक तर्कसंगत आणि गणनीय प्रणाली मोठ्या प्रमाणात अनुपस्थित होती. वाणिज्य क्षेत्राला व्यापणारी काही औपचारिक कायदे, केंद्रीय कोर्टाची अनुपस्थिती आणि कायदेशीर औपचारिकता नाकारणे ही भांडवलशाहीच्या वाढीस अडथळा ठरली. सर्वसाधारण प्रशासकीय रचना, नोकरदार मालक हितसंबंध असलेल्या नोकरशाही प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी भांडवलशाहीच्या विकासा विरुद्ध काम केले.

**३. चिनी भाषेचे स्वरूप :** वेबरच्या दृष्टीने चिनी भाषेचे स्वरूप पद्धतशीर विचार करणे कठीण करून तर्कसंगततेच्या विरोधात निर्माण केले गेले. बौद्धिक विचार बोधकथेच्या रूपात होता, ज्यामुळे ज्ञानाच्या संचयी शरीराचा विकास करणे कठीण झाले.

**४. चीनमधील कन्फ्यूशियानिझम आणि टाओइझम:** या दोन धार्मिक विचारांच्या प्रबळ प्रणालींनी भांडवलशाहीच्या भावनांच्या विकासाविरुद्ध काम केले. कन्फ्युशियानिझम मध्ये उच्च स्थानासाठी तांत्रिक ज्ञानापेक्षा साहित्य ज्ञान अदिक महत्त्वाचे होते. याने ''टोकाच्या साहित्यिक शिक्षणाला'' प्रोत्साहन दिले. साहित्यिक विचारवंत अर्थिक क्रियाकलाप आणि अर्थव्यवस्थेविषयी अनास्था होती. कन्फ्यूशियनिझम जगाचे मत हे राज्याचे धोरण बनले. अर्थव्यवस्था आणि समाजावर तर्कसंगतपण प्रभाव पाडण्याच चिनी राज्याने कमीतकमी भूमिक बजावली. केवळ कन्फ्यूशियन्स अधिकारी म्हणून काम करु शकले आणि बुर्जुआ, संदेष्टे आणि पुजारी यासारखे इतर प्रतिस्पर्धी यांना सरकारमध्ये काम करण्यास बंदी घातली.

munotes.in

कॅल्व्हनिस्टांसारख्या तारणासाठी काम करण्याऐवजी कन्फ्यूशियांनी गोष्ट जशाच्या तशाच स्वीकारल्या. कन्फ्यूशियन्सने काटकसरीला नकार दिला. फायदेशीर उद्यमातील सक्रिय गुंतवणूकी केवळ चांगल्या स्थितीवरच केंद्रित होती आणि उच्च नफ्यावर नव्हे तर नैतिकदृष्टा संशयास्पद होती. या सर्वांमुळे भांडवलशाहीचा उदय रोखला. वेबर यांना टाओइझम गूढ चीनी धर्म मानले गेले. ज्यामध्ये सर्वोच्च चांगले मानले गेली की ते एक मानसिक राज्य आहे. मनाचे राज्य आहे आणि वास्तविक जगामध्ये आचरणातून प्राप्त झालेले राज्य नाही. टाओवाद पारंपारिक होता आणि या जगात नाविन्यपूर्ण कृती करण्यास प्रेरणा देत नाही. जग बदलण्याची किंवा भांडवलशाही व्यवस्था तयार करण्याच्या कोणत्याही प्रेरणा नसल्यामुळे कन्फ्यूशियानिझम आणि ताओवाद भांडवलशाहीच्या उदयास अनुकूल नव्हते. त्यामुळे चीन मध्ये भांडवलशाहीचा विकास झाला नाही.

### ६.३.२ भारतातील धर्म आणि भांडवलशाही:

भारतात जातीचे संरचनात्मक अडथळे ज्यामुळे सामाजिक गतिमानता आणि लोकांच्या जीवन नियमन यावर निर्बंध आहेत. त्यामुळे भांडवलशाहीच्या विकासास रोखले गेले आहे. वरिष्ठ जाती विशेषतः ब्राह्मण कन्फ्यूशियन्ससारखे होते, त्यांच्या कल्पनांनी खाली काही कामे कनिष्ठ आहेत. साहित्यिक ज्ञानावर जोर देऊन, शिष्टाचारात लालित्य पाळणे आणि आचरणात प्रगती करणे, जगातील दैनंदिन कामकाजाकडे दुर्लक्ष करणे भांडवलशाहीच्या विकासासाठी अडथळे होते. जग क्षणिक असून पुनर्जन्म, मोक्ष प्राप्ती यावर जोर देऊन हिंदू धर्म विश्वासाने नियमांचे पालन केले जात असे. यामुळे भांडवलशाहीची आर्थिक व्यवस्था निर्माण करणारे आणि तर्कशुद्धपणे व्यवस्था केलेले समाज लोक निर्माण करू शकले नाही.

**आपली प्रगती तपासा**

१. भारत आणि चीनमधील भांडवलाच्या विकासाला कोणत्या घटकांनी प्रतिबंधित केले.

२. भांडवलशाहीकडे नेणाऱ्या प्रोटेस्टंट नैतिकतेची वैशिष्ट्ये कोणती आहेत.

## ६.४ वेबर यांचा वारसा

वेबरच्या लिखाणामुळे आधुनिक समाजशास्त्रांना आधार तयार झाला. त्याचा प्रभाव समाजशास्त्र, राजकारण, धर्म आणि अर्थशास्त्र या क्षेत्रांवरती होता. वेबरचे कार्य ऐतिहासिक

संशोधन आणि समाजशास्त्रीय सिद्धांताचे मिश्रण दर्शविते. ठोस परिस्थिती आणि ऐतिहासिक प्रक्रियेवरील त्यांचा अभ्यास, सामाजिक क्रियांच्या रचनेचे त्याचे विश्लेषण, धर्मांचा तुलनात्मक अभ्यास, आधुनिक समाजातील तर्कसंगतता आणि नोकरशाहीवरील त्यांचे लेखन हे समाजशास्त्र महत्त्वपूर्ण योगदान आहे. वेबरने आपल्या संकल्पना सुधारण्यासाठी आणि विविध सामाजिक घटनांशी संबंधित सामान्य सैद्धांतिक योजना विकसित करण्यासाठी इतिहास, तत्त्वज्ञान, धर्म आणि सामाजिक संरचना या विषयातील ज्ञानाचा भरपूर उपयोग केला. वेबर सर्वात महत्त्वाचा वारसा म्हणजे त्याचे कार्य मार्क्सवादी विश्वदृष्टीसमोर असलेले एक आव्हान आहे. इतिहासाला काही अर्थ आहे की नाही या विषयी मार्क्सवादाला वेबर आव्हान देतात.

अल्फरड शुत्झ यांनी वेबरच्या भाषांतर सिद्धांताची संकल्पना म्हणून त्यांच्या कार्याची सुरूवात केली म्हणून वेबरचे समाजशास्त्र हे प्रयोगशास्त्रज्ञांनी वापरले आणि त्यानुसार घडवून आणले. समाजशास्त्रीय स्पष्टीकरणासाठी व्हर्स्टेनचा अभ्यास महत्त्वाचा असल्याचे शुत्झ यांनी मान्य केले. प्रगत भांडवलशाही समाजातील वर्गाच्या अत्याचाराच्या पद्धतीच्या विश्लेषणाचा प्रारंभिक बिंदू म्हणून समीक्षण सिद्धांताचे वेबरने युक्तिवाद आणि तर्कसंगत कायदेशीर वर्चस्वाचे विश्लेषण वापरले. अमेरिकेत वेबेरिय समाजाशास्त्र परिचयात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या टेलकोट पार्सनने वेबरच्या सामाजिक कृती सिद्धांताला त्याच्या ''ऐच्छिक'' सिद्धांताचा पाया बनविला. सामाजिक स्तरीकरणाचे सिद्धांत मार्कवादी स्तरावरील प्रतिमानापेक्षा वेबेरियनवर आधारित आहेत. वेबर यांचे धर्माची मीमांसा, तुलनात्मक समाजशास्त्रत अजूनही एक महत्त्वपूर्ण योगदान मानले जाते.

संघटनांचा अभ्यास आणि संघटनात्मक संशोधनात विवेकबुद्धी, अधिकार आणि नोकरशाहीविषयी वेबरच्या कल्पना आज सर्व संबंधित आहेत. संघटनेविषयी वेबरची चर्चा विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात लिहिली गेली. उत्तर अमेरिकन समाजशास्त्रज्ञ जॉर्ज रिट्झर यांनी 'समाजातील नोकरशाही' पुढे आणि अधिक सखोल पुढे जाण्याचे सुचवले. त्याने मॅक्डॉनल्ड्सच्या रेस्टॉरंट्सचा दृष्टांत म्हणून घेतला. परंतु त्याचे व्यापक परिणाम घडले.

वेबर यांचे धर्माची मीमांसा तुलनात्मक समाजशास्त्र आजही समाजशास्त्रातील महत्त्वपूर्ण योगदान म्हणून पाहिले जाते. नोकरशाहीला ''लोखंडी पिंजऱ्यात'' कैद करण्याची वेबरची कल्पना आधुनिक समाजात कास्टल्सने नवीन जागतिक अर्थव्यवस्थेला 'ऑटोमॅटॉन' म्हणून संबोधले आहे. त्याला वाटते की आपण तयार केलेल्या जगावर आपण आता पूर्णपणे नियंत्रण ठेवणार नाही. जसे कॅस्टल सांगतात : आमच्या यंत्रानी आमच्या जगावर नियंत्रण ठेवल्याचे पाहिलेले मानवतेचे भयानक स्वप्न वास्तविकतेच्या काठावर दिसते. इलेक्ट्रॉनिक अर्थिक व्यवहाराचा भाग म्हणून नोकरी किंवा सरकारी संगणक यांना दूर केले नाही तर आमच्या जीवाचे रक्षण करण्याची कामही रोबोट करू लागले आहेत. सर्व मानवी व्यवहार आता यंत्र करीत आहेत.

**आपली प्रगती तपासा :**

१. कोणत्या समाजशास्त्रज्ञांनी वेबरच्या कार्यपद्धतीचा त्यांच्या कार्याचा प्रारंभ म्हणून उपयोग केला आहे.

munotes.in

## ६.५ सारांश

प्रोटेस्टंट एथिक आणि स्पिरिट ऑफ कॅपिटलिझमच्या वेबरच्या कामात वेबरने प्रोटेस्टंटिझमचा प्रभाव शोधला, विशेषतः कॅल्व्हनिझमध्ये भांडवलशाहीच्या विकासास प्रेरणा मिळाल्या. वेबर यांचा असा विश्वास होता की भांडवलशाहीच्या उदयासाठी प्रोटेस्टंट नितीतत्त्व हे महत्त्वाचे कारण होते. चीन आणि भारतातील भांडवलशाहीच्या विकासासाठी वेबर यांना विविध प्रकारच्या गैर धार्मिक सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती अनुकूल आढळल्या परंतु कन्फ्यूशियनिझमची नैतिक प्रणाली आणि हिंदू धर्मातील कर्माची कल्पना अनुकूल नव्हती. तर्कसंगतता, अधिकार, नोकरशाही आणि धर्म यासंबंधी वेबरच्या कल्पनांनी समाजशास्त्रात महत्त्वपूर्ण योगदान आहे जे आधुनिक समाज समजून घेण्यासाठी संबंधित आहेत.

## ६.६ प्रश्न

१. भांडवलशाहांच्या विकासात प्रोटेस्टंट आचारसंहितांच्या भूमिकेविषयी चर्चा करा.

२. धर्म आणि भांडवलशाही समजून घेण्यात मार्क्स आणि वेबर यांच्या विचारातील फरक तपासून पहा.

३. पश्चिमेकडील भांडवलशाहीच्या वाढीसाठी प्रोटेस्टेन्टिझममधील नैतिक श्रद्धा कशी विश्लेषणात्मक होती हे समजून सांगा.

४. आधुनिक समाज समजून घेण्यासाठी वेबरच्या प्रासंगिकतेविषयी विचारांचा सहभाग चर्चा करा.

## ६.७ संदर्भ


- Abraham, F and Morgan, J. 1989. Sociological Thought: From Comte to Sorokin. USA: Wyndham Press.
- Adams, Bert N. and R. A. Sydie. 2002. Sociological Theory. Vistaar Publication.
- Ashley, D., Orenstein, D. 2005. Sociological Theory-Classical statements, 6th Edition. Pearson Education.
- Cole, Nicki Lisa, Ph.D. "Max Weber's Key Contributions to Sociology." ThoughtCo, Aug. 28, 2020, thoughtco.com/max-weber-relevance-to-sociology-3026500.
- Giddens, A. 2009. Sociology 6th Edition. Polity Press.

- Greenwood, R and Lawrence, T. The Legacy and Relevance of Max Weber for Organization Studies. The Iron Cage in the Information Age: The Legacy and Relevance of Max Weber for Organization Studies. Editorial (sagepub.com)
- Haralambos and Holborn (2013) Sociology Themes and Perspectives. HarperCollins Publishers.
- Kalberg S. 1980. Max Weber's Types of Rationality: Cornerstones for the Analysis of Rationalization Processes in History: The American Journal of Sociology, Vol. 85, No. 5 (Mar., 1980), pp. 1145-1179 Published by: The University of Chicago Press
- Macionis, J and Plummer, K. 2008. Sociology – A Global Introduction 4th Edition. Pearson Education.
- Ritzer, G. 2011. Sociological Theory Eighth Edition. USA: McGraw Hill.
- Scott, J. (2006) Social Theory: Central Issues in Sociology. New Delhi: Sage Publications.
- Turner, J.H. (2013) Contemporary Sociological Theory. New Delhi: Sage Publication.


*****

munotes.in

# ७

# पाश्चात्य आधुनिकतेच्या संदर्भात जॉर्ज सिमेल सामाजिक वास्तविकता, वैयक्तिक जाणिवांचे तीन स्तर

**प्रकरण रचना**


७.० उद्दिष्टे

७.१ प्रस्तावना

७.२ पार्श्वभूमी

७.३ पाश्चात्य आधुनिकतेच्या संदर्भात जॉर्ज सिमेल

७.४ चिंतेची पातळी आणि क्षेत्रे

७.५ द्वंद्वात्मक विचारसरणी

७.६ फॅशन

७.७ वैयक्तिक जाणीव

७.८ सारांश

७.९ प्रश्न

७.१० संदर्भ


## ७.० उद्दिष्टे

१. पाश्चात्य आधुनिकतेच्या संदर्भात जॉर्ज सिमेलचे योगदान समजून घेणे.

२. जॉर्ज सिमेलच्या चिंतनाची पातळी आणि क्षेत्रे तपासणे

३. वैयक्तिक जाणीव या कल्पनेचे मुल्यमापन करणे

## ७.१ प्रस्तावना

जॉर्ज सिमेल जर्मन समाजशास्त्रज्ञांच्या पहिल्या पिढीतील एक होते. मार्क्स, वेबर, दुर्खीम किंवा अगदी पार्सनसारखे समाजशास्त्रात जॉर्ज सिमेल यांना तितके प्रभावशाली मानले जात नाही. या समाजशास्त्रज्ञांचे महत्त्व असुनही २० व्या शतकाच्या उत्तरार्धात अमेरिकन सिद्धांतावर यांचा फारसा प्रभाव नव्हता. अमेरिकेच्या काही सुरुवातीच्या अनेक समाजशास्त्रज्ञांवर सिमेलचा प्रभाव होता. अलिकडील वर्षात समाजशास्त्रीय सिद्धांतावरील सिमेलचा प्रभाव वाढताना दिसत नाही.

munotes.in

## ७.२ पार्श्वभूमी

जॉर्ज मिसेल (१८५८-१९१८) यांचा जन्म १ मार्च १८५८ रोजी बर्लिन, जर्मनी येथे झाला. इमॅन्युएल कांट यांच्या तत्त्वज्ञानाच्या सिद्धांताच्या अभ्यासावर आधारीत १८८१ मध्ये त्यांनी डॉक्टरेट मिळविली, पदवीनंतर, सिमेल यांनी आपल्या अल्मा मॅटरमध्ये तत्त्वज्ञान, मानसशास्त्र आणि प्रारंभिक समाजशास्त्र हे अभ्यासक्रम शिकविले. ते वंशाने ज्यू होते आणि जर्मन शैक्षणिक व्यवस्थेत त्यांना सिमांतिक किंवा वंचित केले गेले. केवळ १९१४ मध्ये सिमेल यांना नियमित शैक्षणिक नियुक्ती मिळाली, आणि ही नियुक्ती बर्लिनपासून खुप दुर ट्रान्सबर्ग येथे होती. या समस्या असुनही त्यांनी मंडळाचे स्वरुप, संस्कृती, सामाजिक संरचना, शहर आणि अर्थव्यवस्था यावर विस्तृत लेखन केले. त्यांचे लेखन दुरखीम आणि वेबर यांनी वाचले आणि या शतकाच्या सुरुवातीच्या काळात सिमेलने समाजशास्त्र आणि युरोपियन बौद्धिक जीवनात मोठे योगदान दिले. 'द मेट्रोपोलिज अ‍ॅण्ड मेटल लाईफ' (१९०३) हे त्यांचे सर्वात प्रसिद्ध लेखन आहे आणि त्यांचे सर्वात प्रसिद्ध पुस्तक 'द फिलॉसॉफी ऑफ मनी'(१९०७) हे आहे. जॉर्ज लुकास (१८७३-१९७१) या मार्क्सवादी विचारवंतावर सिमेलच्या कल्पनांचा मोठा प्रभाव होता. शहर आणि पैसा यावरील लेखनाचा समकालीन समाजशास्त्रज्ञ वापर करत आहेत.

## ७.३ पाश्चात्य आधुनिकतेच्या संदर्भात जॉर्ज सिमेल

सिमेलने तीन प्रमुख अभिजात लेखकांच्या विचारांचा समन्वय केला. ते हेगेल आणि कांट यांच्या विचारांनी प्रभावित होते. जेव्हा सिमेल सामाजिक संरचना, शहर, पैसा आणि आधुनिक समाज यावर चर्चा करतात तेव्हा त्यांचे विश्लेषण दुरखीमच्या (वैयक्तिक आणि समाजाची समस्या) वेबरच्या (विवेकीकरणाचे परिणाम) आणि मार्क्सच्या (परात्मभाव) विश्लेषणाशी समानता दर्शविते. सिमेलच्या मते समाज मुक्त किंवा स्वतंत्र व्यक्तींचे संघटन आहे. भौतिक जागाप्रमाणे समाजाचा अभ्यास केला जाऊ शकत नाही. उदा. समाजशास्त्र हे मानवाच्या आंतरक्रियांचे नियंत्रण करणाऱ्या नैसर्गिक नियमनांचा शोध घेण्यापेक्षा अधिक काही आहे. सिमेलसाठी समाज हा व्यक्ति व्यक्तिंमधील आंतरक्रियांनी मिळून बनतो. समाजशास्त्रज्ञांनी या संघटनांच्या रूपांत आणि आकृतीबंधाचा अभ्यास केला पाहिजे. वैयक्तिक आणि लहान समुहाच्या पातळीवरील सामाजिक आंतरक्रियांवरील हा सिमेलचा भर आणि आंतरक्रियांचे अध्ययन ही समाजशास्त्राची प्राथमिक जबाबदारी हा सिमेलचा दृष्टिकोन मार्क्स आणि दुरखीम या सारख्या अभिजात लेखकांपेक्षा वेगळा आहे, संरचनात्मक दृष्टिकोनासह वैयक्तिक कृतीचे विश्लेषण एकत्रित करण्याचा सिमेलचा प्रयत्न त्याच्या लेखनाला समकालीन उत्साहाबरोबर जोडतो.

सिमेलने आपली चौकशी सगदी तळापासून सुरू केली, सर्वात लहान सामाजिक आंतक्रियांचे निरीक्षण करून त्यांच्यापासून मोठ्या आकाराच्या संस्था कशा उदयास येतात हे पहाण्याचा प्रयत्न केला. असे करताना इतर सिद्धांतकारांनी चुकलेले एक घटित अनेकदा त्यांच्या लक्षात आले. उदाहरणार्थ, सिमेलने असे पाहिले की, आंतरक्रियामधील असलेली संख्या त्याच्या स्वरुपावर परिणाम करु शकते. दोन लोकांमधील संवाद (Dyad डायड) तीन लोकांमधील (Triad त्रिकुट) संबंधापेक्षा खूप वेगळा असेल. (फरगानीस, पृष्ठ १३३)

munotes.in

सभासद संख्या व गटस्वरुप यांच्यातील संबंधाबाबतचे सीमेलचे विवेचन दोन व्यक्तींच्या गटापासून सुरू होते. दोन व्यक्तींचा गट हा सर्वात लहान गट म्हणता येईल. या गटात व अन्य गटांमध्ये असणारे काही मूलभूत भेद केवळ सभासद संख्येवर आधारित आहेत. दोन व्यक्तींचा गट हा परस्पराभिमुख असणाऱ्या दोन व्यक्ती मिळून बनत असल्याने या गटाचे अस्तित्व दोन व्यक्तींचा परस्पराभिमुख संबंधावर आधारित असतो. दोन व्यक्तीपैकी कोणत्याही एका व्यक्तीने संबंधातून माघार घेतली तर हा गट विलयास जात असल्याने त्यांच्याहून निराळे असे अस्तित्व या गटास प्राप्त होत नाही. व्यक्तीहून निराळे असे अस्तित्वच या गटात पद व कार्यांचे विभाजन झालेले नसते व दोन्ही व्यक्तींना सांघिक कार्याची जबाबदारी पूर्णपणेच उचलावी लागते. दोघांपैकी कोणाही एकास जबाबदारी अंगाबाहेर टाकता येत नाही किंवा झालेल्या गोष्टी बद्दलचा दोष गटावर लादतचा येत नाही. (वैद्य नी.स.)

या दोघांच्या गटात जर आणखी फक्त एक व्यक्तीची भर पडली तर गटस्वरुपात गुणात्मक परिवर्तन घडून येतात. दोन व्यक्तीऐवजी आता गट तिघांचा होणे, ही बाब तशी क्षुल्लकच वाटण्यासारखी असली, तरी तिचा गटांतर्गत प्रक्रियावर व गटसंरचनेवर होणारा परिणाम लक्षात घेतला तर तिचे गटस्वरुपदृष्टया असणारे महत्त्व स्पष्ट होऊ शकेल. पहिली गोष्ट म्हणजे गटातील सभासदांची संख्या तीन होताच गटास व्यक्तिहून निराळे व स्वतंत्र असे अस्तित्व प्राप्त होते. कारण या गटास प्रथमतः एक विरुद्ध दोन अशी शक्यता निर्माण होते. एकावर इतर दोघांच्या मतांचे व विचारांचे दडपण येऊ शकते व परिणामतः व्यक्तीच्या वर्तनावर गटाची बंधने प्रस्थापित होऊ लागतात. गटाच्या उद्दिष्टासाठी व्यक्तीच्या वर्तनाचे नियमन करणे आवश्यक होऊ लागते. तिघांच्या गटातच प्रथमतः आपणास आपल्या सामाजिक जीवनातील द्वंद्वात्मकतेचे प्रत्यंतर येण्यास सुरुवात होते. गटाचे बंधन व व्यक्तीचे स्वातंत्र्य यांच्यातील द्वंद्व ज्यात जाणवते, असा हा सर्वात लहान गट होय.

गटांतर्गत प्रक्रियांवर गट तीन व्यक्तीच्या होत जाण्याचा कसा परिणाम होतो, त्याचे स्पष्टीकरण करताना सीमलने तीन प्रक्रियांचा उल्लेख केला आहे. दोन व्यक्तीच्या गटात जर दोघांमध्ये कलह उत्पन्न झाला तर त्यांच्यात मध्यस्थी करून त्यांची दिलमजाई करणारा असा तिसरा कुणीच नसतो. तीन व्यक्तींच्या गटात ही शक्यता प्रथम अस्तित्वात येते. कलहामुळे गटाचे अस्तित्वच धोक्यात आले असता दोघांमधे तडजोड घडवून आणून गटाचे अस्तित्व मध्यस्थाची भूमिका वटवणाऱ्या तिसऱ्या व्यक्तीकडून कायम राखले जाऊ शकते. पण ही एकच भूमिका तिसरी व्यक्ती वठवू शकते, असे नाही. दोघांमध्ये भांडण लावून मजा बघण्याचा व त्यांच्या भांडणाचा स्वतःच फायद्यासाठी उपयोग करुन घेण्याची भूमिकाही तिसऱ्या व्यक्तीस वठविता येणे शक्य आहे. दोघांमधील भांडण कायम ठेऊन  दोघांवरही आपले प्रभुत्व व्यक्तीस प्रस्थापित करता येणे शक्य आहे. सत्ता संतुलन तत्त्वाची ही अत्यंत लहान प्रमाणावर होणारी अभिव्यक्तीच आहे. दोघांच्या गटात तिसरी व्यक्ती समाविष्ट झाल्यास ती गटांतर्गत कोणकोणत्या प्रक्रिया संचालित करु शकते, हे वरील विवेचनावरुन स्पष्ट होऊ शकेल. पण केवळ एका व्यक्तीची गटात भर पडली तर कोणकोणत्या प्रक्रिया गटात संचालित होण्याचा संभव असतो. याची रुपरेषाच तेवढी वरील विवेचनात देण्यात आली आहे.

वर उल्लेखलेल्या प्रक्रियां प्रमाणेच अन्य काही प्रक्रिया संचालित होणे शक्य आहे. सिमेलने गटात केवळ एक व्यक्ती आणखी आल्यास गटात कोणकोणते बदल घडून येऊ लागतात. या संबंधी केलेले विवेचन त्यांच्या निरीक्षण सूक्ष्मतेचे द्योतक आहे.

लघु गट संशोधन, प्रतिकात्मक आंतरक्रियावाद आणि विनिमय सिद्धांताच्या विकासात महत्त्वापूर्ण भूमिका निभावणारे मायक्रोबायोलॉजिस्ट म्हणून सिमेल यांना चांगले ओळखले जाते. सिमेलच्या या क्षेत्रातील सर्व योगदानातून असे प्रतिबिंबित होते की, त्याचा विश्वास समाजशास्त्रज्ञांनी प्रामुख्याने सामाजिक आंतरक्रियांचे प्राथमिक स्वरुप आणि प्रकार अभ्यासले पाहिजेत यावर होता.

**आपली प्रगती तपासा**

१) पाश्चात्य आधुनिकतेच्या संदर्भात जॉर्ज सिमेल यांचे विचार स्पष्ट करा.

## ७.४ चिंतेची पातळी आणि क्षेत्रे

सामाजिक वास्तविकतेच्या अधिक गुंतागुंतीच्या आणि अत्याधुनिक सिद्धांतासाठी सिमेलचा उत्कृष्ट सन्मान केला जातो. रिट्झर आणि गुडमन (२००४) मध्ये उद्धृत केल्यानुसार टॉम बोटमोर आणि डेव्हिड फ्रिस्बी यांच्या मते, सिमेलच्या कार्यात सामाजिक चिंतन करण्याचे चार मूलभूत स्तर आहेत.

१. सामाजिक जीवनातील मानसिक चिंतांविषयी सूक्ष्म समज.

२. मोठ्या प्रमाणात परस्पर संबंधांच्या समाजशास्त्रीय घटकांमधील आवड.

३. स्थूल स्तरावर, त्यांच्या काळातील सामाजिक आणि सांस्कृतिक प्रेरणांमधील रचना आणि बदल यावरचे त्याचे कार्य.

४. सामाजिक वास्तवाच्या या तीन तिरंगी प्रतिमेमुळेच नाही तर उच्च पातळी खालच्या पातळीवरुन उदयास येते असे उदयाचे तत्त्व ही त्यांनी स्वीकारले. सिमेलच्या मते, जर समाज स्वतंत्र विज्ञानाचा स्वायत्त वस्तू बनवायची असेल, तर त्या वस्तुस्थितीतूनच तो निर्माण होऊ शकतो आणि त्याद्वारे बनविलेल्या स्वतंत्र घटकांच्या बेरजेपैकी एक नवीन अस्तित्व उदयास येते. सामाजिक विज्ञानातील सर्व समस्या केवळ वैयक्तिक मानसशास्त्राच्या असतील. या तीन स्तरांचे परीक्षण करणे हे चौथे आहे. ज्यामध्ये जीवनाचे अंतिम अभौतिक तत्व समाविष्ट आहे.

वरील सर्व सत्यांमुळे सिमेलच्या कार्यावर परिणाम झाला आणि त्याने जगाच्या भविष्यातील दिशानिर्देशांची प्रतिमा तयार करण्यास महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

munotes.in

**समाजशास्त्राची समस्या क्षेत्रे :** समाजशास्त्रातील समस्या क्षेत्रे (The Problem Areas of Sociology) या मधील तीन लक्षणीय समस्या क्षेत्रांची सिमेलची व्याख्या सामाजिक वास्तवाच्या काही पातळ्यासह वरील चिंतनास पुनरुत्पादित करते.

१. त्याने प्रथम शुद्ध समाजशास्त्र असे वर्णन केले. यामध्ये मानसशास्त्रीय चलांना आंतरक्रियेच्या रुपांशी जोडले, जरी सिमेलने कर्त्यास क्रियाशील मानसिक क्षमता असते असे गृहित धरले असले तरी त्याने सामाजिक वास्तवाच्या त्याच्या पैलुंकडे थोडेसेच लक्ष दिले. त्याच्या अत्यंत लहान कृती या आंतक्रियांच्या रुपाशी जोडलेल्या होत्या. आंतरक्रियांच्या या रुपांमध्ये शोषण, वर्चस्व, विनिमय, संघर्ष, सामाजिकता इ. चा समावेश होतो. या प्रकारच्या त्याच्या कृतीमध्ये त्यांनी आंतरक्रियेच्या संरचनेतील दर्जामध्ये भिन्नता दर्शविली आहे. उदा. स्पर्धक आणि प्रतिस्पर्धक.

संबंध- स्वरुपांच्या निर्मितीप्रमाणेच त्यांना पूरक ठरणाऱ्या सामाजिक व्यक्तिमत्त्वांच्या त्याने रेखाटलेल्या चित्रांनाही समाजशास्त्रीय विश्लेषणदृट्या बरेच महत्त्व आहे. वाईट, उधळा (Spendthrift), त्रयस्थ किंवा परका (Stranger), साहसी (Adventurer), पळपुटा (The renegade) या त्यांनी रेखाटलेल्या काही व्यक्तिचित्रांचा या संदर्भात उल्लेख करता येण्यासारखा आहे. प्रत्येक व्यक्तिमत्त्व इतर व्यक्तीच्या व्यक्तीप्रत होणाऱ्या प्रतिक्रियांमुळे व व्यक्तीकडून इतरांच्या असणाऱ्या अपेक्षांच्या प्रभावामुळे कसे घडत जाते, याचे सिमेलने केलेले विश्लेषण अनन्यसाधारण आहे.

२. मधल्या पातळीवर सीमेल चे सामान्य समाजशास्त्र हे सांस्कृतिक आणि समाजाच्या मानवी इतिहासाच्या सामाजिक सांस्कृतिक फलितांना स्पष्ट करते.

३. शेवटी, सिमेलच्या तत्त्वज्ञानात्मक समाजशास्त्रामध्ये मानवी मनाचे अपरिहार्य प्राक्तन आणि मूलभूत स्वरूप यावरील त्याचा दृष्टिकोन स्पष्ट केला आहे

## ७.५ द्वंद्वात्मक विचारसरणी

सामाजिक वास्तवाच्या तीन मूलभूत स्तरांमधील परस्परसंबंधांचे स्पष्टीकरण करण्याचे सिमेलचे मार्ग त्याच्या समाजशास्त्रास द्वंद्वात्मक वैशिष्ट्यांनी अधोरेखित करतात. मार्क्सच्या द्वंद्वात्मक दृष्टिकोनाची आठवण करुन देणारे हे स्पष्टीकरण वाटते. मार्क्स आणि सिमेल यांच्या द्वंद्वात्मक दृष्टिकोनामध्ये साम्यता असली तरी त्यांच्या मध्ये भिन्नताही आहे. सामाजिक जगताच्या विभिन्न पैलूंवर आणि जगाच्या भविष्याच्या विभिन्न प्रतिमांवर त्यांनी प्रकाश टाकला. मार्क्सच्या क्रांति तत्त्वाशिवाय सिमेलचा दृष्टिकोन वेबरच्या दृष्टीकोनाच्या जवळ जाणारा वाटतो. सिमेलने द्वंद्ववादातील आपले उत्तर दायित्व विविध मार्गांनी अभिव्यक्त केले. उदाहरणार्थ रिटझरच्या मते, सिमेलचे समाजशास्त्र नेहमी संबंधाशी विशेषतः आंतरक्रिया (संघटना) यांच्याशी संबंधित होते. सामान्यपणे सिमेल हे पद्धती शास्त्रीय संबंधवादी (Mathodological relationist) होते. संघर्ष आणि कलहाच्या संदर्भात जगाचे चांगले आकलन होऊ शकते असा सिमेलचा विश्वास होता असे मत अभ्यासक मांडतात

## ७.६ फॅशन

२० व्या शतकात फॅशनवर भरपूर लिहले गेले असले तरी त्या संबंधीचे व्यवस्थित सिद्धांत कमी आहेत. फॅश संबंध जॉर्ज सिमेल यांची मांडणी उत्कृष्ट आहे. फॅशन संबंधी त्यांचा पेपर १८९५ मध्ये प्रकाशित झालेला, जुना असला तरी फॅशन विषयी सामान्य सिद्धांत मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

सिमेल यांच्या मते, फॅशन म्हणजे सांस्कृतिक गुणवैशिष्ट्यांमधील असंचयी बदल होय. फॅशन ही विशिष्ट सामाजिक परिस्थितीतील मूलभूत तणावापासून निर्माण होते. एका बाजूला आपल्यापैकी प्रत्येकाचीच दुसऱ्यांचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती असते. तर दुसऱ्या बाजूला आपण इतरांपासून वेगळे कसे आहेत, हे दाखविण्याची ही प्रवृत्ती असते.

सिमेलच्या मते, फॅशन ही जीवनाच्या अनेक रूपांपैकी एक आहे. प्रत्येक सामाजिक संबंधामध्ये दोन शक्ती असतात. एक आपणांस अनुकरणाद्वारे इतरांबरोबर बंदिस्त करते तर दुसरी आपणांस इतरांपासून वेगळे करते. आपल्यापेक्षा उच्च असणाऱ्यांचे आपण अनुकरण करित असतो. थोडक्यात, फॅशन हे वर्ग विभिन्नतेचे फलित आहे. फॅशन अस्तित्वासाठी समाज स्तरित असला पाहिजे. काही समाज सदस्यांमध्ये न्यूनगंड आणि अहंगंड असले पाहिजेत. उदाहरणार्थ, काही उच्चवर्गीय मुलींनी नव्या प्रकारचा स्कर्ट परिधान करण्यास सुरुवात केली तर लवकरच कनिष्ठ वर्गातील मुलीला तिचे अनुकरण करावेसे वाटले त्यामुळे बाजारात त्या प्रकारच्या परंतु कमी किंमत असलेल्या स्कर्टची मागणी वाढेल. थोडक्यात या स्कर्टमुळे आता उच्च वर्गीय मुलींमध्ये आणि कनिष्ठ वर्गीय मुलींमध्ये फरक राहणार नाही. अशावेळी उच्च वर्गीय मुलगी पुन्हा एकदा इतरांपेक्षा आपण कसे वेगळे दिसू यासाठी प्रयत्न करेल.

वेगळेपणा आणि अनुकरण एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. पहिला दुसऱ्यांना आदर्श मानून अनुकरण करतो तर दुसरा इतरांपासून आपण वेगळा कसा आहे हे दाखवतो. फॅशनमुळे विविध सांस्कृतिक व सामाजिक वर्गातील संरचनात्मक विभिन्नतेवर फारसा परिणाम होत नाही. परंतु वेगळेपणाची विविधताही विस्तृत होते. उदाहरणार्थ, अभिजन हॅट किंवा सौंदर्य आस्वादाचा स्वीकार करून इतरांपासून स्वतःस वेगळे दाखवतात. थोडक्यात, अभिजन अशा वेगळेपणाचा जास्तीत जास्त विस्तार करतात. थोड्या काळात हे अभिजन अद्वितीयच असतात.

सिमेलच्या दृष्टीने फॅशन शहर विकसित होते. कारण तिथे सामाजिक संबंधाची बहुविधता असते. सामाजिक गतिशीलतेचे प्रमाण वाढलेले असते आणि कनिष्ठ स्तरांच्या शैलीपासून स्वतःस वेगळे दाखविण्यात व्यक्तींना इथे परवानगी असते. पारंपारिक लहान वस्ती स्थानाच्या वर्तुळात फॅशनला काही अर्थ नसतो ती अनावश्य वाटते. शहरात फॅशन व्यक्तीना त्यांचे स्वतःचे व्यक्तिमत्त्व आणि वैयक्तिक मुल्यांच्या अभिव्यक्तीस परवानगी देते.

### आपली प्रगती तपासा

फॅशन संदर्भातील सिमेलचे विचार स्पष्ट करा.

## ७.७ वैयक्तिक जाणीव

सिमेल यांनी संघटनांच्या रुपांवर जास्त प्रकाश टाकला आहे. वैयक्तिक जाणीवांच्या मुद्दयाकडे तुलनेने कमी लक्ष दिले आहे. सिमेलच्या मते, जे एकमेकांशी विविध प्रेरणा हेतू आणि हितसंबंधासाठी अंतक्रिया करतात अशा व्यक्तीमधील किंवा व्यक्तींच्या समूहामधील जाणीव हा सामाजिक जीवनाचा आधार आहे. क्रियाशीलतेतील सिमेलचा हा उत्साह त्याच्या अंतक्रियांच्या विविध रूपांच्या चर्चेमध्ये अभिव्यक्त झाला आहे.

समाजाची नियमने आणि मूल्ये वैयक्तिक जाणीवांमध्ये अंतरीकृत झालेले असतात. नियमने आणि मूल्यांचे अस्तित्व अशाप्रकारे अंतर्गत आणि बहिर्गत असते.

सिमेलसाठी व्यक्ती आणि समाजामध्ये द्वंद्वात्मक तणाव असतो. व्यक्ती स्वतंत्र असतात. जरी त्या सामाजिकरण प्रक्रियेचा भाग असल्या तरी, त्याच्याकडे सृजनशील प्रेरणा असते. सिमेल या संबंधांनी अस्वस्थ होते. आधुनिक समाजत व्यक्ती ऐतिहासिक आणि पारंपारिक बंधनांपासून मुक्त, स्वतंत्र झाल्या परंतु नागरी जीवनाच्या संस्कृतीमध्ये परात्मभावाचा अनुभव सुद्धा व्यक्ती घेत आहेत, असे प्रतिपादन ते करतात.

सिमेल नोंदवितात कि, आधुनिक जीवनातील समस्या या व्यक्तीच्या स्वायत्ता विषयक दाव्यांपासून आणि जबरदस्त सामाजिक शक्तींना सामोरे जाण्यातून वैयक्तिकतेच्या त्याच्या अस्तित्वामुळे, बाह्य संस्कृती आणि जीवनाच्या तंत्रज्ञानामुळे निर्माण होते.
सिमेल यांनी व्यक्ति आणि समाजाबद्दल तीन गृहितके मांडली आहेत.

१. व्यक्ती समाजात आणि बाहेर दोन्हीही असतात.
२. संप्रेषणात्मक आंतरक्रियांच्या संजांलांमध्ये व्यक्ती वस्तु आणि व्यक्ती ही असते
३ व्यक्तींना स्वयं परिपूर्ण होण्याची प्रेरणा असते. ते स्व-संकल्पनेशी एकात्म होऊ शकतात. दुर्खिमने नोंदविल्या प्रमाणे, समाजसुद्धा त्यांना एकात्म करण्याचा प्रयत्न करतो.

सामाजिक जगतामध्ये लोकांकडून आंतरक्रियांची विविध रूपे आणि शैली यांची निर्मिती केली जाते. वरील गृहितके व्यक्तीच्या इतर व्यक्तीबरोबर होणाऱ्या आंतरक्रियांमधून प्रत्यक्षात दिसतात. रिटझर नोंदवितात कि, मानवामध्ये सर्जनशील जाणीव असते. विविध प्रकारच्या प्रेरणा, उद्देश आणि हितसंबंधांसाठी एकमेकांबरोबर आंतरक्रिया असणाऱ्या जाणीवजागृत व्यक्ती आणि व्यक्तीचे समूह हा सामाजिक जीवनाचा आधार आहे. लोक जाणीव जागृत असतात आणि सृजनशील व्यक्ती आणि मन हे सामाजिक आंतरक्रिया आणि या परस्पर अभिमुखतेमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असते. ही क्रियाशीलता व्यक्तीला लवचिकता आणि स्वातंत्र्य देते. पण त्याचवेळी या स्वातंत्र्यास अडथळा ठरणाऱ्या वस्तुनिष्ठ संस्कृतीच्या संरचनेच्या निर्मितीस ही ती मदत करते. सामाजिक आंतरक्रिया नियमित होतात आणि त्यांचे आकृतीबंध तयार होतात

आणि संघटनाचे रूप घेतात. हे आकृतीबंध आणि रूपे आणि त्यासंबंधी आशयाचा समाजशास्त्रज्ञांनी अभ्यास केला पाहिजे असे सिमेलचे प्रतिपादन आहे.

याचा अर्थ असा कि, समाज ही त्याची स्वतःची स्वतंत्र वास्तवता नाही. परंतु समाज हा आंतरक्रियांनी जोडलेल्या असंख्य व्यक्तींचे नाव आहे. समाज हा नक्कीच असा काही पदार्थ नाही, काही निश्चित किंवा ठोस नाही, परंतु एक घटना आहे. इतरांकडून एखाद्या व्यक्तीच्या भाग्य आणि विकासास प्राप्त करण्याचे आणि प्रभावित करण्याचे कार्य समाज करतो. सिमेलसाठी समाज जिवंत अनुभवाशिवाय काही नाही. सामाजिक शक्ती बाह्य नसतात किंवा एखाद्या व्यक्तीसाठी आवश्यक मर्यादा नसतात. या उलट, व्यक्तींच्या क्रिया प्रतिक्रियांद्वारे त्या व्यक्ती समाजाची प्रत्येक क्षणाला पुनर्निर्मिती करतात. रिटझर नमूद करतात कि, ''समाज एक वास्तविक भौतिक अस्तत्व आहे.'' या दुर्खिमच्या मताशी सिमेलने असहमती दर्शवली. समाज हे व्यक्तीचे संकलन आहे. या दृष्टीने न पाहता समाज हे आंतरक्रियांचा संच आहे असा पवित्रा त्यांनी स्वीकारला.

सामाजिक एककांमधील व्यक्ती स्वतंत्र किंवा एककाचा घटक भाग असणे आवश्यक आहे. सिमेलने वैयक्तिक स्व आणि सामाजिक स्व मध्ये फरक केला आहे. जर स्व जाणीव नसेल तर प्रतिकात्मक आंतरक्रिया अदृश्य होतील आणि मानवी अनुभव केवळ उत्तेजनास प्रतिसाद देतील.

**ॲश्ले आणि ओरेनस्टीन** लिंग आणि लिंगभावाचा वापर करून एक उदाहरण देतात. पुरुषप्रधान किंवा असमान स्त्री-पुरुषांच्या नात्यांत, संबंध घनिष्ठ आणि उस्फूर्त असल्याचे दिसून येते. खरं तर, जर परिस्थिती प्रबळ आणि दुय्यम किंवा शोषित असेल तर, संबंधाचे स्वरुप प्रबळ आणि दुय्यम किंवा शोषित या दोघांच्या अपेक्षेनुसार बनलेले असते. वर्चस्व आणि शरणागतीचे वस्तुनिष्ठ प्रकार ज्यामध्ये व्यक्तिनिष्ठ म्हणून विचार केला जातो. ते व्यक्ते केले जाऊ शकते. हे प्रबळ आणि शोषित संबंध देखील परस्पराआंतरक्रियांचा भाग असलेल्या व्यक्तिनिष्ठ प्रेरणेद्वारे कायम राखले जातात.

सिमेलच्या अंतक्रियांच्या रुपांच्या सर्व चर्चेवरुन हे स्पष्ट होते कि, कर्ते एकमेकांशी जाणीवपूर्वक अभिमुख असले पाहिजेत. उदा. स्तरीकरण व्यवस्थेत अंतक्रियेतील शासक आणि शोषित हे एकमेकांशी अभिमुख असणे आवश्यक असते. ही परस्पर अभिमुखतेची प्रक्रिया अस्तित्वात नसली तर स्तरीकरण व्यवस्था कोसळते. हेच अंतक्रियेच्या इतर सर्व रुपांच्या किंवा प्रकारांच्या संदर्भात म्हणता येईल.

सिमेल नोंदवितात कि, समाजा बाहेरचे असे काही नाही परंतु ते माझे प्रतिनिधित्व स्वरुप आहे. ते जाणीवेच्या कृतीवर अवलंबून आहे. त्याला वैयक्तिक जाणीवांचा अर्थ माहित होता. समाजाची नियमने आणि मूल्ये हे व्यक्तीच्या जाणीवमध्ये अंतरीकृत झालेले असतात, हे तथ्य ते अधोरेखित करतात.

थोडक्यात, जाणीवांशी संबंधित सिमेलचे चिंतन त्याच्या विविध कृतींमधून प्रकट झालेले आपण पाहू शकतो.

## ७.८ सारांश

थोडक्यात, जॉर्ज सिमेल जर्मन समाजशास्त्रज्ञांच्या पहिल्या पिढीतील एक होते. मार्क्स, वेबर, दुर्खिम किंवा पार्सनप्रमाण समाजशास्त्रात जॉर्ज सिमेल यांना तितके प्रभावशाली मानले जात नाही. समाजशास्त्रज्ञांचे महत्त्व असूनही २० व्या शतकाच्या उत्तरार्धात अमेरिकन सिद्धांतावर फारसा प्रभाव नव्हता. अमेरिकेच्या सुरुवातीच्या अनेक समाजशास्त्रज्ञांवर सिमेलचा प्रभाव होता. तो प्रारंभीक अमेरिकन समाजशास्त्रज्ञ म्हणून ओळखला जातो. अलिकडच्या वर्षात समाजशास्त्रीय सिद्धांतावर सिमेलचा वाढता प्रभाव स्पष्ट आहे.

## ७.९ प्रश्न

१) पाश्चात्य आधुनिकतेच्या संदर्भात जॉर्ज सिमेल यांच्या विचारांवर प्रकाश टाका

२) फॅशन संदर्भात सिमेलचे विचार स्पष्ट करा.

३) वैयक्तिक जाणीवांबद्दल सिमेलचे विचार सांगा.

## ७.१० संदर्भ


१. रिटझर जॉर्ज, सॉशिओलॉजिकल थेअरी (पाचवी आवृत्ती), टाटा मॅकग्राहिल एज्युकेशन प्रा. लि. न्यू दिल्ली.

२. वैद्य नी. स., समाजशास्त्रीय विचार परंपरा, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९८१.

३. कुलकर्णी पी. के., सामाजिक विचार प्रवाह, मंगेश प्रकाशन, नागपूर २००८

४. गर्गे. स.मा., भारतीय समाज विज्ञान कोश, खंड १ ते ५, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे.


*****

munotes.in

# ८

# पैश्याचे तत्त्वज्ञान आणि सिमेलचा वारसा

**प्रकण रचना**

८.० उद्दिष्टे
८.१ पैश्याचे तत्त्वज्ञान
८.१.१ प्रस्तावना
८.१.२ पैश्याचे तत्त्वज्ञान
८.१.३ पैसा आणि मुल्य
८.१.४ पैसा, अवैयक्तिकीकरण आणि विवेकीकरण
८.१.५ नकारात्मक प्रभाव
८.१.६ निष्कर्ष
८.२ आजच्या काळातील सिमेलचा वारसा
८.२.१ प्रस्तावना
८.२.२ गट संलग्नतेचे जाळे
८.२.३ मृत्यू आणि वारसा
८.३ सारांश
८.४ प्रश्न
८.५ संदर्भ

## ८.० उद्दिष्टे

१. जॉर्ज सिमेल यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे पैश्याचे तत्त्वज्ञान समजून घेणे.

२. समकालीन संदर्भात त्याच्या सिद्धांताचे मुल्यांकन करणे.

३. सिमेलच्या योगदानाच्या प्रभावाचे त्याच्या वारसाद्वारे मूल्यमापन करणे.

## ८.१ पैश्याचे तत्त्वज्ञान

### ८.१.१ प्रस्तावनाः

लोक असा विचार करतात की, पैसा म्हणजे नाणी आणि नोटा ज्याद्वारे आपणास वस्तु आणि सेवांची खरेदी करता येते. असे असले तरी समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता पैसा हे अधिक काहीतरी आहे. उदा. मानवशास्त्रज्ञ मेरी डग्लस आत्यंतिक आणि विशिष्ट प्रकारचे विधी असे पैशाची व्याख्या करतात. तत्त्वज्ञ शोपेनहॉवर म्हणतात की, पैसा म्हणजे मानवी आनंद होय. अर्थशास्त्रज्ञ ॲडम स्मिथ यांनी पैश्याकडे श्रम म्हणून पाहिले. लिओ टॉलस्टॉय म्हणतात की,

पैसा हे गुलामी आणि भयाचे नवे रूप आहे, होली कॅथॉलिक म्हणतात पैश्यांवरील प्रेम हे सर्व वाईटाचे मुळ आहे. अर्थशास्त्रज्ञ जॉन केन्स म्हणतात की, स्वतःच्या हितासाठी धनाचा संचय करणे हा एक प्रकारचा पॅथॉलॉजिकल आजार आहे. मार्क्सने योग्य प्रकारे पैश्याचा उपयोग करणे ही असमानतेची मुलगामी पातळी असण्याची क्षमता आहे. परंतु लोकांवर वर्चस्व गाजवणाऱ्या परदेशी संस्था ज्यापासून लोकांचे शोषण होते ते देखील आहे. पैशाची व्यवस्था लोकांना गरजू बनवते त्यावर मार्क्सचा विश्वास होता असे असले तरी जॉर्ज सिमेल पैश्याकडे स्वतंत्र, मुक्त म्हणून पाहतात. सिमेल त्याच्या पैश्याच्या तत्त्वज्ञानामध्ये पैशाचा सामाजिक अर्थ स्पष्ट करतात आणि पैशाकडे प्रतिक म्हणून पाहतात. ते पैश्याच्या काही परिणामाकडे लक्ष वेधतात. सिमेल यांच्या मते प्रत्येक समाजामध्ये पैसा वैयक्तिक किंवा मुल्यांचे वस्तुनिष्ठ मापन आहे. विनिमयाच्या अर्थव्यवस्थेकडून पैशाच्या अर्थव्यवस्थेकडे होणारे स्थित्यंतर सार्वजनिक संबंध आणि सामाजिक आंतरक्रियांमधील स्थित्यंतर अधोरेखित करतात. समाजातील पैशाचा वापर अनोळखी व्यक्तिमधील वैयक्तिक संबंध सक्षम करते.

### ८.१.२ पैश्याचे तत्त्वज्ञान (Philosophy of Money):

सिमेलची मुख्य कृती पैसा आणि पैश्याच्या सामाजिक अर्थाशी संबंधित आहे. पैश्याचे तत्त्वज्ञान या पुस्तकात सिमेल यांनी व्यापक सामाजिक समस्यांशी संबंध जोडला आहे. मार्क्सच्या भांडवल किंवा वेबरच्या अर्थव्यवस्था आणि समाज या ग्रंथाइतके हे पुस्तक विस्तृत आणि परिपूर्ण नसले तरी दुरखीमच्या श्रमविभाजन या पुस्तकाशी त्याची तुलना होऊ शकते.

पैश्याचे तत्वज्ञान या ग्रंथामध्ये सिमेल यांनी पैश्याच्या अर्थव्यवस्थेच्या सामाजिक, मानसिक आणि तात्त्विक पैलूंचे विश्लेषण केले आहे. सिमेल पैश्याकडे सामाजिक संबंधाचे रूप म्हणून पाहतो. विनिमय, मानवी व्यक्तिमत्त्व, स्त्रियांचा दर्जा आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यांच्याशी पैश्याच्या असणाऱ्या संबंधाचे ते विश्लेषण करतात. सिमेलनी आधुनिक पैश्याच्या अर्थव्यवस्थेच्या परिणामांची श्रमविभाजनाची विशेषतः अलगीकरणाच्या प्रक्रियेची श्रम आणि नागरी जीवनातील अवैयक्तिकीकरणाची अंतर्दुष्टीच आपणास दिली आहे. सिमेलच्या शिर्षकावरुन सिमेलचा पैशावरील भर स्पष्ट दिसत असत असला तरी त्याची रूची व्यापक अश्या सिद्धांतिक तत्त्वज्ञानात्मक समस्यांच्या संचामध्ये अंतर्भूत आहे.

१. सिमेलची रुची ही मुल्यांच्या व्यापक मुल्यांमध्ये होती आणि मुल्यांचे विशिष्ट स्वरुप म्हणून पैशाकडे पाहिले जाऊ शकते असे त्यांचे मत होते.

२. दुसऱ्या पातळीवर त्या पैश्यामद्ये रुची नव्हती पण कर्त्याच्या आंतरिक जगतातील घटीतांच्या व्यापक पातळीवरील परिणामामध्ये आणि एक समग्र म्हणून वस्तूनिष्ठ संस्कृतीमध्ये त्याला रुची होती.

३. तो पैश्याकडे जीवनाच्या विविध घटकाशी संबंधित एक विशिष्ट घटित म्हणून पाहतो ज्यामध्ये विनिमय मालकी, हाव, उधळपट्टी निंदयपणा, वैयक्तिक स्वातंत्र्य, जीवनशैली, संस्कृती व्यक्तिमत्त्वाचे मुल्य इत्यादींचा समावेश होतो.

४. शेवटी सिमेल पैश्याकडे जीवनाचा विशिष्ट घटक म्हणून पाहतो जो आपणास जीवनाची समग्रता समजण्यास मदत करतो.

तो त्याच्या काळातील अर्थिक प्रश्नांकडे सामान्य सांस्कृतिक समस्यांच्या विशिष्ट अभिव्यक्तीकडे वस्तूनिष्ठ संस्कृतीचे व्यक्तिनिष्ठ संस्कृतीकडून होणारे अलगीकरण या रुपात पाहतो. त्यांच्या पैश्याच्या तत्त्वज्ञानाची सुरुवात पैसा आणि मुल्यांच्या सामान्य रुपांच्या चर्चेने होते. त्यानंतर तो कर्त्यांच्या आंतरिक जगावरील पैशाच्या प्रभावाच्या चर्चेकडे आणि सामान्यतः संस्कृतीवरील प्रभावाच्या चर्चेकडे वळला.

### ८.१.३ पैसा आणि मुल्यः

पैसा आणि मूल्य यांच्यातील आंतरसंबंध हे सिमेलच्या विचारांच्या केंद्रस्थानी होते. त्यांच्या मतानुसार, व्यक्तीमधील प्रत्यक्ष आंतरक्रिया म्हणून असणारे विनिमयाचे कार्य हे एक स्वतंत्र संरचना असणारे पैश्याच्या रुपातील स्फटिक आहेत. ते म्हणतात कि, वस्तु तयार करण्यातून व्यक्ती मूल्यांची निर्मित करतात आणि स्वतःस त्या वस्तुंपासून वेगळे करतात. वस्तू संपादण्यातील अडचण जेवढी मोठी तेवढी त्या वस्तूचे मूल्य जास्त असते. सामान्यतः वस्तुचे मूल्य हे वस्तुपासून स्वतःस दूर ठेवण्याच्या लोकांच्या क्षमतेवरुन येते. वस्तुचे संपादन जितके सहज तितकी ती वस्तू मौल्यवान नसते. ज्या वस्तूचे संपादन करणे अवघड आणि अशक्य असते. त्या वस्तुसुद्धा आपल्यासाठी मौल्यवान नसतात. बहुतेक मौल्यवान वस्तू दूरच्या ही नसतात आणि जवळच्या ही नसतात. वस्तूना मौल्यवान आणि अमौल्यवान करणाऱ्या घटकांमध्ये वेळ, दुर्मिळ आणि वस्तू संपादण्यातील अडचणी या घटकांचा समावेश होतो. लोक प्राप्य वस्तुंच्या संपादण्यापासून स्वतःस योग्य अंतरावर ठेवण्याचा प्रयत्न करतात.

अर्थिक क्षेत्रात पैसा वस्तूपासून अंतर निर्माण करण्यासाठी आणि वस्तुच्या संपादण्यासाठी साधन म्हणून काम करतो. आधुनिक अर्थव्यवस्थेमध्ये मूल्य हे वस्तूला जोडलेले असते. आपण पैशाशिवाय ते मिळवू शकत नाही. पैसा मिळविण्यातील अडचण आणि त्याच्या संपादनातील अडचण त्याला आपल्यासाठी मौल्यवान करते. जेव्हा आपल्याकडे पुरेसा पैसा असतो तेव्हा आपण आणि वस्तु यांच्यातील अंतरावर मात करण्यासाठी पात्र होतो. अशाप्रकारे पैसा हे मोठे मनोरंजक कार्य करतो. नाणी, नोटा, करार यांच्यासह लोक संस्थात्मक संबंध यांच्यातले बंध आणि संपर्क पैसा निर्माण करतो. उदा. प्रभुत्व आणि परावलंबनाचे संबंध हे ज्या व्यक्तीकडे पैसा जास्त किंवा कमी आहे त्यांच्यासाठी परिमाणात्मक संबंध बनतात. पैश्याचा उपयोग व्यक्तीला वस्तुंपासून प्रतिबंध करतो आणि या अंतरावर मात करण्यासाठी साधने पुरवतो. समाजातील व्यक्तीसाठी मोठ्या लवचिकतेस सहमती देतो. उदा. जास्त अंतरावरील प्रवास, त्यांच्या वैधतेद्वारे शक्य तेवढ्या चिन्ह किंवा प्रतिकांचा संचय, मालकी किंवा दर्जा आणि वैयक्तिक मर्यादांवर मात इ.

### ८.१.४ पैसा, अवैयक्तिकीकरण आणि विवेकीकरणः

मूल्य निर्मितीच्या प्रक्रियेत बाजाराच्या विकासासाठी आधुनिक अर्थव्यवस्थेसाठी आणि आधुनिक समाजासाठी पैसा सुद्धा पुरवला जातो. स्वतःचे समग्र जीवन संपादण्यासाठी पैसा साधन पुरवतो. जी व्यक्तीसाठी बहिर्गत आणि दबावात्मक असतात. व्यापारावर आधारित प्रारंभीच्या समाजात यामुळे विसंगती निर्माण झाली. ज्याचा परिणाम आधुनिक जगाचे व्यवच्छेदक लक्षण असणाऱ्या अवैयक्तिककृत जगतामध्ये झाला नाही. पैसा या विकासाला विविध मार्गांनी परवानगी देतो. उदा. सिमेल म्हणतो कि, पैसा दिर्घकालीन हिशोब, मोठ्या पातळीवरील व्यापार

आणि दिर्घकालीन पत यास परवानगी देतो. पैसा केवळ अवैयक्तिकीकृत जगाच्या निर्मीतीलाच मदत करत नाही तर सामाजिक जगताच्या वाढत्या विवेकीकरणाला ही योगदान देतो.

अवैयक्तिकीकृत संरचनांच्या विस्ताराबरोबर पैसा अशी केंद्रीय भूमिका करतो हे पाहणे अवघड होते.

अशा प्रकारे सिमेल सुचवितो की, पैश्याच्या प्रसारामुळे लोकांना पारंपारिक समाजात शक्य नसलेल्या इंप्रेशन मॅनेजमेंट वर वैयक्तिक नियंत्रण ठेवण्याची परवानगी देऊन त्यांना विविध प्रकारचे स्वातंत्र्य मिळते. तेथे अर्पित अस्मिता टाकून लदिल्या जातात. अनोळखी लोक देखील परिचित होतात आणि ज्ञात ओळख बनवितात कारण ते विनिमय करण्याचे सामान्य परंतु अव्यावसायिक साधन वापरण्यास तयार असतात.

त्याचवेळी वैयक्तिक ओळख किंवा अस्मिता समस्याप्रधान बनते. ज्यामुळे पैश्याच्या रुपातील विकासाचे सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम उद्भवतात. म्हणजे, वैयक्तिक स्वातंत्र्य मोठया प्रमाणावर वाढते.. पण तेथे अलगीकरण, तुकडेकरण आणि अस्मिता निर्मितीच्या समस्या असतात.

### ८.१.५ नकारात्मक प्रभाव :

ज्या समाजात पैसा स्वतःचा शेवट बनतो. व्यक्तीवर त्यांचे असंख्य नकारात्मक परिणाम होतात. त्यातील उल्लेखनीय परिणाम खालीलप्रमाणे आहेत.

**१. उपाहासवृत्तीत वाढ:** उपहास हा सामाजिक जीवनाच्या उच्च आणि कनिष्ठ अशा दोन्ही पैलुंना विक्रीसाठी आणि पैश्यासाठी प्रेरित करतो. अशाप्रकारे कोणी एक सौंदर्य, सत्य किंवा बुद्धिमत्ता याची जेवढया सहज खरेदी करू शकते तेवढ्या सहज आपण मक्याचे पोहे आणि सुवासिक अत्तरची खरेदी करु शकू अशाप्रकारे पैश्याबरोबर कोणत्याही वस्तुचे सममूल्य झाल्याने त्याची परिणती उपहास दृष्टिकोनात होते. जिथे बाजारात कोणत्याही वस्तूची खरेदी किंवा विक्री होऊ शकते.

**२. निंदा दृष्टिकोनात वाढ :** या पैश्याच्या अर्थव्यवस्थेतही दोषारोप वृत्तीचा समावेश होतो. जिथे प्रत्येक गोष्ट तितकीच निस्तेज आणि राखाडी रंगाची दिसते. दोषारोप वृत्तीची व्यक्ती विकलत घेतलेल्या वस्तूंच्या किंमतीमध्ये अर्धशतक करण्याची क्षमता गमावते.

**३. अवैयक्तिक संबंध :** पैश्याच्या अर्थव्यवस्थेचा दुसरा नकारात्मक परिणाम म्हणजे लोकांमध्ये अवैयक्तिक संबंधाची निर्मिती होय. व्यक्ती आणि त्यांच्या व्यक्तिमत्वाबरोबरच संबंध ठेवण्यापेक्षा आपण त्यांच्या सामाजिक स्थानाशी संबंध ठेवण्यास वाढ होत आहे. उदा. डिलेव्हरी मॅन, बेकर किंवा अशाप्रकारच्या स्थानाशी संबंधित व्यक्ती इ. अशाप्रकारे आधुनिक, आर्थिक समाजात आपण आपल्या अस्तित्वासाठी आणि उदरनिर्वाहासाठी जास्तीत जास्त इतरांवर अवलंबून आहोत. ज्यांनी ज्यांनी ही स्थाने संपादित केली त्या लोकांबद्दल आपणांस कमी माहिती असते. एखाद्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व त्यांच्याकडे असलेल्या पदांच्या ओळखी लपविण्याकडे झुकत आहे.

**४. मानवी मूल्यांचा संकोच :** पैश्याच्या अर्थव्यवस्थेचा दुसरा प्रभाव म्हणजे डॉलरच्या संदर्भात सर्वमानवी मूल्यांचा ऱ्हास होणे हा होय. सिमेलने पैश्यासाठी संभोगाच्या विनिमयाचे उदाहरण दिले आहे. वेश्या व्यवसायाच्या विस्ताराचे श्रेय पैश्याच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीस दिले जाऊ शकते. अशा प्रकारे सामाजिक जगात गुणात्मक घटकाऐवजी संख्यात्मक घटकांवर भर देण्यात आला आहे.

सिमेलच्या जीवन शैलीवरील पैश्याच्या परिणामाच्या चर्चेतील मुख्य सूत्र हे वैयक्तिक संस्कृतीच्या खर्चाने वस्तुनिष्ठ संस्कृतीतील वाढ ही होय. या दोन्हीमधील अंतर प्रवेगक दराने वाढते.

सिमेलसाठी आर्थिक विनिमयातील पैशाचा वापर हा नेहमीचा एखाद्या व्यक्तीस करावा लागतो. जो जास्तीत जास्त इच्छित गोष्टी करण्यासाठी काहीतरी त्याग करेल. प्रत्येक सामाजिक क्रिया ही विनिमय क्रिया असते यावर सिमेलचा विश्वास होता. म्हणून सामाजिक आंतरक्रिया म्हणजे पैसा किंवा प्रतिकांचा विनिमय होय. सिमेलच्या मते, व्यावहारिक जगातील पैशाचा तात्त्विक अर्थ हा एक सुरक्षित आकृती आणि उच्च फॉर्मूला दर्शवितो ज्यामुळे सर्व प्राणी विशिष्ट बनतात, त्यानुसार ते एकमेकांना समजून घेतात आणि परस्पर संबंधांद्वारे त्यांचे अस्तित्व मिळवतात.

## ८.१.६ निष्कर्ष

मार्क्स, वेबर किंवा दुर्खिम यांच्यापेक्षा सामाजिक संरचना किंवा तिची गतिशीलता या बद्दल त्याला कमी म्हणायचे असेल तर सिमेलचे समाजशास्त्र काही अर्थाने इतर अभिजात लेखकांसारखेच आहे. त्यांनी केलेली वस्तुनिष्ठ संस्कृतीची चर्चा आणि त्याचे पैशावरील लेखन हे वेबरच्या विवेकीकरणाशी संबंधित होते. त्याचा समाज विषयक दृष्टिकोन, सामाजिक आंतरक्रियावरील भर आणि शहरावरील त्यांचे लेखन हे समकालीन समाजशास्त्रासाठी उल्लेखनीय योगदान ठरले आहे.

क्षणिक संबंधासह संबंधाच्या रुपांच्या आणि आशयांच्या संदर्भात सिमेलने सामाजिक आणि सांस्कृतिक घटितांची चर्चा केली. सामाजिक शास्त्रातील विचारांच्या संरचनावादी शैलीस त्यांनी पुढे नेले. त्याच्या महानगरावरील कृतीने सिमेल नागरी समाजशास्त्राचे प्रणेता बनले. भविष्यातील प्रतिकात्मक आंतरक्रिया वादाच्या विकासावर आणि सामाजिक संजालाच्या विश्लेषणामध्ये सिमेलचा मोठा प्रभाव पडला.

पैश्याच्या तत्त्वज्ञानामध्ये सिमेलने पैश्याच्या अर्थव्यवस्थेतील सामाजिक, मानसशास्त्रीय आणि तात्त्विक पैलुंच्या चर्चेचे आपणांस एक दृष्टीच दिली आहे. विनिमयासाठी पैशाचा संबंध, मानवी व्यक्तीमत्त्व, स्त्रियांचा दर्जा, वैयक्तिक स्वातंत्र्य आणि मानवी अस्तित्वाच्या इतर क्षेत्रांचे त्यांनी विश्लेषण केले. त्यानंतर त्यांनी आपणांस आधुनिक पैशाच्या अर्थव्यवस्थेच्या परिणामांची आणि श्रमाविभाजनाची श्रमातील अवैयक्तिकीकरणाची, अलगीकरणाच्या प्रक्रियेची माहिती पुरविली. कदाचित त्यांच्या इतर कोणत्याही समाजशास्त्रीय कृतीपेक्षा पैश्याच्या तत्त्वज्ञानाने आम्हांस बहु विस्तृत आणि सामाजिक घटिताशी संबंधित यामधील आतरसंबंधाचे व्यापक विश्लेषण पुरविले आहे.

## ८.२ आजचा सिमेलचा वारसा

### ८.२.१ प्रस्तावना:

सिमेल यांच्या कार्याचा प्रभाव त्यांच्या थेट विचारांपासून बराच दूर असला तरी त्याची कल्पना नंतरच्या विचारवंतांनी स्वतःच्या कल्पनांपेक्षा जटिल आणि वैविध्यपूर्ण केल्या आहेत. त्यामुळेच सिमेलची ओळख व्यापक झाली आहे. सिमेलीयन वारसा ही त्यांच्या कृतीने प्रभावित झालेल्या समाजशास्त्रज्ञ आणि तत्त्वज्ञांचा आणि जर्मन, फ्रेंच बौद्धिक जगतातील त्याच्या कल्पनांचा सर्वसमावेशक अध्ययन आहे.

सिमेलने दुर्खिम, मार्क्स, हेगेल आणि कान्ट यांच्या कल्पनांवर आधारित त्याचा स्वतःचा दृष्टिकोन मांडला. सामाजिक संरचना, शहर, चलन आणि आधुनिक समाज यांचे त्यांचे विश्लेषण दुर्खिमच्या व्यक्ती आणि समाजाची समस्या यावरील विश्लेषणासारखे आणि वेबरच्या विवेकीकरणाच्या परिणामावरील कृतीसारखे आहे. पैश्याच्या प्रतीकात्मकते वरील सिमेलची कृती ही मार्क्सच्या अलगीकरणाच्या कृतीसारखीच आहे. असे असले तरी वर उल्लेखलेल्या विचारवंतांपेक्षा सिमेलची कृती कशी विभिन्न आहे हे स्पष्ट करायचे झाल्यास सिमेलने व्यक्ती आणि लहान समूह यांच्या सामाजिक आंतरक्रियांवर दिलेला भर अधोरेखित करता येईल. यासाठी सिमेल म्हणतात  कि, समाज हा व्यक्ती आणि परस्पर आंतरक्रियांनी बनला आहे. समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक नियमांसाठीचा शोध घेण्यापेक्षा या आंतरक्रियांच्या संघटनाच्या रुपांचा अभ्यास केला पाहिजे. शहर आणि पैसा यावरील सिमेलचे लेखन समकालीन समाजशास्त्रज्ञ सातत्याने वापरत आहेत.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या वर्षात सिमेल राहत होता. हा कालखंड इंटरनेट, डिजिटल तंत्रज्ञान आणि समाजमाध्यमांच्या पूर्वीचा आहे. ज्या घटकांनी आजचे दैनंदिन जीवन व्यापून टाकले आहे. दोन व्यक्तीच्या समूहापासून ते राष्ट्राच्या आंतरजाळ्यापर्यंत या सर्व सामाजिक घटकांची आणि संघटनांच्या रुपांना आणि आकृतीबंधांना अभिव्यक्त करणारा वेगळा असा हा विचारवंत होता. समूहातील सदस्यसंख्येमध्ये वाढ झाल्याने त्याचा सदस्यांच्या आंतरक्रियेवर कसा परिणाम होतो ते सिद्धांकन त्यांनी केले. कोणत्या पर्वाची त्याची अंतर्दृष्टी थक्क करणारी ठरेल. परंतु त्याहूनही त्यांनी कल्पनाही केली नसेल असे त्याच्या अंतदृष्टीचे प्रत्यक्ष कृतीत अवलंबन किंवा उपयोजन अधिक आश्चर्यकारक मानले जाते. अनेक विद्वान सामाजिक जीवनाचा अभ्यास करण्याच्या संरचनात्मक दृष्टिकोनाच्या पायभरणीचे श्रेय सिमल यांना देतात.

### ८.२.२ गट संलग्नतेचे जाळे:

समूह संलग्नतेचे जाळे यामध्ये सिमेल स्पष्ट करतात कि, आधुनिक पूर्व, औद्योगिकपूर्व काळातील व्यक्ती जेथे जेथे जात असत त्या तुलनेने अगदी कमी लोकांशी संपर्क साधत असत. गट बद्धता ही कुटुंब, शेजार, चर्च यासारख्या समूहाच्या केंद्रित वर्तुळाच्या प्रतिमानाने दर्शविली जाऊ शकतात. तंत्रज्ञानात्मक आणि सांस्कृतिक असे दोन्हीही घटक तिथे भूमिका बजावतात. लोक सहज जास्तीच्या अंतराचा प्रवास करु शकत नव्हते. जास्तीच्या अंतरावरील इतर

लोकांशी संपर्क ठेऊ शकत नव्हते. त्यांच्या गरजा आणि इच्छा म्हणूनच मर्यादित होत्या. याचा परिणाम व्यक्ती ही व्यक्ती असण्यापेक्षा समूहात लीन झालेली, समूहाची सदस्य म्हणून विचारात घेतली जात होती. ती समूह अभिमुख होती.

असे असले तरी वेगवान औद्योगिकरणामुळे वाहतूक दळणवळणाची पुरेशी प्रगती झाली. त्यामुळे असंख्य समुहाशी, वैविध्यपूर्ण समूहाशी, दूरवर असणाऱ्या अनेक गटांशी संपर्क करणे शक्य झाले. आता लोक अनेक कुटुंबे, मैत्री, व्यावसायिक आणि इतर हितसंबंध गटांमध्ये सहभागी होऊ शकतात. यातील काही एकमेकांपासून स्वतंत्र होते आणि जे इतरांना छेदतीलही. ही सामाजिक वर्तुळे एकमेकांना आच्छादित करू लागली तसेच क्लिष्ट पद्धती आणि आकृतीबंधामध्ये मोठ्या प्रमाणात वाढायला लागली. अखेरीस अगणित वैयक्तिकीकरणाच्या श्रेणीमध्ये ती विस्तृत होऊ लागली.

सिमेल लिहितात की, कोणत्याही समाजाच्या संरचनेमध्ये एक अशा प्रकारची चौकट किंवा मांडणी असते कि ज्यामध्ये एखाद्या व्यक्तीची अदलाबदल न होणारी एकदल वैशिष्टये विकसित आणि अभिव्यक्त होतात. इंटरनेट आणि डिजिटल तंत्रज्ञान 'स्व' च्या वैशिष्टयांच्या अभिव्यक्तीसाठी सातत्याने अनेक संधी पुरवितात. सिमेल ज्याप्रमाणे महानगर आणि मानसिक जीवन यांच्यातील मानवी कलहाचा संदर्भ देतो. त्याप्रमाणे विशिष्ट आणि अद्वितीय वैशिष्टयांची अभिव्यक्ती जी ऑनलाईन आणि डिजिटल अवकाशामध्ये उदयास येते त्याकडे इंटरनेट युगाचा ठसा म्हणून पाहिले जाऊ शकते. सिमेल असा दावा करतात कि, आपली गटबद्धता आणि स्व-अभिव्यक्ती करण्याचे प्रकार वाढल्यामुळे प्रत्येक व्यक्तीला त्याच्या प्रत्येक प्रवृत्तीसाठी आणि संघर्षासाठी एक समुदाय सापडेल.

सध्या इंटरनेट आणि डिजिटलने सक्षम केलेल्या संरचना (नेटवर्क, नेट फ्लॅटफॉर्म, कलस्टर अगदी फेसबुक) चे प्रतिनिधित्व करण्यासाठी वापरल्या गेलेल्या बऱ्याच रुपकां पैकी वेब हे बहुधा सामान्यतः किंवा विनंती केलेले आहे. सिमेलचे कार्य सौदर्य आणि अचूकतेसह विखुरलेल्या वेब सारख्या सामाजिक संरचनांच्या विकासाचे वर्णन करते. परंतु अशा संरचनांनी घेतलेल्या आकाराचे वर्णन करण्यासाठी त्याने वेब हा शब्द प्रत्यक्षात वापरला, हे चुकीचे ठरले.

वेबच्या अचूकतेविषयी सिमेलची दृष्टी ही अस्पष्ट असली तरी हे स्पष्ट आहे कि, सिमेलचे कार्य विशेष म्हणजे त्याचा हा निबंध वर्ल्ड वाईड वेब आणि इंटरनेटचा संरचनात्मक विकास आणि भूरुपाचे चित्रण व नकाशे स्पष्ट करतो.

### ८.२.३ मृत्यू आणि वारसाः

सिमेलने संपूर्ण कारकिर्दीत विद्वत्तापूर्ण आणि शैक्षणिक अशा विविध विषयांवर २०० पेक्षा जास्त लेख तसेच १५ अत्यंत उच्च पुस्तकांचे लेखन केले. यकृताच्या कर्करोगास सामोरे गेल्यानेंतर १९१८ मध्ये त्यांचे निधन झाले.

सिमेलच्या कृतीने समाजाच्या अध्ययनाच्या संरचनात्मक दृष्टिकोनाच्या विकासासाठी पायाभरणी केली आणि सामान्यतः समाजशास्त्र या ज्ञानविषयक विकासाचा पाया घातला.

शिकोगो विचारप्रवाहाच्या रॉबर्ट पार्कसह अमेरिकेतील नागरी समाजशास्त्राच्या क्षेत्रात पायाभूत काम करणाऱ्यांसाठी त्यांची कृती विशेष प्रेरणादायी ठरली.

युरोपमधील सिमेलच्या वारश्यांमध्ये जॉर्ज लुकास, अर्न्स्ट ब्लॉच आणि कार्ल मनहिम आणि इतरांच्या सामाजिक लेखनाचा आणि बौद्धिक विकासाला आकार देणाऱ्या कृतीचा समावेश होतो. जनसंस्कृतीच्या अभ्यास करण्यासाठी सिमेलचा दृष्टिकोन देखील फ्रँकफर्ट स्कूलच्या सदस्यांसाठी एक सैद्धांतिक पाया म्हणून काम करीत होता.

जरी सिमेलने कोणतीही स्थापित विचारसरणी किंवा प्रत्यक्ष ज्ञानविषयक सोडले नसले तरी समाजशास्त्र तत्त्वज्ञान या दोन्हीच्या विकासावर सिमेलने मोठा प्रभाव पाडला. त्याच्या कल्पना विविध क्षेत्रातील त्यांचे विस्तृत लेखन यांची भावी अभ्यासकांच्या पिढ्यांवर मोठी छाप पडली.

सिमेलच्या गट आणि गट वर्तनाच्या अध्ययनाने दिलेली अंतर्दुष्टी नंतरच्या काळात सामाजिक मानसशास्त्रात आणि समाजशास्त्रात वापरली जाईल.

## ८.३ सारांश

अभिजात सिद्धांतकारामध्ये जॉर्ज सिमेल यांना कमी महत्त्व दिले गेले. त्याच्या कार्याने सैद्धांतिक आणि विश्लेषणात्मक साधने पुरविली. ज्यामुळे सामाजिक संजालाच्या विश्लेषणाच्या चिकित्स दृष्टिकोनाची उभारणी झाली. त्यांच्या सिद्धांताने सामाजिक गटबद्धता कशी तयार होते आणि सामाजिक आंतरक्रियांचा विकास कसा होतो आणि त्याचा व्यक्ती आणि समाज दोघांवर कसा प्रभाव पडतो यांस अधोरेखित केले. हे असे एक जग आहे ज्यामध्ये डिजिटल तंत्रज्ञानाद्वारे सामाजिक संबंध शोधणे आणि तयार करणे हे निरंतर व सर्वव्यापी आहे. ज्याचे तीव्र परिणाम आहेत आणि त्यापैकी बरेच काही आपण समजून घेऊ लागलो आहोत. पण समाजशास्त्रीय वर्तुळात त्याचा प्रभाव मोठा असला तरी त्याचे संप्रेषण, माहिती आणि तंत्रज्ञान अध्ययनाच्या क्षेत्रातील कामाची फारशी दखल घेतली गेली नाही.

## ८.३ प्रश्न

१. पैशाच्या तत्वज्ञानाविषयी सिमेलचे विचार सांगा.

२. सिमेलच्या आजच्या बारशाच्या विश्लेषण करा.

## ८.४ संदर्भ


१. रिटझर जॉर्ज, सॉशिओलॉजिकल थेअरी (पाचवी आवृत्ती), टाटा मॅकग्राहिल एज्युकेशन प्रा. लि. न्यू दिल्ली.

२. वैद्य नी. स., समाजशास्त्रीय विचार परंपरा, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९८१.

३. कुलकर्णी पी. के., सामाजिक विचार प्रवाह, मंगेश प्रकाशन, नागपूर २००८

४. गर्गे. स.मा., भारतीय समाज विज्ञान कोश, खंड १ ते ५, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे.


*****

munotes.in

**नमुना प्रश्नपत्रीका**

**पेपर १**

**अभिजात समाजशास्त्रिय सिद्धांत**

**एकूण गुण ६०** **कालावधी २ तास**

**सूचना**

**सर्व** प्रश्न अनिवार्य

**सर्व** प्रश्नांना समान गुण

प्र. १ कार्ल मार्क्स यांच्या दृष्टिकोनातून मानवी स्वभाव स्पष्ट करा. १५ गुण

**किंवा**

राज्यांच्या विकासातील ऐतिहासीक विकास काय आहेत ?

प्र. २ सामाजिक वस्तुस्थितीची संकल्पना स्पष्ट करा. १५ गुण

**किंवा**

दुर्खिमच्या आत्महत्येचा सिद्धांत स्पष्ट करा.

प्र. ३ सामाजिक क्रियेत वेबरच्या योगदानाचे विश्लेषण स्पष्ट करा. १५ गुण

**किंवा**

भांडवलशाहीच्या विकासात प्रोटेस्टंट आचारांच्या भूमिकेविषयी चर्चा करा.

प्र. ४ सिमेलच्या चिंतेच्या क्षेत्राबद्दल थोडक्यात माहिती द्या १५ गुण

**किंवा**

सिमेलचा वारसा समजावून सांगा.

*****

munotes.in

# Turnitin Originality Report

Processed on: 21-Oct-2022 14:07 IST
ID: 1931387559
Word Count: 40544
Submitted: 1

abhijaat samajshastriy siddhant By Amit Jadhav

| Similarity Index | Similarity by Source | |
|---|---|---|
| 1% | Internet Sources: | 1% |
| | Publications: | 0% |
| | Student Papers: | 1% |

< 1% match (Internet from 07-Jul-2017)
http://repositorio.flacsoandes.edu.ec/bitstream/10469/12211/2/TFLACSO-2017MM.pdf

< 1% match (Internet from 21-Jul-2021)
https://mu.ac.in/wp-content/uploads/2021/02/4.59-Sociology-PET-Syllabus.pdf

< 1% match (Internet from 13-Jul-2020)
https://jesusmemoirs.wordpress.com/2016/06/28/definitions-of-religion-summary/

< 1% match (Internet from 19-Jan-2016)
http://www.thelincolnlibrary.com/images/sociology_rjp.pdf

< 1% match (student papers from 15-Aug-2022)
Submitted to Institute of Technology, Sligo on 2022-08-15

< 1% match (student papers from 03-May-2022)
Submitted to London School of Economics and Political Science on 2022-05-03

< 1% match (Internet from 08-Apr-2009)
http://www.pineforge.com/mcdonaldizationstudy5/articles/Weber%20and%20Other%20Supporting%20Theories_Articles%20PDFs/Greenwood

< 1% match (student papers from 12-Oct-2015)
Submitted to University of Sydney on 2015-10-12

< 1% match (student papers from 26-Aug-2016)
Submitted to Australian National University on 2016-08-26

< 1% match (student papers from 29-Mar-2010)
Submitted to National University on 2010-03-29

< 1% match (student papers from 15-Apr-2013)
Submitted to University of Sheffield on 2013-04-15

< 1% match (student papers from 09-Apr-2014)
Submitted to Solihull College, West Midlands on 2014-04-09

< 1% match (Internet from 17-Nov-2016)
http://brunodyck.weebly.com/uploads/1/4/7/1/14715544/christie_dyck_morrill_stewart_bsr.pdf

< 1% match (Internet from 07-Sep-2022)
http://repository.lppm.unila.ac.id/33005/1/Nahkoda.pdf

< 1% match ("The Wiley-Blackwell Companion to Major Social Theorists", Wiley, 2011)
"The Wiley-Blackwell Companion to Major Social Theorists", Wiley, 2011

< 1% match (Internet from 07-Feb-2021)
https://salahlibrary.files.wordpress.com/2017/03/concise-encyclopedia-of-pragmatics.pdf

< 1% match (student papers from 17-Mar-2021)
Submitted to Great Zimbabwe University on 2021-03-17

1 lelJeîveeOeeÿrelre eJfe®eej DeeefCe Deee|LeJeÀ mebJeÀuHevee ÒeJeÀjCe j®evee 1.0 GeÎfâîes 1.1 ÒemleeJevee 1.2 ceeveJee®ee ce}gYelte mJeYeeJe DeeefCe #ecelee ³eeeJfeJ. (1986). An Introduction to Karl Marx. Cambridge: Cambridge University Press. ? Giddens.A & Held. D. (1982) Classes, Power, and conflict, Berkeley: University of California Press. ? Haywood, A. (2019). Politics: Macmillan International Higher Education/Red Globe Press. ? Lai,T. F.(2020).The Basic Characteristic s of Marx's Political Philosophy. Open Journal of social sciences,8,313-319. ? Morrison,K.( 2006).Marx,Durkheim,Weber:Formations of Modern Social Thought. New Delhi: Sage Publications. ? Slaughter.C.(1980) The Legacy of Marx. In: Marxism, Ideology and Literature.Critical Social Studies. Palgrave,London. ? Weatherly, P. (2005). Marxism and the State: An Analytical Approach. Leeds: Palgrave Macmillan. ? Wolff, Jonathan.(2003). Why Read Marx Today? OUP Oxford? ***** 3 He×leerµeem$eer³e ³eesieoeve DeeefCe Þece eJfeYeepeve (Methodological Contributions & The Division of labour) IeìkeÀ j®evee 3.0 GeÎfâs 3.1 ÒemleeJevee 3.2 peeJreve Heejf®e³e 3.3 ûebLemeHbeoe 3.4 He×leeµreem$ee³re ³eeiseoeve 3.4.1 He×leeµreem$ee®ee DeeOeej 3.4.2 He×leeµreem$ee®eer Jeweµfeâîes 3.4.3 He×leeµreem$eeJeje}r ìerJeÀe 3.5 Þece eJfeYeepevee®ee emfe×eble 3.6 Þece eJfeYeepevee®eer JeÀejCes 3.7 Þece eJfeYeepeve DeeefCe meeceeepfeJeÀ mecem³eeJbeje}r GHee³e 3.8 Þece eJfeYeepevee®ee HeejfCeece eJEeÀJee ÒeYeeJe 3.9 meeceeepfeJeÀ SJse³Ìe 3.9.1 ³eeeb$feJeÀ SJeÀlee 3.9.2 peewJfeJeÀ SJeÀlee 3.10 meejebµe 3.11 Òeµve 3.12 meobYe& 3.0 GeÎfâs ¿ee ÒeJeÀjCeele DeeHeCe Sefce} oKgeecae®³ee He×leeµreem$ee³re ³eeiseoeve DeeefCe Þece eJfeYeepeve